साप्ताहिक
# माणूस
२३ फेब्रुवारी ८५ / २ रुपये

## कोण येणार?



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : एकूणचाळिसावा

२३ फेब्रुवारी १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

राजू देशपांडे



## मुंबापुरी

### □ खासदारांचा सत्कार

फिल्म प्रोड्युसर्स असोशिएशनने विले-पार्ल्याच्या भाईदास हॉलमध्ये तीन खासदारांचा सत्कार आयोजित केला होता. हे खासदार म्हणजे सुनिल दत्त, अमिताभ बच्चन आणि वैजयंतीमाला. सुनिल दत्तना आम्ही लोकसभा निवडणुकीच्या काळात प्रचार सभांतून पाहिले होते. परंतु अमिताभ बच्चन आणि वैजयंतीमाला यांच्या दर्शनाचा योग आला नव्हता. या समारंभाच्या निमित्ताने हे पुण्य पदरात पाडून घ्यावे अशा विचाराने बरोबर आठच्या ठोक्याला (पत्रकार असूनही) आम्ही भाईदास हॉलला हजर झालो. पण रात्री दहापर्यंत खासदारांचा पत्ता नव्हता.

सव्वा दहाला वैजयंतीमाला आल्या. या पूर्वी त्यांना आम्ही फक्त मधुमतीमध्ये पाहिले होते. स्पष्ट सांगायचे तर सुंदर युवती समोर आली की आमची दातखीळ बसते. म्हणजे वाचाच जाते म्हणाना! (हा आमचा वीक पॉइंट आहे बरका!) त्यातून गेली चार वर्षे विधानसभेत पार्वती मलगोंडांना आणि महापालिकेत सुगंधा राणेंना पाहायचा आमचा अनुभव. त्यामुळे वैजयंतीमालासारख्या खास दार पाहणे हा आम्हाला अपूर्व योग वाटला; परंतु त्यांच्याशी बोलण्याचे धाडस काही आम्हाला झाले नाही.

चित्रपट नट—नट्यांभोवती प्रसिद्धीचे प्रचंड वलय असते. सतत पंचवीस—तीस फोटोग्राफर्सचा गराडा, चाहत्यांची गर्दी, पोलिसांची धावपळ यामुळे पत्रकारांनाही त्यांच्यापर्यंत पोहोचणे जिकीरीचे होते, मग सर्वसामान्य मतदाराची काय कथा!

साडेदहाला अमिताभ बच्चन आले. सुनिल दत्त आणि वैजयंतीमाला आता नुकतेच दहा मिनिटात शूटिंग सुरू होईल अशा तयारीत आले होते तर अमिताभ बच्चन मात्र खादीचा कुर्ता सुरवार आणि शाल पांघरून आले होते. मधल्या वेळात सभेच्या ठिकाणी जी रोषणाई आणि दारूकाम करण्यात आले तसे आम्ही प्रजासत्ताकदिनीही पाहिले नव्हते.

तीनही खासदार स्थानापन्न झाल्यावर माया गोविंद यांनी त्यांची चंद्र, सूर्य आणि गंगा यांच्याशी तुलना करणारी काव्यरचना साभिनय गाऊन दाखवली. त्यातल्या फिल्म इंडस्ट्री बद्दलच्या तीन ओळी आम्हाला पुसटश आठवतात त्या अशा :—

दुनियाने देदी हमे चोटीयाँ/लोगोने खेली हमसे गोटीयाँ/चाँदपे भी देखी हमने रोटीयाँ यावरून उर्वरित काव्याचा बाज तुमच्या ध्यानात आला असेल.

सव्वा अकराला सुनिल दत्त बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'परसो हम पार्लमेंटमे बैठे थे तो हमारे नेता राजीव गांधीने हमे देश के प्राब्लेमोंके बारेमे जानकारी दी. उन्होने पंजाबके प्राब्लेम के बारे मे बताया! आसामकी समस्याके बारेमे कहा। तो एक कोनेमे बैठे बैठे हमने सोचा—हमारे फिल्म इंडस्ट्री के भी प्राब्लेम है... व्हिडीओ पायरसीकी समस्या है...

साडेअकरा वाजले तेव्हा आम्ही विचार केला, आता कॉपी काही जात नाही, तेव्हा फक्त फोटो कॅप्शन द्यावे हेच उत्तम!

### □ मॅन ऑफ द ट्री

मुंबापुरीत गेल्या आठवड्यात एका वृक्षाचा सत्कार करण्यात आला. त्याचे नाव सुंदरलाल बहुगुणा. जे. आर. डी. टाटा आणि नानी पालखीवाला, हुतात्मा चौकातील ज्या बॉम्बे हाऊस इमारतीत बसतात तिच्या तळ मजल्यावरील हॉलमध्ये हा समारंभ झाला. गढवालने दोन बहुगुणा देशाला दिले. एक मानव जातीला उपकारक सुंदरलाल बहुगुणा आणि दुसरे लोकशाहीला अपकारक हेमवतीनंदन बहुगुणा. असो.

गढवालमध्ये १९७३ साली जंगलातील झाडे तोडायला येणाऱ्या सरकारी लाकुड-तोड्यांपुढे झाडांना मिठी मारून सुंदरलाल बहुगुणांनी त्यांचे रक्षण केले. त्यातूनच चिपको आंदोलनाचा जन्म झाला. आता या आंदोलनाची कीर्ती जगभर झाली आहे. त्यामुळे त्याबद्दल आम्ही अधिक काही लिहित नाही.

व्हीटी ते फ्लोरा फाउंटन या भागात जितकी झाडे आहेत तेवढीच माणसे या समारंभाला हजर होती. हा सत्कार फ्रेंडस् ऑफ ट्रीज या संस्थेने बहुगुणांना 'मॅन ऑफ द ट्रीज' हा पुरस्कार देण्यासाठी आयोजित केला होता. फ्रेंडस् ऑफ ट्रीजचे एस. पी. गोदरेज आणि सुभाष संपत यांची भाषणे आम्हाला निवडुंगाइतकीच रुक्ष वाटली; पण बहुगुणा मात्र बुंध्यापासून बोलतात. वडाच्या पारंब्यांसारखीच त्यांची दाढी आणि जटा वाढलेल्या आहेत. शरीरयष्टी किरकोळ. खादीचा कुर्ता आणि लेंगा. खांद्यावर शबनम झोळी असा त्यांचा वेश. डॉक्टर रश्मी मयूर यांच्यासारखे कोट आणि टाय लावून ते पानाफुलांच्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त करीत नाहीत. बोलताना त्यांना समोरच्या श्रोत्यांचा विसर पडतो. दृष्टी कुठे तरी दूर झाडा-झुडपात हरवल्यासारखी दिसते. भाषणाच्या शेवटी ते म्हणाले 'मला झाड व्हायचंय. a tree is God's compassion personified.'

आम्हाला वाटले इंट्रोला हे वाक्य बरे आहे.

### □ पुलोदचं सरकार ?

निवडणूक प्रचार आस्ते आस्ते तापतोय. जीप्स, गाड्या, रिक्शा, फलक, भित्तीपत्रकं, आरडाओरड, प्रचार-फेऱ्या या सगळ्या सगळ्याचा सूर येत्या आठवड्यात तीव्र होत जाणार. मुर्दाड शहराला त्याची अजिबात पर्वा नसावी. प्रत्येकाने जणू काय वाळूत तोंड खुपसून घेतलंय. दोन मार्चपर्यंत हे असंच चालणारसं दिसतंय.

मतदारांच्यात आता पूर्वीसारखा उत्साह नाही हे एक टोक तर दुसरं टोक हे की, मतदारही आता (निवडणुकीतल्या उमेदवारांप्रमाणे) महा चालू झालेत. आता ही दुसरी बाजू जर खरी असेल तर राजकीय पक्षांचं काही खरं वाटत नाही. कारण लोक आता शेरास सव्वाशेर झालेत असंच म्हणावं लागेल. इन दॅट केस' पवार काय अन् वसंतदादा काय दोघांनाही सुखाची झोप नाही. लोक कधी कसा दगाफटका करतील नेम नाही. सत्त्याहत्तर साली, ऐंशी साली, आंध्रात च्याऐंशीमध्ये पब्लिकने असाच कमरेखाली वार केला होता. मजबूत. तेव्हा बाबूजी धीरे चलना...

पुलोद आघाडीचा प्रचार सुरुवातीपासूनच 'लो की' वर आहे. मतदारांशी थेट संपर्क. मोजकीच होर्डिंग्ज, प्रचारफेरी, महिलांच्या सभा असा आटोपशीर कॅंपेन आहे.

या उलट, कॉंग्रेस आयच्या गाड्या ऐरावतासारख्या वाटतात. मोठमोठाले पोस्टर्स, राजीव गांधी एका ओळीने भिंतीवरून खाली पृथ्वीवरच्या पामरांकडे पाहताहेत, सोबतीला इंदिरा गांधी अन् कॉंग्रेस (आय) च्या पंज्याची राजमुद्रा. जीप्स येतात, कानठळ्या मारतात, दूरच्या इंद्रप्रस्थ देशी बसून राज्य करणाऱ्या राजीवचा हवाला देतात. अन् धूळ उडवून निघून जातात. सगळं कसं झकपक, फुल्ल ऑफ ग्रॅंजर. हा ग्रॅंजर जर लोकांनी पुन्हा एकदा पसंत केला तर आश्चर्य वाटायला नको. उपाशीपोटी रामराज्याच्या गोष्टी आम्ही श्रद्धेनं ऐकतो.

परवाच्या रविवारी पुलोदची शिवाजी पार्कवर सभा झाली. अटलबिहारी वाजपेयी सुरेख बोलले. सध्याच्या 'यूथफुल्ल' वातावरणात तुम्ही हॅंडसम अन् तरुण शरद पवारांना निवडणार की दादांना असा गुगली टाकून त्यांनी डायरेक्ट मुद्द्यालाच हात घातला.

पुलोदवाले सरकार बनवण्याची वार्ता करताहेत. 'अगली बार, पुलोदको सरकार' च्या घोषणा शिवाजी पार्कवर देण्यात आल्या. म्हणूनच आम्हाला काळजी वाटते. सत्ता आल्यावर दिल्लीत दोन वर्षं काय काय नाही झालं. अहो, गुळाची ढेप दिसली की, मुंग्या-सुद्धा नीट, शिस्तीत, एका सरळ रेषेत ढेपीची वाट धरतात. आणखी काय सांगावं?

—विष्णु जयदेव

निवडक निवडणूक

# पुलोद ८५, शेतकरी संघटना आणि राजीवनाम

शिरीष सहस्रबुद्धे

बघता बघता निवडणुका तर अगदी उंबरठ्याशी येऊन ठेपल्या. प्रचारात अजून म्हणावा तसा जोर नाही; पण भिंती रंगल्या आणि कर्णे फुंकणाऱ्या मोटारी धावायला लागल्या. साहजिकच अंदाज-आडाखे-तर्क-वितर्क एकीकडे सुरू झाले, तर दुसरीकडे विरोधकांच्या पूर्वीच्या मतांच्या वेरजा, कॉंग्रेसच्या मतातल्या बंडखोर उमेदवारांच्या वजाबाक्या असे संख्याशास्त्रीय व्यायामही सुरू आहेत.

या गोष्टी नेमेचि येणाऱ्या असल्या तरी महाराष्ट्राच्या बाबतीत त्यांना एक विशेष अर्थ आहे आणि तो पुलोदमुळे निर्माण झालेला आहे. अर्थ असा की, पुलोदच्या काहीशा अनपेक्षित निर्मितीमुळे महाराष्ट्रातल्या निवडणुका तरी पूर्वी वाटल्या तितक्या एकतर्फी नि नीरस होणार नाहीत. लोकसभा निवडणुकीनंतर वाटलं होतं की, आता विधानसभेच्या निकालात काही कान देऊन ऐकण्याजोगं शिल्लकच राहणार नाही. आता तितकं हताश वाटत नाही आणि निदान महाराष्ट्रात नि जवळच्या आंध्रप्रदेशात तरी निवडणुकीत जिवंतपणा आलाय्. याचे श्रेय अर्थातच 'पुलोद ८५' नि तेलगू देसम यांना.

तेलगू देसमबद्दल नव्याने काही लिहायला हवं असं नाही. रामारावांच्या व्यक्तिगत लोकप्रियतेचा आधार त्यांना सत्ता टिकवायला पुरेसा होईल. सौजन्य म्हणून त्यांनी

काही जागा तथाकथित राष्ट्रीय विरोधी पक्षांच्या झोळीत टाकल्या आहेत इतकंच. पुलोद ८५ मध्ये मात्र एकमेकांचं सामर्थ्य नि स्वतःच्या मर्यादा ओळखलेले चार विरोधी पक्ष डोळसपणानं एकत्र आलेले आहेत. या आघाडीमागे परिस्थितीचा दबाव मोठ्या प्रमाणावर आहे हे खरंच; पण पराभवातनं आणि अपयशातनं येणारं शहाणपणही आहे.

महाराष्ट्रात असा प्रयोग यापूर्वी फक्त दोनच वेळा झालाय्. सत्तावन्न साली संयुक्त महाराष्ट्र समिती आणि सत्त्याहत्तर साली जनता पार्टी. दोन्ही वेळा मतदारांनी या प्रयोगाला अनुकूलता दाखवली होती हे लक्षात ठेवायला हवं. एवढंच नव्हे तर अठ्ठ्याहत्तर सालच्या पुलोदलाही लोकांची सहानुभूती मिळाली होती– त्या पुलोदनं लोकमताचा कौल घेतलेला नसूनसुद्धा ! किंबहुना पुलोद ७८ नि पुलोद ८५ यांच्यात हाच एक मोठा फरक आहे. पुलोद ७८ हे एका तऱ्हेनं पक्षांतराचंच अपत्य होतं. शरद पवारांनी तेव्हा पक्ष फोडला तो स्वतःच्या अस्तित्वाला धोका होऊ नये यासाठीच. त्याअगोदर लोकांना विश्वासात घ्यायचा प्रश्नच आला नव्हता. पुलोद ८५ मात्र आधीच नि वेळेवर सुरुवात करून मतदारांचा कौल मागणार आहे, हे त्याचं एक वैशिष्ट्य. दुसरं वेगळेपण असं की हा पुलोदप्रयोग फक्त महाराष्ट्रातच झाला आहे. इतर कोणत्याही राज्यात विरोधकांची अशी सन्मान्य एकजूट होऊ शकलेली नाही, उलट भांडणंच जुंपलेली दिसतात. महाराष्ट्रातल्या निवडणुकीत तरी पुलोदनंच थोडीफार चुरस निर्माण केली असं म्हणणं गैर होणार नाही. आता अर्थातच उत्सुकता हीच की पुलोद १९८५ ची ही वैशिष्ट्यं मतपेटीतून शिक्कामोर्तब होऊन येतील का ?

'येतील' असं उत्तर शरद पवार देतात आणि त्यांचे हितचिंतक नि आप्तमित्र तर त्यांना भावी मुख्यमंत्री म्हणायला लागले सुद्धा; पण इतका उतावळेपणा करायची काही गरज नाहीये, लाटांच्याच भाषेत बोलायचं तर राजीव लाटेचा मुकाबला करू शकेल, नव्हे तिच्यावर मात करील अशी 'पुलोद लाट' किंवा 'शरद लाट' म्हणा, इथे निर्माण होते आहे का ? हा खरा प्रश्न आहे आणि त्याचं उत्तर म्हणून शरद पवारांचा किंवा मधू दंडवते नाहीतर प्रमोद महाजनांचा हवाला देणं निरर्थक ठरेल. त्यांनी जे निर्माण केलं ते तडाख्यानं लोकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न ते करणारच. सामान्य मतदारांचा कल इतक्या थोड्या अवधीत एकदम विरुद्ध दिशेनं झुकावा असं आणि इतकं महत्त्व पुलोदच्या निर्मितीला आहे का ? शेवटी पुलोद हे एक झटपट नि सोयिस्कर गठबंधन–मॅरेज ऑफ कन्व्हीनियन्स आहे हे कुणी विसरू नये. याला कुणी कितीही तात्त्विक मुलामा दिला तरी पक्षीय गरजेपोटीच भाजप आणि शेकापसारखे परस्परविसंगत पक्ष एकत्र आले आहेत. अस्तित्वाचाच प्रश्न आला तेव्हा ह्या मंडळींनी एकमेकांना गळामिठी घातली, याचा अर्थ मतदारही लगेच त्यांच्या गळयात पडतील असा होत नाही.

## काय इलाज आहे ?

भाजपाचंच उदाहरण घ्या. लोकसभानिवडणुकीत यांनी शिवसेनेशी समझोता केला. वाजपेयी–ठाकरे युतीचे फोटो वर्तमानपत्रातनं झळकले. महिनाभरात घटस्फोटाच्या बातम्याही आल्या. लगोलग भाजपानं दुसरा घरोबा केला तो पुलोदचा. भाजपासोडून बाकीचे घुतल्या तांदुळासारखे आहेत असंही नाही. मतदार उबगतात ते यालाच. कॉंग्रेसवाले जे जे करू शकतात तेच तुम्ही करणार असाल तर मग तुम्ही हवेतच कशाला ? दुनिया झुकती है आणि आपण झुकानेवाले आहोत या भ्रमातनं पुलोदवाल्यांनी तातडीनं बाहेर येणं आवश्यक आहे. त्यांचे सगळे प्रवक्ते आत्ता कितीही अस्सल ऐक्याच्या आणाभाका घेत असले तरी ही शादी, कुठलीही 'पार्टी' तलाक तलाक तलाक म्हणून क्षणात तोडू शकते याची कल्पना मतदारांना आहे आणि त्यामुळे ती एक मोठी मर्यादा पुलोदच्या यशावर पडणार आहे.

परंपरेनं जे विरोधी पक्षाना मतं देत आले आहेत, त्यांचीसुद्धा सगळी मतं उत्साहानं पुलोदच्या पेटीत पडतील का याबद्दल शंका वाटते आणि याचं कारण म्हणजे जोपर्यंत शरद पवार नेतृत्व करताहेत तोपर्यंत पुलोदवर 'कॉंग्रेस कल्चर'चीच छाप राहणार. पुलोद ७८ मध्येही हेच झालं होतं. ते महाराष्ट्रातलं विरोधी पक्षांचं खरं तर कॉंग्रेसेतर पक्षाचं– पहिलं सरकार म्हणायचं खरं; पण त्याचा चेहरामोहरा कॉंग्रेसीच होता आणि शरद पवारांच्या जवळपास पोचेलसा नेतासुद्धा इतर विरोधी पक्षांकडे नाही म्हटल्यावर लोकांनी त्यांना झिडकारलं तर काय इलाज आहे ?

संघवाल्यांचंच उदाहरण घ्या. अगोदरच त्यांच्यातली कडवी मंडळी भाजपावर नाराज आहेत (असं ऐकतो) कारण भाजपा आता हिंदुहितावर पुरेसा भर देत नाही, एकंदरीतच निष्ठा पातळ वगैरे. अशा स्थितीत आता पुलोद त्यांना आणखीनच लांब वाटणे साहजिकच आहे, कारण पुलोदमधल्या चारापैकी दोन पक्ष ( शेकाप नि जनता ) कमीअधिक प्रमाणात डावरे आहेत. आणि यात त्या मतदारांचं काही चुकतंय् असं वाटत नाही. आज महाराष्ट्रात सव्वाशे ठिकाणी त्यांच्यासमोर कॉंग्रेस एस् की कॉंग्रेस आय् असाच पर्याय असणार आहे. दोन कॉंग्रेसी उमेदवारातनंच निवड करायची तर प्रादेशिक पक्षापेक्षा राष्ट्रीय पक्ष पसंत करण्याची महाराष्ट्राची प्रवृत्ती आहे. तामिळनाडूमध्ये या परिस्थितीत कदाचित वेगळं चित्र दिसलं असतं. हे घटक विचारात न घेता जर कुणी संख्याशास्त्रज्ञ किंवा कॉम्प्यूटरतज्ज्ञ कॉंग्रेस एस्ची मागची मतं अधिक भाजपाची मतं असल्या काही बेरजा करणार असेल तर त्याला 'रीत बरोबर पण उत्तर चूक' असा शेरा द्यायची वेळ येईल.

महाराष्ट्रात या वेळी पुलोद लाट उठणार आहे असा दावा आता ऐकू यायला लागला आहे.त्याचा अर्थ एवढाच की काही आशावादी नेते आणि काही भोळसट पत्रकार मिळून पुन्हा एकदा स्वतःची फसवणूक करून घ्यायचा खेळ खेळणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्यावेळीसुद्धा अशी हवा निर्माण करायचा प्रयत्न झाला होताच आणि मग निकालानंतर या सगळया पत्रकारांनी आणि त्यांच्या वृत्तपत्रांनी आपण त्या गावचेच नव्हत असा एकदम घूमजाव पवित्रा घेतला होता. पुलोद सत्तेवर येण्याची स्वप्नं पाहणारे त्यासाठी तीन गोष्टींचा किंवा अनुकूल घटकांचा हवाला देतात.

**एक :** लोकसभा निवडणुकीच्या वेळी होती तिच्या नेमकी उलट परिस्थिती महाराष्ट्रात आता आहे. म्हणजे कॉंग्रेसची प्रचारमोहीम विस्कळित आणि अंतर्गत मतभेदानं पोखरलेली आहे, तर विरोधी पक्ष पुलोदच्या

छत्राखाली एकत्र आणि योजनाबद्ध प्रचार करताहेत.

**दोन :** कांग्रेसमधली बंडखोरी मोठ्या प्रमाणात पुलोदच्या उमेदवारांना मदत करील.

**तीन :** लोकसभा निवडणुकीत विरोधकांना आपण पुरतंच खच्ची केलं आणि एका पक्षाकडे जवळजवळ निरंकुश सत्ता दिली हे लक्षात आल्यानंतर मतदार आता आपली चूक सुधारू म्हणतील. त्यामुळे देशभरच विरोधकांना जास्त सहानुभूतीपूर्वक मतदान होईल. पुलोदला जागावाटपामुळे या 'सिम्पथी फॅक्टर'चा फायदा जास्तीतजास्त मिळेल.

या तीनही घटकात काही ना काही तथ्य जरूर आहे; पण ते 'ॲब्सोल्यूट' नाही. तर्क दोन्ही बाजूंनी मांडता येतील. कांग्रेसची फळी आज दिसते तितकी उद्या विस्कळीत राहणार नाही. राजीव गांधींचा एखादा दौरासुद्धा त्यांची गठडी वळायला पुरेसा आहे. त्यांच्यातल्या बंडखोरीचा फायदा पुलोदला काही मतदारसंघात जरूर होईल; पण त्यांची संख्या दोन हातांच्या बोटांवर मोजण्याइतकीच राहील. कांग्रेसमध्ये बंडखोरी आहे म्हणून सरसकट सगळीकडेच त्यांना नाकारण्याइतके मतदार ठोकळेबाज नाहीत. कारण शेवटी बंडखोरी हा सुद्धा निवडणूक खेळाचा एक भाग म्हणूनच स्वीकारला जातो आणि बंडखोरी काय पुलोदमध्ये नाही? निदान डझनभर मतदारसंघ तरी दाखवता येतील की जिथे जागा एका घटकपक्षाला दिल्यामुळे दुसऱ्या घटकपक्षाचे स्थानिक पुढारी एकतर बंडखोर म्हणून उभे राहिलेत किंवा उदासीन बसून राहिलेत. तेव्हा बंडखोरीचं फार भांडवल करण्यात अर्थ नाही. शिवाय अंतुलेंसारख्या बड्याबड्या बंडखोरांची झालेली ससेहोलपट ज्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे त्यांना तरी फुटकळ बंडखोरांच्या कर्तबगारीवर फार विसंबून राहता येणार नाही. अर्थात शरद पवारांचा मनसुबा मात्र बंडखोरीचा जमेल तितका फायदा उठवण्याचा दिसतो. जळगावचे दादा सुरेश जैन– ज्यांचं मुख्य क्वालिफिकेशन लखपती असणं हेच आहे– यांना कांग्रेस आय्‌मधनं बाहेर पडतानाच शरद पवारांनी तिकिट दिलं आणि पाटण मतदारसंघातले बंडखोर कांगाय आमदार विक्रमसिंह पाटणकर यांच्यासाठी पवारांचे उमेदवार भागवतराव देसाई यांनी माघार घेतली, ही दोन उदाहरणं पवारांचं धोरण पुरेसं उघड करतात. जैन नि पाटणकर निष्ठा बदलण्याबाबत कुख्यात आहेत; पण त्यांना आता आत घेतल्यामुळे दोन सिटा हमखास लागतील एवढाच हिशेब पवारांनी याक्षणी केला आहे. त्यांना आत्ता फक्त पोपटाच्या डोळ्यासारखी मुख्यमंत्रीपदाची खुर्ची दिसते आहे आणि साधनांचा विधिनिषेध त्यांना नेहमीच भुक्कड वाटतो. उद्या कांग्रेस एस्‌चाच एक प्रेशर ग्रुप तयार झाला आणि कांग्रेस आय्‌ची परिस्थिती काठावरची नाजूक झाली तर पवार तिकडेही सौदा पटवतील. पुलोदचा डाव मांडतानासुद्धा बहुमताला काय पाच–पंचवीस आमदार कमी पडले तर आय्‌मधनं फोडून आणू हा त्यांचा हिशेब असणारच. आता पक्षांतरबंदी विधेयकामुळेच त्याला चाप लागतो का काय पाहायचं. एरवी कुणीही जिंकलं तरी मंत्रिमंडळ कांग्रेसी थाटाचंच येणार असा रंग दिसतो.

मतदार विरोधकांबद्दल थोडी सहानुभूती दाखवतील ही शक्यता आहे खरी; पण ती खैरातीच्या स्वरूपात नसेल. निवडक उमेदवारांनाच अशा सहानुभूतीच्या मतदानाचा लाभ मिळेल असं वाटतं. कारण शेवटी हे सत्तेचं सत्तेसाठी राजकारण आहे. भिक्षेकरी पुनर्वसन योजना नव्हे. लोक दया दाखवतील या भरंवशावर राजकारण करणाऱ्यांनी त्यापेक्षा सरळ जोगवा किंवा गोग्रास मागितला तर जास्त हमखास मिळकत होईल.

महाराष्ट्रातल्या निवडणुकीवर थोडाबहुत परिणाम करू शकतील असा दावा आणखीन चारपाच घटकांबाबत केला जातो. त्यातला एक ग्राहक चळवळ हा नव्यानंच पुढे आला आहे तर अंतुले–सामंत–ठाकरे हे जुने जाणते कलाकार आहेत. ग्राहक पंचायतीचं नेतृत्व करणारे बिंदुमाधव जोशी यांनी अलिकडे सामान्य ग्राहकांच्या हिताचं रक्षण करणाऱ्या -निदान तसं आश्वासन देणाऱ्या उमेदवारांना पाठिंबा द्यावा अशा तऱ्हेची मोहीम चालवली आहे. मात्र पुण्यातल्या त्यांच्या सभेला थंडा प्रतिसाद मिळाला. ही चळवळ चिकाटीनं पुढे नेली तर कदाचित पुढच्या निवडणुकीत तिचा काही प्रभाव दिसेल!

ग्राहकनिष्ठ चळवळींची जी अवस्था तीच भारतीय कांग्रेस, कामगार आघाडी, शिवसेना यासारख्या व्यक्तिनिष्ठ चळवळींची. एवढंच की अंतुले–सामंत–ठाकरे ही मंडळी मुरब्बी राजकारणी असल्यामुळे त्यांच्या त्यांच्या विशिष्ट नि मर्यादित क्षेत्रात त्यांची मुळं कमीजास्त रुजली आहेत आणि तेवढ्यापुरता ते आपला प्रभाव टाकू शकतील. उदाहरणार्थ सामंत आणि ठाकरे मिळून मुंबई आणि ठाणे परिसरातल्या सात-आठ जागांच्या निकालावर परिणाम करू शकतील; पण इतकंच.

## कुतुहल

शेतकरी संघटना हा मात्र स्वतंत्रपणे विचार करावा असा विषय आहे. निवडणुकीला नवा संदर्भ, नवं वळण द्यायच्या जिद्दीनं शरद जोशी या निवडणुकीत स्वतः सक्रीय प्रचाराच्या रणधुमाळीत उतरले आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत त्यांना विदर्भातल्या कांगाय उमेदवारांच्या मतांची आघाडी तोडता आली. ठळक नि सरळ यश मात्र मिळवता आलं नाही. विधानसभेचे मतदारसंघ लहान, तेव्हा प्रभाव 'कॅश' करता येण्याची शक्यता इथं जास्त. या हिशेबानं शरद जोशी पुन्हा मैदानात उतरले आहेत. नाशिक जिल्हा, खानदेश नि विदर्भाच्या काही जिल्ह्यात पुलोदच्या उमेदवारांना शेतकरी संघटनेचा पाठिंबा विजय मिळवून देईल. इतरत्र त्यांचा प्रभाव नाही; पण खरा प्रश्न तो नाही. शरद जोशींनी आपलं सगळं वजन शरद पवारांच्या पारड्यात टाकून नेमकं काय गमावलं, काय कमावलं हा आहे. शरद पवार हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देतील अशी खात्री त्यांच्या भूतकाळातल्या कुठल्या कर्तृत्वामुळे शरद जोशींना पटली? आतापर्यंत पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून शेतकरी चळवळीचं लोण देशभर पसरवण्यासाठी धडपडणाऱ्या शरद जोशींना एका प्रांतातल्या निवडणुकीत हिरीरीनं उतरण्याची प्रेरणा का व्हावी याचं कुतुहल जबरदस्त आहे. पाणीपंचायतीच्या विलासराव साळुंके यांच्याप्रमाणे निवडून आल्याखेरीज तरणोपाय नाही अशी जोशींची खात्री झाली आहे? तस असलं तर त्यांचीही पुढची पावल सत्तेच्या राजकारणाकडे वळतील की काय? इंग्लिश साप्ताहिक–पाक्षिकांनी शरद जोशींच्या या

# रामलाल, रेड्डी, गुंडुराव... वगैरे व्यक्तिविशेष

ठाकुर रामलाल हे नाव तुम्हाला ओळखीचं वाटतं का ?

नसेल, तर वाईट वाटून घ्यायचं काही कारण नाही. तसं काही हे प्रातःस्मरणीय वगैरे नाव नव्हे.

असली नावं बहुधा हिंदी सिनेमात अपवादानंच सापडणाऱ्या सज्जन जमीनदारांची वगैरे असतात. पण सध्या आपल्यासमोर असलेले ठाकुर रामलाल म्हणजे हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री. आता कुणीही ओळखेलच की हेच ते रामलाल. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मुख्यमंत्रीपद सोडावं लागलेले. मग त्यांना इंदिराकृपेनं आंध्रप्रदेशच्या राज्यपालपदाच्या अडणीवर बसायला मिळालं. तिथे रातोरात कारवाया करून त्यांनी रामाराव सरकारची गठडी वळली. त्यानंतर झालेल्या टीकेमुळे त्यांचं कोवळं मन इतकं दुखावलं की त्यांनी तत्काळ राजीनामा देऊन घरची वाट धरली. कुणी म्हणाले त्यांना बळीचा बकरा केलं म्हणून. पण तो मुद्दा किरकोळ आहे. कळविण्यास आनंद वाटतो की, एवंगुणविशिष्ट रामलालजी उर्फ ठाकुर रामलाल यांना यंदा पुन्हा कर्तव्य आहे. हिमाचलप्रदेशच्या कटलेर मतदारसंघातून त्यांना विधानसभा निवडणुकीची उमेदवारी मिळाली आहे· राजीवजींची नजर चुकवूनच असणार.

गंमत म्हणजे ठाकुर रामलाल यांचे जावई आणि हिमाचलप्रदेशचे निर्माते मुख्यमंत्री (कै.) डॉ. यशवंत परमार यांचे चिरंजीव कुश परमार हेही निवडणूक लढवताहेत. सिरमूर जिल्ह्यातल्या पाओंटासहिब मतदारसंघातून काँगाय तिकिटावरच. आता सासरेबुवा आणि जावईबापू यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी लठ्ठालठ्ठी होऊ नये म्हणजे मिळवली. हिमाचलप्रदेशचे सध्याचे मुख्यमंत्री वीरभद्रसिंग आमच्या वसंतदादांइतके तयार दिसत नाहीत. एरवी जावयाला तिकिट देऊन सासऱ्याचा पत्ता काटणं त्यांना जमलं नसतं का ?

राज्यपालपदाची प्रतिष्ठा वगैरे इंदिरा कारकीर्दीत इतक्या झपाट्यानं गुंडाळण्यात आली की, अगदीच पडता काळ आला तर तो 'सेफ जॉब' घ्यायचा आणि ग्रह पालटले तर पुन्हा राजकारणात उडी घ्यायची हा शिरस्ताच झाला. रामलाल यांच्यापूर्वी बंगालचे माजी राज्यपाल अनंतप्रसाद शर्मा आणि पंजाबचे माजी राज्यपाल डॉ. चेन्ना रेड्डी यांनी तो उद्योग केला होताच.

डॉ. चेन्ना रेड्डींची कारकीर्द तर भलती गाजली. पण केन्द्रीय मंत्रीपद, मुख्यमंत्रीपद राज्यपालपद काही म्हणता काही त्यांना लाभलं नाही. आंध्रचे मुख्यमंत्री असताना त्यांची साठी उलटली. लगेच त्यांना जी नाठी बुद्धी झाली तर त्यांनी एक यज्ञयाग वगैरे करून आपली सुवर्णतुलाच करून घेतली. ते प्रकरण त्यांच्यावर मग चांगलंच शेकलं.

हे चेन्ना रेड्डी अलिकडे आपला नवा संसार थाटून बसले आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांनी तेलगू देसम्‌कडनं खरपूस मार खाल्ला. अर्थात हाडाचे राजकारणी, तेव्हा आता विधानसभा निवडणुकीतसुद्धा ते नशीब अजमावून पाहणार आहेतच.

आंध्रप्रदेश ही बोलूनचालून माजी मुख्यमंत्र्यांचीच वसाहत. तिथले आणखी एक कुप्रसिद्ध माजी मुख्यमंत्री म्हणजे एन्. भास्करराव. या औटघटकेच्या शिराळशेटजींची अवस्था चैतन्यरथालासुद्धा पाझर फुटेल इतकी बिकट आहे. त्यांना फूस लावून तेलगू देशममधनं पळवून नेणाऱ्या काँग्रेसनं त्यांची साथ सोडली आहे. मात्र त्याआधी त्यांच्या काही सहकाऱ्यांना काँग्रेसच्या पोटात उदार आश्रय मिळाला आहे. जय पक्षांतरबंदी विधेयक ! हे भास्करराव आंध्र विधानसभेच्या सगळ्या २९४ सिटा लढवणार असं म्हणत म्हणत एकीकडे मजलिसे इत्तेहादुल मुसलमीनच्या गळ्यात गळा घालून चारमिनार या हैदराबादेतल्या एका मतदारसंघातनं उभे आहेत. आपल्या पक्षाचं नाव त्यांनी लोकशाहीवादी तेलगू देसम् असं ठेवून दिलं आहे. निवडणुकीनंतर त्यात ते तरी शिल्लक राहतात की नाही ते बघायचं.

अशोच वेगळी चूल मांडून बसलेले आणखी एक माजी सीएम् मध्यप्रदेशचे वीरेंद्रकुमार सकलेचा. 'भ्रष्टाचारा भ्रष्टच उत्तर' अशा बाण्यानं त्यांनी मध्यप्रदेशचं नेतृत्व आधी जनता पक्षीय मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भाजपाचे लीडर म्हणून गाजवलं. आता त्यांनी 'मध्यप्रदेश जनता पार्टी' काढली आहे. अर्थात त्यांचं लक्ष केन्द्रित झालेलं आहे ते आपण निवडून येण्यापेक्षा आपले भाजपातले प्रतिस्पर्धी आणि मध्यप्रदेशचे आणखी एक माजी मुख्यमंत्री सुंदरलाल पटवा यांना चाट घालून पाडण्याकडे. हे सुंदरलालजी इतकी वर्षं राजकारणात काढून आणि पदं उबवून स्वतःसाठी एक सुरक्षित मतदारसंघ काही बांधू शकले नाही.

निवडणूक रिंगणातल्या नि बाहेरच्या माजी मुख्यमंत्र्यांचा विषय निघालाच आहे, तेव्हा रा. रा. आर्. गुंडूराव यांची आठवण काढणं गैर होणार नाही. हे रावसाहेब एकेकाळच्या संजयचे एकेकाळचे जानी दोस्त कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाची त्यांची छोटी कारकीर्द त्यांच्या आडदांडपणामुळे वाऽत गाजत गेली. कुणी कुणी त्यांना लाडानं कर्नाटकचे अंतुले असंही म्हणतात. तर या गुंडुरावजींना राजीवजींनी तिकिटाविना लोकसेवेला सोडलं आहे. याचा दोष त्यांनी आता अंतुलेजींना देऊ नये म्हणजे मिळवली. दैवगती म्हणा की कॉम्प्युटरगती म्हणा; पण ती अशी न्यारी की गुंडुरावचे कट्टर वैरी बंगारप्पांना मात्र तिकिट मिळून गेलं. खरं तर हे बंगारप्पा आणि त्यांच्याबरोबर माजी मुख्यमंत्री कै. देवराज अरस यांची मुलगी चंद्रप्रभा अरस, हे आपला क्रांतिरंगा पक्ष गुंडाळून नुकतेच काँग्रेस आय्‌मध्ये डेरेदाखल झाले होते; पण दोघांचाही नंबर लागला खरा. या अप्पा आणि अम्माखेरीज वीरप्पा मोईली (टेप-लाच-प्रसिद्ध) यांनाही पुन्हा तिकिट मिळालंय्. थोडक्यात, काळजीवाहू मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडयांची काळजी निवडणुकीनंतरसुद्धा मिटणार नाही यावद्दल त्यांनी निश्चित व्हावं !

*

नव्या पवित्र्याचा खूपच गवगवा केला आहे. अडचण अशी आहे की, माणूस कितीही प्रामाणिक, उच्चशिक्षित वगैरे वगैरे असला तरी एकदा तो निवडणुकीच्या आखाड्यात उतरला की, आमजनता त्याला व्हीआयपी दर्जाची वागणूक देणं थांबवते. मग त्याची ताकद, तो आपल्याला काय 'रिटर्न्स' देऊ शकेल अशाच निकषांवर चारचौघांप्रमाणेच त्याचाही फैसला केला जातो. आजवर पक्षीय राजकारणापासून चार अगुळं वरून चालणारा शेतकरी संघटनेचा रथ या निवडणुकीच्या निमित्तानं जमिनीला टेकण्याचा योग दिसतो. आपला तोल शेतकरी संघटनेने वेळीच सावरला नाही तर सत्ताधारी पक्षाचं ओढवून घेतलेलं वैर, विरोधी पक्षांकडून त्यांचा दुबळेपणा, भांडखोरपणा नि क्षुद्र स्वार्थ यामुळे होणारी फसवणुक आणि मतदारांकडून पुन्हा नाकारलं जाण्यातला हताशपणा यांच्या कैचीत शेतकरी चळवळीची अवस्था दुष्काळातल्या जिरायती शेतीपेक्षा बिकट होईल यात शंका वाटत नाही.

आतापर्यंत उल्लेख केलेल्या सगळ्या घटकांचा नि प्रभावांचा मुकाबला आहे तो फक्त राजीव लाटेशी. महाराष्ट्र काँग्रेसकडे आज तेवढं एकच भांडवल आहे. गेल्या पाच वर्षातल्या कारभाराच्या नावानं बोंबच आहे. पक्षातल्या गटबाजांची सुंदोपसुंदी वाढत चालली आहे. म्हाताऱ्या नेत्यांचा सत्तालोभ कमी व्हायची चिन्हं नाहीत. अशाही अवस्थेत सगळ्यांना एकत्र ठेवणारी आणि कामाला लावणारी प्रेरणा आहे सत्तेची आणि शक्ती आहे राजीवनामाची. अशीच स्थिती थोड्याफार फरकानं सगळ्या प्रांतात आहे. राजीव गांधींनी ह्या निवडणुका खूपच गांभीर्यानं घेतल्या आहेत त्याचं हे एक महत्त्वाचं कारण आहे. राजीवच्या आतापर्यंतच्या कारभाराबद्दल लोकमत अनुकूल दिसतं. उमेदवारांची निवड करताना त्यांनी ऐसपैस झाडू मारला आहे, त्यामुळेही पक्षाची नवी 'क्लीन' प्रतिमा प्रोजेक्ट करण्यात त्यांना बऱ्यापैकी यश मिळालं आहे. लोकसभा निवडणूक प्रचारात त्यांनी आनंदपूरसाहिब ठरावाची काठी विरोधकांना ठोकायला वापरली तसा वापर आता हेरगिरी प्रकरणाचा नि त्यामुळे देशाच्या स्थैर्यसुरक्षेला मिळणाऱ्या आव्हानाचा करता येईल. सत्याहत्तर सालअखेर आणि ऐंशी साल अखेर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये केंद्रात सत्ताधारी असलेल्या पक्षालाच राज्यातही सत्ता देण्याकडे मतदारांचा कल होता. तशीच हवा यंदाही निर्माण करण्यात राजीव यशस्वी होतील असं वाटतं.

निवडणूक तोंडावर आलेली असतानाचे महाराष्ट्रातले राजकीय प्रवाह हे असे आहेत. पुलोदला अनुकूल घटकांची संख्या जास्त दिसली तरी त्याचा परिणाम त्यांच्या विधान सभेतल्या जागा आहेत त्यापेक्षा थोड्या वाढण्यापुरताच दिसेल. सत्तेवर येण्याइतका मोठा जनमतकौल त्यांना मिळण्यासारखी स्थिती आज नाही. रामनामाच्या प्रभावानं समुद्रात दगडसुद्धा तरले होते म्हणतात. असा चमत्कार घडवायला हवं ते रामबाण व्यक्तित्व आज तरी काँग्रेसकडेच आहे. पुलोदकडे नव्हे. □

राजधानी दिल्ली

# आबालवृद्धांना धाडसी बनवणारी बससेवा

रोज सकाळी चहा पिताना, हवा चवीला खरपूस पेपर' असे मलाही नेहमी वाटते. किंबहुना पेपर वाचण्याची खरी मजा सकाळच्या पहिल्या चहाबरोबरच असते. अजून आसमंतात सर्वत्र जाग आलेली नसते, अशा वेळी चहाच्या तजेलदार घोटांबरोबर जगातल्या घडामोडींची एक एक बातमी वाचताना अधिक ताजेतवाने वाटत राहते. दिवस प्रहर जसजसा वर चढत जातो तसतसा तो पेपर जुना, शिळा वाटू लागतो. तो आधी आपण वाचलेला नसला तरी तो तसा वाटतो वर्तमानपत्राच्या बाबतीत असे का वाटते कुणास ठाऊक. पण वर्तमानपत्र हे सकाळीच वाचण्यात मौज असते. आज काल मात्र 'वर्तमान पत्र वाचण्यात मौज असते,' असे म्हणणे म्हणजे 'वदतो व्याघात' आहे.कारण वर्तमानपत्राच्या पहिल्याच पानापासून अनेक धक्कादायक बातम्या आपल्या मनावर आघात करीत जातात. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अशांत परिस्थिती, राजकीय पातळीवरील अस्थिरता आणि सामाजिक पातळीवरील अत्यंत क्रूर, निर्घृण, बेजबाबदार वा अकल्पित घटना आपल्याला या वर्तमानपत्रातून अक्षरशः रोज वाचायला मिळतात. अशा बातम्या सकाळच्या चहाबरोबर वाचताना तो पेपर 'खरपूस' न राहता 'करपून' गेलेला वाटू लागतो. मन ताजेतवाने होण्याऐवजी अस्वस्थ, बेचैन होते.

काही दिवसांपूर्वी मी सकाळच्या चहाबरोबर अशीच वर्तमानपत्र चाळत होते. पहिल्या पानावरील बातम्यांच्या शीर्षकांवरून नजर फिरवताना अचानक एका शीर्षकावर माझी नजर खिळली– 'D. I. C. conductor attacks St. Stephen's lecturer' (डी. टी. सी. च्या कंडक्टरने सेंट स्टीफन्सच्या अध्यापकावर केलेला हल्ला) काहीशा उत्सुकतेने आणि काहीशा चिंतेनेच मी ती बातमी वाचू लागले. कारण आमचा मराठी शिकणारा एक विद्यार्थी सेंट स्टीफन्स कॉलेजमध्ये लेक्चरर आहे. स्वभावाने अत्यंत शांत, अभ्यासू असणाऱ्या या विद्यार्थ्याबाबत काही अशी घटना घडणे शक्य नाही, असे एकीकडे मी मनाला बजावत असतानाच दुसरीकडे, त्याच्याच बाबतीत तर ही घटना घडली नसेल ना अशी शंकाही माझ्या मनात डोकावत होती. डी. टी. सी. च्या बाबतीत मात्र कुठेही काहीही घडण्याची शक्यता असल्यामुळे, काही सांगता येत नव्हते. मी ती संपूर्ण बातमी वाचली...आणि काय ?... माझा विश्वासच बसेना. सेंट स्टीफन्समधील हिस्टरीच्या लेक्चररबाबतच ही घटना घडली होती. म्हणजे तोच–आमचा विद्यार्थीच ! कुठल्याशा कारणावरून कंडक्टरने त्या सालस अध्यापकाच्या डोक्यात काठी मारली. (डी. टी. सी. चे कंडक्टर आपल्याजवळ काठ्याही बाळगतात, याचे ज्ञान मला ती बातमी वाचल्यानंतरच झाले.) त्या आमच्या विद्यार्थ्याच्या डोक्याला जबर मार बसला. डोक्यातून भळभळ रक्त वाहू लागले. त्याला

पृष्ठ २९ वर

## काँग्रेस ( इं ) ला बंडखोरीचा धक्का

# महाराष्ट्रात पुलोदची बाजू भक्कम

अभय गोखले

महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही दलातर्फे शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी कॉंग्रेस, जनता, शे. का. प. व भाजप यांनी एकत्रितपणे विधानसभेची निवडणूक लढविण्याचे ठरवल्याने आता विरोधीपक्ष कॉंग्रेस (इं)ला चांगली टक्कर देऊ शकतील निरनिराळे निकष लावून डझनभर मंत्र्यांना व पक्षाचे आमदारांना कॉंग्रेसने पुन्हा उमेदवारी नाकारल्याने त्यांच्यात जबरदस्त असंतोष निर्माण झाला असून बऱ्याच ठिकाणी ते बंडखोर म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. बळीराम हिरे, शिवाजीराव पाटील निलंगेकर, प्रतिभा पाटील इत्यादी मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीत असणाऱ्या बुजुर्गांना तिकिटे नाकारण्यात आली असली तरी त्यांच्या नातेवाईकांना तिकिटे दिल्याने त्यांना फारशी आदळआपट करता येणार नाही. चंद्रकांत त्रिपाठी, ललिताराव, पार्वती मलगोंडा इ. अमराठी मंत्र्यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली नाही ही गोष्ट मराठी माणसाला समाधान देणारी आहे. चंद्रकांत त्रिपाठी व ललिताराव यांनी बऱ्याच वेळा आपल्या मराठी द्वेष्टेपणाने महाराष्ट्रियन माणसांत चीड व संताप निर्माण केला होता. चंद्रकांत त्रिपाठी व ललिताराव हे महाराष्ट्रात मंत्रीपद उपभोगून उत्तरप्रदेशी मध्ये व कानडी लोकांचेच जास्त हितसंबंध पहात होते. सतीश पेडणेकर, सतीश चतुर्वेदी, सुरेश जैन या तरुण तुर्कांना तिकिटे नाकारल्याने कोणालाच वाईट वाटण्याचे कारण नाही. या लोकांची कॉंग्रेस निष्ठा किती बेगडी होती हे या लोकांनी दाखवून दिलंय. सतीश चतुर्वेदी हे अधिकृत कॉंग्रेसचे उमेदवारांविरूद्ध बंडखोरी करून उभे राहिले आहेत तर सुरेश जैन यांनी कॉंग्रेस (इं) चा राजिनामा देऊन विक्रमसिंग पाटणकरांप्रमाणे कॉंग्रेसची (स) उमेदवारी मिळवली आहे. या सर्व प्रकाराचा कॉंग्रेसच्या यशावर नक्कीच परिणाम होणार असून त्याचा फायदा उठवण्यासाठी पुलोद आघाडी सिद्ध झाली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीतील उमेदवारांचे दोर फक्त महाराष्ट्रातच कापले नसून हे धोरण सगळीकडेच अवलंबिले आहे. गुजराथ मध्ये मुख्यमंत्री माधवसिंग सोळंकी यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी सनत मेहता, प्रबोधरावळ जडेजा इत्यादी सिनियर मंत्र्यांना उमेदवारी देण्यात आलेली नाही. कर्नाटकात गुंडूराव, श्रीकांतय्या या बड्या नेत्यांना तिकिटे देण्यात आलेली नाहीत. अर्थात याचा अर्थ महाराष्ट्रात व गुजराथमध्ये कॉंग्रेस पुन्हा सत्तेवर आल्यास वसंतदादा पाटील व माधवसिंग सोळंकी मुख्यमंत्री होतील असा होत नाही. या दोघांच्या मार्गातील अडथळे बाजूला सारले असले तरी तो हायकमांडच्या धक्कातंत्राचा एक भाग आहे. त्यामळे निवडणुकीनंतर हे दोघेही मुख्यमंत्री होतील असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. सध्यातरी वसंतदादा आपल्या विरोधकांचा (स्वपक्षीय) काटा काढण्यात यशस्वी झाले आहेत. मात्र त्यामुळे स्वपक्षीय बंडखोरांच्या प्रखर विरोधाला तोंड देऊन आपल्या पक्षाचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आणण्याची मोठी जबाबदारी वसंतदादांवर येऊन पड़ली आहे. वसंतदादांनी हुषारीने खेळी करून आपल्या मोठ्या प्रतिस्पर्ध्यांना तोंडात बोट घालावयास लावले आहे. नाहीतर बळीराम हिरे, प्रतिभा पाटील यांना तिकिट मिळणार नाही असे पूर्वी कोणी भाकीत केले असते तर त्याला वेड्यात काढण्यात आले असते. त्या मानाने वसंतदादांचे फारच थोडे पाठिराखे तिकिट मिळविण्यात यशस्वी ठरलेले नाहीत. अर्थात राजीव यांचा वसंतदादांना पाठिंबा असल्यानेच ते चव्हाण, हिरे, आदिक, भोसले इत्यादी गटांवर मात करू शकले. वसंतदादांच्या विरोधामुळेच रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव मोहिते इत्यादींना तिकिट मिळू शकले नाही.

लोकसभेच्या निवडणुकीत समाजवादी कॉंग्रेस, जनता, शेकाप, भाजप यांना आपली खरी ताकद कळल्यानेच त्यांनी जागा वाटपाच्या बाबतीत जास्त ताणून धरले नाही व शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पुलोद आघाडी पुर्नजिवीत करून निवडणुका लढविण्याचा सुज्ञ निर्णय घेतला. त्याचा फायदा त्यांना नक्कीच होईल. शिवाय पुलोद सत्तेवर आल्यास मुख्यमंत्री पदाकरिता भांडणे होणार नाहीत याचा जनतेला दिलासा मिळेल. मागे जनता राजवटीत पुलोदचे मुख्यमंत्री शरद पवार असताना त्यांच्या मंत्रिमंडळाने चांगला कारभार केला होता. जनता पक्षातील निरनिराळ्या भांडखोर घटकपक्षांना सांभाळून कारभार करण्यात शरद पवार कमालीचे यशस्वी झाले होते. जी गोष्ट केंद्रात मोरारजींना जमली नाही ती गोष्ट महाराष्ट्रात शरद पवारांनी (ते जनता पक्षाचे नसतानाही) करून दाखवली याची नोंद जनतेने केली असणारच. लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांचा दारूण पराभव झाला तरी त्यांना मिळालेली मते दुर्लक्षित करण्यासारखी नव्हती. कॉंग्रेस (स) च्या उमेदवारांनी तर बऱ्याच ठिकाणी सत्तारूढ पक्षाच्या उमेदवारांना जोरदार टक्कर दिली. कॉंग्रेस (इं.) पक्ष लोकसभेच्या निवडणुकीत साधारणतः ५१ टक्के मते मिळवत असताना कॉंग्रेस (स)ने राज्यात १२ टक्के मते मिळवली तर भाजपने १० टक्के, जनता पक्षाने साडेसात टक्के, तर शेकापने २ टक्के मते मिळवली. अशा प्रकारे पुलोदमधील जनता, भाजप, शेकाप व कॉंग्रेस (स) मिळवून मिळालेल्या मतांची एकूण टक्केवारी होते ३२. विरोधकांना एकूण साठ मतदारसंघात इंदिरा कॉंग्रेस उमेदवारांपेक्षा जास्त मते मिळाली. त्यातील समाजवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांनी एकूण २६ मतदारसंघात आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा जास्त मते मिळवली. अर्थात बऱ्याच ठिकाणी विरोधक एकमेकांविरुद्ध लढल्याने त्यांची सर्वांची मते एकत्र केली तर आणखी चाळीस मतदारसंघात विरोधकांनी कॉंग्रेस (इं.) उमेदवारापेक्षा जास्त मते

मिळवली. याचा अर्थ विरोधक एकत्र झाल्याने त्यांचा बराच फायदा होणार आहे. या विरोधकांच्या आघाडीत प्रकाश आंबेडकरांचा भारतीय रिपब्लिकन पक्ष व दत्ता सामंतांची कामगार आघाडी आली असती तर लढत आणखी सोपी झाली असती कारण या दोन्ही पक्षांनी बऱ्याच ठिकाणी लक्षणीय मते मिळवली आहेत. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष आघाडीत नसले तरी फारसा फरक पडणार नाही.

### बंडखोरीचा फायदा

मध्य मुंबई (उत्तर), ईशान्यमुंबई, डहाणू, बुलढाणा, अकोला, नाशिक, जालना इत्यादी लोकसभा मतदारसंघातील बहुतेक विधानसभा क्षेत्रात एकत्रित विरोधी मतांची संख्या कॉंग्रेस (इं.) ला मिळालेल्या मतांपेक्षा बरीच जास्त होते; पण विरोधक एकमेकांविरुद्ध लढल्याने त्यांना या मतदारसंघात पराभव पत्करावा लागला. पुलोदमधील घटक पक्षात झालेल्या जागा वाटपानुसार सर्वात जास्त जागा अर्थातच कॉंग्रेस (स) ला देण्यात आल्या आहेत. कॉंग्रेस (स) एकंदर १२६ जागा लढविणार असून त्यातील ५ जागा मुंबई विभागातील, २ कोकणातील, ५५ उर्वरीत महाराष्ट्रातील, ३७ विदर्भातील, २७ मराठवाड्यातील आहेत. कॉंग्रेस (स) चे मुंबईत फारसे काम नसल्याने त्या पक्षाला मुंबईतील एकंदर ३४ जागांपैकी फक्त पाचच जागा देण्यात आल्या आहेत. अर्थात कॉंग्रेस (स) ची मुंबईतील ताकद पहाता पक्ष एकही जागा जिंकण्याची शक्यता नाही. कोकणातही नावाला दोन जागा पक्ष लढविणार आहे. उर्वरीत महाराष्ट्रात मात्र कॉंग्रेसची चांगलीच ताकद असून पुणे (ग्रामीण) खेड, बारामती, दौंड, मावळ वगैरे ठिकाणी पक्ष चांगली कामगिरी करू शकेल. विदर्भ व मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी कॉंग्रेस (इं) पक्षात बंडखोरी झाल्याने त्याचा फायदा उठवण्याच्या स्थितीत कॉंग्रेस (स) पक्ष आहे.

जनतापक्ष मुंबई विभागात १२, कोकणात १३, उर्वरीत महाराष्ट्रात २५, विदर्भात ४ व मराठवाड्यात ६ जागा लढवित आहे. मुंबईत दादर, माहिम, शीव, परळ, गोरेगाव, मालाड, जोगेश्वरी इत्यादी विधानसभा मतदार संघात जनतापक्षाचे कार्य चांगले आहे. मृणाल गोरे, प्राणलाल व्होरा, शरदराव, पिंटो इत्यादी उमेदवार निवडून येण्याची बरीच शक्यता आहे. भाजप आघाडीत असल्याने त्याच्या पाठिंब्याचा जनता उमेदवारांना बराच फायदा मिळेल. कोकणात जनतापक्ष १३ जागा लढवत आहे, त्यातील बहुतेक जागा राजापूर लोकसभा मतदारसंघातील आहेत. जगन्नाथ जाधव, सकपाळ, फिणसे, जयानंद गडकर हे पक्षाचे उमेदवार लोकसभेच्या वेळचा कल लक्षात घेता निवडून येण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत बहुतेक विधानसभा क्षेत्रात, राजापूर मतदारसंघात जनतापक्षाच्या मधु दंडवते यांनी आघाडी मिळवली होती. उर्वरीत महाराष्ट्रात पुणे, पुरंदर, मालेगाव इत्यादी ठिकाणी पक्ष चांगली कामगिरी करू शकेल. विदर्भ व मराठवाड्यात पक्षाला फारसा पाठिंबा नसल्याचे लोकसभा निवडणुकीत दिसून आले आहे. भारतीय जनतापक्ष मुंबई विभागात सर्वाधिक १७ जागा, कोकणात १० जागा, उर्वरीत महाराष्ट्रात १७ जागा, विदर्भात २० जागा, मराठवाड्यात ४ जागा लढवत आहे. मुंबईत भाजपचा बराच जोर असून लोकसभा निवडणुकीत जरी पक्षाचा दारूण पराभव झाला असला तरी या वेळेस जनतापक्षाचा पाठिंबा असल्याने व पक्षाने शिवसेनेची संगत सोडल्याने भाजपचे राम नाईक, प्रेमकुमार शर्मा, किरीट सोमय्या : नानुभाई पटेल, हशु अडवानी, वामनराव परब इत्यादी उमेदवार निवडून येतील असे वाटते. ठाणे विभागातही राम कापसे, जगन्नाथ पाटील, शितल हरचंदानी इत्यादी उमेदवार विजयी होण्याची शक्यता आहे. कोकणात गुहागर, रत्नागिरी येथील पक्षाचे उमेदवार यशस्वी होतील असे वाटते. पुण्यातील कसबा व शिवाजीनगर मतदारसंघात पक्षाला जिंकण्याचे चांगले चान्सेस आहेत. विदर्भात पक्ष २० जागा लढवत आहे यावरून त्याचे कार्य लक्षात घेण्यासारखे आहे. अकोला, मलकापूर, बुलढाणा या मतदारसंघातील विधानसभा क्षेत्रात पक्षाचे बरेच काम असून पांडुरंग फुंडकर, किसनलाल संचेती हे पक्षाचे आमदार याच विभागातील आहेत. नागपूरमध्येही इतर पक्षांच्या पाठिंब्याने भाजप चांगली कामगिरी करू शकेल. मराठवाड्यात पक्ष फक्त चारच जागा लढवत आहे. बीड, जालना, औरंगाबाद या मतदारसंघात पक्षाचे बरेच काम आहे. शेकाप कोकणात ६, उर्वरीत महाराष्ट्रात १३, विदर्भात ३ व मराठवाड्यात ९ जागा लढवत आहे. तसे पहायला गेल्यास शेकापक्ष आता रायगड जिल्ह्यात जोर धरून आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाचे उमेदवार दि. बा. पाटील निवडून आले ते अंतुले उभे राहिल्यानेच. अलिबाग, पनवेल, खालापूर, पेण मतदारसंघात पक्षाचे उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात परभणी विभागात, घाटावर कोल्हापूरमध्ये पक्ष तग धरून आहे मात्र या विभागात पक्षाचे उमेदवार जिंकण्याची फारशी शक्यता नाही.


वरील परिस्थिती पहाता शरद पवारांच्या नेतृत्वाखालील पुलोद आघाडी राज्यात चांगली कामगिरी करेल असे वाटते. लोकसभा निवडणुकीतील बऱ्याच जमेच्या बाजू या वेळेस इंदिरा कॉंग्रेसच्या बाजूला नसणार. सहानुभूतीची लाट आता ओसरली आहे. महिला मतदार लोकसभा निवडणुकीप्रमाणे कॉंग्रेस (इं) पक्षाला प्रचंड प्रमाणात मतदान करणार नाहीत. राष्ट्रीय प्रश्न बाजूला सारून राज्याचे जे प्रश्न व समस्या असतील त्याला मतदार मतदान करताना प्राधान्य देतील. मुख्य म्हणजे शरद पवारांच्या पुलोद आघाडीने जनता राजवटीत केलेला उत्तम राज्यकारभार लोकांसमोर आहे. तिकिट वाटपाच्या प्रश्नावरून कॉंग्रेस (इं) पक्षात मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस (इं) चा पराभव झाल्यास त्याचे बहुतेक श्रेय ह्या पक्षातील बंडखोरांनाच द्यावे लागेल.

# पुण्यातील तीन मतदारसंघ : पुलोद-भाजप आघाडीवर

## पर्वती : विश्वास गांगुर्डे

पुण्यातील लोकसभेच्या निवडणुकीतील जगन्नाथराव जोशींचा पराभव हा जरी वेगळ्या पार्श्वभूमीवरचा असला, त्याला जरी सार्वत्रिक पराभवाची जोड असली तरी जनसंघाचे जुने काम आणि पर्यायाने आजच्या भाजपासंबंधी विधानसभेच्या निवडणुकांच्या संदर्भात बोलायचे झाले तर भाजप पराभवाच्या धसक्यातून सावरतोय असे दिसते. निवडणुकींमधली विरोधकांच्यामधील कटुता पुलोदच्या निर्मितीने कमी झालीय. पुण्यात तरी पुलोद-प्रयोग चांगलाच यशस्वी ठरेल असे दिसतेय.

पर्वती मतदार संघातील भाजपाचे उमेदवार आहेत विश्वास कृष्णराव गांगुर्डे. भाजपाच्या दलित आघाडीवरील हा तरुण कार्यकर्ता. अल्पावधीत आपल्या कर्तृत्वाने पुढे आलेला. महाराष्ट्राचे चिटणीसपद त्यांच्याकडे आहे. कृष्णराव गांगुर्डे यांच्या सामाजिक परंपरेचा वारसा घेऊन समाजकार्यात रस घेणारे विश्वास गांगुर्डे हे संघ स्वयंसेवक असून पुण्यातील दलित झोपडपट्टी, ख्रिश्चन, मुस्लिम या समाजात त्यांनी आपल्या कार्यामुळे भाजपाला स्थान प्राप्त करून दिले आहे. पर्वती मतदार संघाचे भाजपाचे उपाध्यक्ष सायमन कृष्ण हे ख्रिश्चन समाजातील लोकप्रिय कार्यकर्ते आहेत. नईम शेख, नवाझ खान, अब्दुल रहेमान हे मुस्लिम कार्यकर्ते पर्वती भाजपाचे प्रमुख कार्यकर्ते आहेत. राजाभाऊ सालेकर हे लोकप्रिय नगरसेवक गांगुर्ड्यांची प्रचारआघाडी सांभाळत आहेत. या मतदारसंघात मातंग समाजाची २२००० मते आहेत दलित समाजातील इतरही वर्ग दहा हजारापर्यंत आहे. नवीन वसाहतीतून भाजपाचे काम मोठ्या प्रमाणात आहे. पूरग्रस्त वसाहतीतून म्हाळगींच्या वेळेपासून कार्य आहे. आ. अण्णा जोशी आणि अरविंद लेले यांनी सातत्याने पूरग्रस्त वसाहतीचे प्रश्न सरकारपुढे मांडून सोडविण्याचा प्रयत्न केलाय. त्यामुळे विश्वास गांगुर्डे यांना या खेपेला निवडून येण्याची शक्यता अधिक आहे. त्यांचा स्वतःचा जनसंपर्क सतत राहिल्यामुळे, ते याच भागातून निवडून आलेले नगरसेवक असल्यामुळे त्यांनी या भागातील प्रश्न सोडविण्याकडे अधिक लक्ष पुरविले. त्यांच्या जमेच्या बाजूबरोबरच कॉंग्रेसची येथली स्थिती शालुताई बुद्धिवंतांच्या बंडखोरीमुळे अवघड झाली आहे. शालुताई बुद्धिवंत या आय् कॉंग्रेसच्या. कठिण काळातही ज्यांनी पुण्यात आय् कॉंग्रेस टिकवली त्यापैकी प्रमुख. त्यांनाच पक्षाने तिकिट नाकारल्यामुळे त्यांनी बंडखोरी केली व त्या उभ्या राहिल्या आहेत. शरद रणपिसे हे चांगले कार्यकर्ते आहेत. परंतु ते येरवडा भागातील असल्यामुळे त्यांचा या मतदारसंघाशी संपर्क नाही. त्यामुळे त्यांच्याकडे व्यक्तिगत संबंधातील कार्यकर्तेच नाहीत.



जनतेचा 'विश्वास'

कार्यकर्त्यांचा फौजफाटा शालुताईंकडे. त्यामुळे कॉंग्रेसची मते या दोघात विभागली जाऊन त्याचा लाभ विश्वास गांगुर्डे यांना होईल. पुलोद आघाडीमुळे जनता आणि स. कॉंग्रेसचे कार्यकर्तेही गांगुर्ड्यांचे काम करीत आहेत.

भाजपासंबंधी विश्वासरावांशी बोलताना—

'मी निवडून येईन याबद्दल मला विश्वास आहे. कारण इथला दलित, इथला मुस्लिम—ख्रिश्चन, इथला झोपडपट्टीतला वर्ग यांच्यामध्ये भाजपाचे कार्य आहे. पूर्वी जनसंघ म्हणजे ब्राह्मणांचा पक्ष असा आरोप होत असे. खरं तर तो खरा नव्हता, पण आता भाजपाविषयी असं कुणी म्हणणार नाही. उलट याच पक्षात दलित समाजातील कार्यकर्त्यांना बरोबरीने वागविले जाते असे इतर पक्षातील दलित कार्यकर्ते माझ्याजवळ बोलतात. आता दलित समाजाला ही पार्टी आपली वाटते.'

आय् कॉंग्रेसच्या विजयाबद्दल बोलताना गांगुर्डे म्हणाले, 'त्यावेळचे संदर्भ वेगळे होते. तरुण राजीव गांधींची छाप, इंदिराजींची हत्या आणि मतदारांसमोर नसलेला पर्याय या सर्वांचा परिणाम त्यावेळी झाला. भाजपा कुठे कामात कमी पडला नाही. आताच्या निवडणुकीत संदर्भ बदललेत. महाराष्ट्राचाच विचार यात होतोय. स्थानिक प्रश्नांवर भर आहे. शिवाय भाजपापेक्षाही आमचा भर 'पुलोद' वर अधिक राहील. 'पुलोद' चा मागचा कारभार उत्तम आहे. केंद्रातील जनता सरकारप्रमाणे पुलोदची सत्ता भांडणामुळे गेली नाही, तर ते बरखास्त केले गेले. महाराष्ट्राला पुलोद प्रयोग मानवतो हे दिसले आहे.'

पर्वती कॅनॉलसंबंधी बोलताना गांगुर्डे म्हणाले, 'भाजपाच्या आमदारांनी वेळोवेळी यासंबंधी विधानसभेत प्रश्न विचारले आणि बंद नळातून पाणीपुरवठा करण्याची मागणी केली, पण खर्चाच्यादृष्टीने ती मागे पडून झोपडपट्टी स्थलांतराची योजना पुढे आली. आमचा तिच्या कार्यवाहीच्या पद्धतीला विरोध

होता. एक एक वस्ती सलगपणे हलवावी अशी मागणी होती, पण सार्वत्रिक आवाहनामुळे तसे न होता, सलग वस्ती हलण्याऐवजी व्यक्तिगत स्वरूपात लोकांनी उत्साह दाखविलाय.

**ज्यांनी प्रथम खाते उघडले त्या खटावकरबाई आणि श्री. मोहिते हे भाजपाचेच कार्यकर्ते आहेत.**

या स्थलांतरामुळे आमचा तोटा काही नसून उलट आमच्या पाठपुराव्यामुळेच ही मोठी योजना पुढे आली.'

पुण्यातील झोपडपट्ट्यांसंबंधी बोलताना गांगुर्डे म्हणाले, 'केवळ पक्ष पातळीवर झोपडपट्ट्यातून काम होत नसते. म्हणून झोपडपट्टी परिषद, समता परिषदेतर्फे आम्ही झोपडपट्टीतील प्रश्न सोडविलेत. यामधून भाजपाचे कार्य झोपडपट्ट्यांमध्ये खोलवर रुजले आहे. मी स्वत: दांडेकर पूल झोपडपट्टीतूनच निवडून आलोय. त्यामुळे या राखीव मतदारसंघात भाजपाच्या परंपरागत मतदारांबरोबरच दलित–झोपडपट्टीतील मते पडतील.'

पुण्यातील या तरुण उमद्या कार्यकर्त्याच्या आशावादाला प्रत्यक्ष कार्याची जोड आहे आणि काँग्रेस अंतर्गत बंडाळीचा लाभ मिळून ते निवडून येण्याची शक्यता खूपच आहे.

---

## शिवाजीनगर : लोकप्रिय आमदार अण्णा जोशी

---

पुण्यात आज केवळ पुलोदमध्येच नाही तर काँग्रेस आयच्या गोटातही हमखास निवडून येणाऱ्यात शिवाजीनगरमध्ये उभे असलेले आ. अण्णा जोशींची गणना केली जाते. निवडून आल्यानंतर प्रत्येक वर्षाचे अहवाल मतदारांना सादर करणारे अण्णा जोशी हे रामभाऊ म्हाळगींच्या पावलावर पाऊल टाकून पुढे चालले आहेत. मागच्याच काँग्रेस आयच्या उमेदवाराबरोबर या खेपेला त्यांची लढत असून त्या वेळच्या आणि आत्ताच्या परिस्थितीत खूपच फरक पडलाय. एकतर माडगूळकरांचा जनसंपर्क पूर्वीइतका आता नाही. ग. दि. माडगूळकरांच्या निधनामुळे त्यांच्या चाहत्यांची मते त्या वेळी माडगूळकर खेचू शकले. तसे आता काहीच नाही. शिवाय या मतदारसंघावर प्रभाव पाडणारे स्थानिक नेते श्रीकांत शिरोळे यांना तिकिट न मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहेच. मोहन जोशी या युवक काँग्रेसच्या नेत्याचा जोरदार प्रयत्न चालू होता; पण पडेल श्रीधर माडगूळकरांना उमेदवारी दिल्यामुळे अंतर्गत नाराजी वाढली आहे. त्या मानाने अण्णा जोशी यांच्याविषयी सार्वत्रिक आदर आहे. पुण्यातील कुणीही त्यांच्याकडे गेला तरी त्याचे काम होणारच अशी त्यांच्याविषयी सर्व पक्षियात भावना आहे. पुण्याच्या प्रश्नासंबंधी जागरूक आमदार असा त्यांचा लौकिक आहे. पुण्याच्या रहदारीचे प्रश्न, पुण्यात होणाऱ्या चोऱ्या–दरोडे यासंबंधीचे प्रश्न, पेश इमाम खून प्रकरणी त्यांनी सरकारला धारेवर धरून खुन्यांना तावडतोब अटक करण्यासाठी केलेली मागणी या सर्व कारणांनी आज सामान्य माणूस म्हणतो की, काँग्रेसच्या उमेदवाराला निवडून देण्याने तो माणूस पुन: इकडे फिरकणारही नाही; पण अण्णा जोशींनी आमची केलेली कामे आम्ही कशी विसरू? पुण्याच्या अस्मितेकरिता अण्णा जोशींना निवडून आणायलाच हवे. सामान्यांवरचा लोकसभेच्या वेळचा प्रभाव आता दूर होऊन पुण्यातील प्रश्न जर सोडवायचे असतील तर पुलोद विजयी होणे आवश्यक आहे असे मत कोथरूडसारख्या काँग्रेसच्या बालेकिल्ल्यातही आज आहे.

पुलोद स्थापनेचा लाभ अण्णा जोशींना अधिक होणार आहे. वडारवाडी जनवाडी आणि गोखलेनगर या भागात स. काँग्रेस प्रभावी आहे. कुसाळकर, वहिरट स. काँग्रेसचे कार्यकर्ते प्रत्यक्ष प्रचारकार्यात आघाडीवर आहेत. त्याचा लाभ अण्णांना होईल. स. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पुण्यातील क्रमांक एकने ही जागा पुलोद जिंकेल आणि याचे कारण जसे पुलोद आहे तसेच भाजपाचे अण्णा जोशी आहे.

आपल्या मतदारसंघाबद्दल बोलताना अण्णा जोशी म्हणाले,

'शिवाजीनगर मतदारसंघ हा सुविद्य लोकांचा मतदारसंघ आहे. आपली मते विचार करूनच टाकणारा मोठा वर्ग येथे आहे. त्याला मतदानास प्रवृत्त करण्यात आमचा प्रयत्न राहील. नेहमी होणारे जे भाजपाचे मतदान आहे ते होणारच ;परंतु आता पुलोदच्यामुळे अन्य पक्षियांचे कार्यकर्ते प्रत्यक्ष कामाला लागलेत. शरद पवारांचे उमदे नेतृत्व लाभल्यामुळे काँग्रेसच्या तुलनेत पुलोद सरस ठरत आहे.'

जगन्नाथरावांच्या पराभवाची मीमांसा करताना अण्णा जोशी म्हणाले, 'एक गोष्ट मान्य करायलाच हवी. ती म्हणजे मतदारांचा कल इंदिराजींच्या हत्येमुळे कुठे आहे हे ओळखता आले नाही. जगन्नाथराव हे उमेदवार या अर्थाने श्रेष्ठ असूनही; पण झोपडपट्टी वासीयांपर्यंत त्यांचे नाव आणि कार्य पोहोचविण्यात आम्ही कमी पडलो. त्यांना जगन्नाथराव नवीन. शिवाय उद्योजक व्यावसायिक यांची दिल्लीतली सरकारदरबारची कामे काँग्रेस उमेदवार ज्यापद्धतीने करू शकतील तसा जगन्नाथरावांचा उपयोग होणार नाही. त्यामुळे व अशा अनेक व्यावहारिक कारणांनी जगन्नाथरावांचा पराभव झाला. शिवाय विनाकारण झालेली तिरंगी लढत. धारियांनी पुण्यातून निवडणूक लढविण्याचे कारणच नव्हते. मागच्या वेळेला त्यांनी बारामतीतून निवडणूक लढविली होती. त्यात जनता पक्षातही ते नव्हते. जर समझोता झाला असता तर या परिस्थितीत निवडून आलो असतो की नाही हे सांगता येत नाही; पण खूपच फरक पडला असता.'

हिंदुत्वाची लाट सर्वत्र दिसत असताना त्याचा लाभ भाजपाला का मिळाला नाही यावर बोलताना अण्णा म्हणाले, '१९५२ ला सेक्युलॅरिझमची हवा होती. खरे तर फाळणी झालेली, देशाचे तुकडे ज्या काँग्रेसने केले. त्यांना जनतेने झिडकारायला हवे होते; परंतु निधर्मीवादाचा प्रभाव काँग्रेसने जनमतावर पाडला आणि भरघोस यश मिळाले. त्या वेळी आम्ही अखंड हिंदुस्थान, गोहत्याबंदी या विषयावर लढलो. त्या वेळी ज्या कारणांनी आम्ही मते खेचू शकलो नाही तीच कारणे म्हणजे राष्ट्रीय एकता, अखंडता, हिंदूरक्षण इत्यादी काँग्रेसला या निवडणुकीत विजयाला कारणीभूत झाली आणि भाजप या त्याच्या मूळ ध्येयापासून दूर जातोय की

काय असे लोकांना वाटले. ज्या वेळी बी. जेपी 'एकला चलोरे' भूमिका घेऊन जन्माला आला, त्या वेळी लोकांना आघाडी हवी होती. विरोधक 'एकत्र' रहावेत असे वाटत होते आणि ज्यावेळी भाजपने आता आपली वाटचाल स्वतंत्रपणे करावी असे लोकांना वाटू लागले त्या वेळी आघाडी आणि युत्यांचे राजकारण केन्द्रात सुरू झाले. त्यामुळे लोकमताच्या नेमकी उलटी पावले पडल्यासारखे केव्हा केव्हा लोकांना वाटते. शिवाय पंजाबसंबंधीची भाजपाची मते वेळोवेळी जाहीर होऊनही, प्रचारसाधने, दूरदर्शन आकाशवाणीद्वारा कॉंग्रेसच्या अपप्रचाराचा परिणाम झाला. कॉंग्रेसच्या दिल्लीतील खासदारांनी अल्पसंख्यांकांना धमक्या देऊन 'सत्तारूढ पक्षाच्या विरोधात गेलात तर शिखांप्रमाणे होईल' अशा प्रकारे धमक्या देऊन मतदान घडविले. मतदार यादीतील नावाप्रमाणे दिल्लीत शिखांना बाहेर काढून त्यांची हत्या झाली. यामुळे भीतीपोटी मतदान झाले.'

साधनांच्या बाबतीत विसंगत लढाईचे वर्णन करताना ते म्हणाले– 'पुणे शहराचे बजेट २४ कोटीचे असते तर कॉंग्रेसचे जाहिरातीचे बजेटच २७ कोटीचे होते. एकीकडे 'मिस्टर क्लिन' असा किताब मिरवत असताना ही परिस्थिती काय सांगते? रेल्वे–विमाने–हेलिकॉप्टर यांची सर्व तैनात सत्तारूढ पक्षाला आणि विरोधकांनी आपला प्रवास पायी करायचा? पैसे भरून सुद्धा शरद पवारांना हेलिकॉप्टर मिळू शकले नाही. विरोधी पक्षियांनी दगडधोंडे खात प्रचार करायचा! देशाच्या नेत्याच्या सुरक्षिततेबरोबरच विरोधी नेत्यांच्याही सुरक्षिततेच्या प्रश्नाकडेही गंभीरपणे पाहिले पाहिजे.त्यामुळे ही अत्यंत विसंगत लढाई आहे.'

पुण्यासंबंधी बोलताना अण्णा जोशी म्हणाले– 'पुण्याचे काही महत्त्वाचे प्रश्न आहेत. पिण्याचे पाणी उघड्या कॅनॉलमधून मिळते ते बंद पाईपलाईन मधून आणावे या साठी गेली कित्येक वर्ष आम्ही सरकारबरोबर भांडतोय. आज त्याला अल्पप्रमाणात का होईना यश येत आहे. रामभाऊ म्हाळगींपासून पूरग्रस्तांच्या घरांचा जो प्रश्न होता तो आम्ही सोडविला आहे. आता पूरग्रस्तांच्याच मालकीची घरे होणार आहेत. एक लाखाच्यावर असलेल्या या वसाहतीत सातत्याने भाजपाने प्रश्न सोडविले आहेत. पुण्याच्या विकासासाठी प्रत्येक मतदारसंघाला दहा लाख रु. याप्रमाणे ६० लाख रु. अनुदान आम्ही मिळवून दिले आहे. रहदारीचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी होळकर पूल आणि बंडगार्डन पूल करण्यासाठी सतत पाठपुरावा केला. राहूरी कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा प्रश्न सरकारी पातळीवर सतत पाठपुराव्याने सोडविल्यामुळे दहा हजार कर्मचारी आता नोकरीत कायम होणार आहेत. अशा प्रकारे प्रमुख प्रश्न–ज्यांचा पुण्याशी संबंध आहे.'

शिवाजीनगर मतदार संघ पुलोदच्या मागेच जाणार असे दिसते, त्या करता सर्वपक्षिय कार्यकर्ते आज झटताना दिसत आहेत. अंकुश काकडे, खा. सुरेश कलमाडी हे प्रत्यक्ष प्रचारात भाग घेत आहेत. त्यामुळे भाजपाची ही जागा कायम राहील यात संशय नाही.

अमेरिकन सरकारच्या निमंत्रणावरून महाराष्ट्र विधिमंडळातील आमदारांचे एक शिष्टमंडळ अध्यक्षीय निवडणुकांच्या निरीक्षणासाठी गेले होते. त्यात अण्णा जोशींचा समावेश झाला होता. ही त्यांच्या विधानसभेतील कार्याची एक प्रकारे प्रशस्तीच होती.

## कसबा : प्रतिष्ठेची जागा डॉ. अरविंद लेले

पुलोद आघाडीची म्हणजेच पर्यायाने त्यातील घटकपक्ष या नात्याने भाजपची सर्वात प्रतिष्ठेची जागा कोणती असं जर कुणालाही विचाराल तर उत्तर एकच येईल. कसबा! डॉ. अरविंद लेले यांची.

मतदारसंघ पुनर्रचनेत पूर्वीच्या जनसंघाच्या बालेकिल्याचे दोन भाग करून दोन वेगवेगळ्या संमिश्र मतदारांचे मतदारसंघ बनविण्यात आले; पण त्या दोन्हीतही भाजपाच आज प्रबळ दिसत आहे. पूर्वीच्या शुक्रवारचा मोठा भाग कसब्यात आल्याने, तसा हा सुधारित शुक्रवारच मतदारसंघ आहे. ज्याला कॉंग्रेसचा परंपरागत बालेकिल्ला म्हणता येईल असा हा मतदार संघ भाजपाचा प्रतिष्ठेचा बनला आहे. या मतदारसंघात 'मंडई विद्यापीठ' आहे, दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ, सुवर्णयुग तरुणमंडळ आहे, जिथून कॉंग्रेसचे कार्यकर्ते तयार होऊन बाहेर पडले अशी ही मंडळे. याच मतदारसंघात पुण्याची सर्वात दाट लोकवस्ती आहे. व्यापारी, तांबट, लोहार, भोई, कुंभार, बोहरी मराठा, शिंपी, ब्राह्मण अशा विविध जातीजमातींचा भरपूर भरणा असलेला हा मतदार संघ सतत गजबजलेला असतो.

डॉ. अरविंद लेले हे ऐंशी साली तिरंगी लढतीत त्यावेळी निवडून आले. या मतदार संघातून दोनदा निवडणूक जिंकलेल्या लेल्यांची स्थिती पुलोदमुळे भक्कम दिसत आहे. जनसंघाचे शहराचे जुने संघटन मंत्री. शिस्तप्रिय लेल्यांची पक्ष संघटनेवरील पकड उत्तम असल्याने कोणत्या कार्यकर्त्याला कसे आणि कुठे कामाला लावायचे हे ते जाणतात. काहीसे परखड आणि स्पष्ट बोलणारे लेले हे पुणेकरांचे अस्सल प्रतिनिधी शोभतात! मंडई परिसरात वास्तव्य असलेल्या लेल्यांचा जनसंपर्क मोठा आहे. गेल्या वर्षीच्या हृदयावरील 'बायपास' शस्त्रक्रियेमुळे या जनसंपर्कात खंड पडल्यासारखा दिसतो; परंतु रामभाऊ म्हाळगींच्यानंतर संघनेच्या पठडीत बसणारे लेले लवकरच लोकप्रिय आमदार झाले. महाराष्ट्र विधानसभेतील लेले आणि जोशी ही जोडी म्हणजे राम लक्ष्मणाचीच आवृत्ती ठरावी. पुण्याच्या प्रश्नांचा पाठपुरावा करून या जोडीने पुण्याच्या सुधारणात आणि लौकिकात भर टाकलीय.

लोकसभेच्या निवडणुकीत गाडगीळांनी या मतदारसंघात प्रथमच कॉंग्रेसला ४४००० इतकी मते मिळवून दिली. पण हे अपवादात्मकच. या मतदारसंघात भाजपाचे असे ३० हजार मतदार आहेत.सध्याच्या पुलोदचा लाभ डॉ.लेल्यांना होईल.या तीस हजारांमध्ये किमान पंधरा ते वीस हजारांची भर पाडण्याचे काम लेल्यांना करायचे आहे आणि त्यासाठी या मतदारसंघातील इतर उमेदवारांकडे पहावे लागेल. कॉंग्रेसने या खेपेला 'आयाराम' उल्हास काळोखेंना तिकिट देऊ केलंय. पूर्वाश्रमीचे शिवसेनेचे काळोखे हे कॉंग्रेसवासी

झाल्यावर त्यांना तिकिट मिळाल्यामुळे काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात तीव्र नाराजी पसरली आहे. माजी महापौर आणि लेल्यांशी लढायला तुल्यबळ ठरतील असे वसंतराव थोरात यांनी उमेदवारीकरिता प्रयत्न केले होते; परंतु नवनिर्वाचित खासदारांकडून त्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. जुन्या जाणत्या अनुभवी थोरातांना डावलण्याचे परिणाम आता उल्हास काळोखेंना भोगावे लागणार. मंडई विद्यापीठाचे वसंतराव थोरात हे अनभिषिक्त कुलगुरू आणि त्यांच्यातील बदलामुळे 'हिंदूहित' पहाणारे वसंतराव विरूद्ध हिंदुत्ववादी लेले अशी लढत ही मोठीच रोमहर्षक झाली असती आणि लेल्यांना ती जडही गेली असती. अशा परिस्थितीत वसंतरावांना डावलल्याने आयाराम काळोखे यांना पाडण्याची संधी काँग्रेसजनच घेणार आहेत असे दिसते.

या ठिकाणी काळोखेंना आपली जागा दाखविण्यासाठी शिवसेनेने मोर्चे बांधले असून श्री. अप्पा थोरात हे आपल्या अस्तन्या सरसावून या 'गयाराम'ला आपली जागा दाखविण्यासाठी उभे आहेत ! त्यात अप्पा थोरात हे वसंतरावांचे बंधू ! म्हणजे जखम अगदी जिव्हारी झालेली· वरती मंडई गणपती-विरूद्ध दगडूशेठ 'हलवाई' गणपती अशी चढाओढ. हा सर्व स्पर्धेचा हिशोब या कसबा मतदारसंघात मांडला जाणार असं दिसतंय. या दोघांच्या या लढतीत आपल्या संघटन कौशल्यावर विधानसभेतील व उत्कृष्ट कामगिरीवर लेले मात करू शकतील असे वाटत असले तरी सर्वांत जास्त प्रयत्न याच ठिकाणी करावे लागतील. तिरंगी लढतीचा लाभ कसा घेता येईल यावर अवलंबून आहे.

डॉ. लेले यांच्याशी पुण्यातील भाजपाच्या स्थितीसंबंधी बोलताना ते म्हणाले. '७२ साली विधानसभेच्या पाच मतदारसंघात ७०७७ मते पडली. ही जनसंघाची खास मते कारण आत्ताही ८० च्या इंदिरा लाटेतही ही मते भाजपाला पडली. सहा मतदारसंघातील एकूण मतदान ७८ हजार पडले आणि दोन आमदार निवडून आले. एक अल्पमतांनी पडला. (विश्वास गांगुर्डे) आणि आता जगन्नाथरावांना १,१२००० मते पडली. म्हणजे याही खेपेच्या राजीव–इंदिरा सहानुभूतीच्या लाटेत जगन्नाथरावांना भाजपाची सर्व मते पडली. शिवाय त्यात ३२ हजारांनी वाढ झाली. त्यामुळे भाजपाची मते काँग्रेसला पडली, हिंदुत्ववाद्यांची मते काँग्रेसला पडली वगैरे भ्रम आहे. वस्तुस्थिती ही अशी आहे भाजपाच्या मतांची विभागणी झाली नसून त्यात वाढच झाली. मात्र त्यात म्हणावी तेवढी वाढ झाली नाही हे खरे.'

पुलोद कसे काय बनू शकले यावर डॉक्टर लेले म्हणाले, 'लोकसभेच्या वेळचा अनुभव लक्षात घेऊन काहींनी आपला अहंकार सोडल्यामुळेच पुलोद शक्य झाले. त्यात शरद पवारांच्या नेतृत्वाने सर्वांना एकत्र आणले आणि पुलोदचे शासन लोकांना मान्य झालेले असल्याने पवारांचे नेतृत्वाखाली चार पक्ष एकत्र आले. समान कार्यक्रमावर आधारित आपापली पक्ष वैशिष्ट्ये न सोडता एकत्र येणे शक्य झाले.'

भाजपाच्या धोरण विषयक बाबींवर बोलताना काश्मिर प्रश्नावर विषय झाला. डॉ. लेले म्हणाले, 'भाजपाच्या काश्मिर विषयक धोरणात काहीही फरक झाला नसून फारुक अब्दुलांच्या बेकायदेशीर बरखास्तीला आम्ही विरोध केला. मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे प्रयत्न आज भाजपाशिवाय कोण करीत आहे...? भाजपाचे हे धोरण जनसंघापासूनच आहे. अरिफबेग हे जनसंघाचे संघटनमंत्री होते. त्यामुळे मुस्लिमांच्या विषयीच्या धोरणाने भाजपाचा पराभव झाला. वगैरे म्हणणे चूक आहे.'

राजीव गांधींच्या तरुणांना प्राधान्य या धोरणावर टीका करताना लेले म्हणाले की, 'आमचा आग्रह 'जबाबदार' युवक नेतृत्वाला प्राधान्य देण्याचा आहे. नागपूरमध्ये स्त्रियांशी असभ्य वर्तन करणाऱ्या युवकानाच राजीव गांधींनी प्राधान्य दिल्याचे दिसते आहे. आमचा भर तत्त्वज्ञानावर आहे कार्यक्रमावर आहे. आज आम्ही 'पुलोद'च्या नावावरच निवडणूक लढवीत आहोत. पुलोद वरच आमचा प्रचाराचा भर रहाणार आहे. भाजपापूर्वी जनसंघाचे ४–५ चच आमदार निवडून येत असत. गांधीवादी समाजवादाच्या स्वीकारानंतर १४ आमदार निवडून आले. परंतु पूर्वीचा यथार्थवाद, त्यानंतरचा एकात्म मानववाद आणि आताचा गांधीवादी समाजवाद ही प्रगत होत गेलेली विचारांची दिशा आहे. एकामध्ये दुसरे अंतर्भूत आहे.'

### श्रम विरुद्ध पैसा
### –बिंदू माधव जोशी

पुण्यातील भाजपासंबंधी बोलताना ग्राहक पंचायतीचे नेते बिंदुमाधव जोशी म्हणाले 'जगन्नाथरावांच्या वेळेला भाजपाचे कार्यकर्ते सर्वदूर काम करू शकले नाहीत. कार्यकर्त्यांचे रान उठवू शकले नाहीत. पुण्याच्या सर्व वॉर्डात कार्यकर्ते असलेला भाजप हा एकमेव पक्ष आहे; पण भाजपाच्या कार्यकर्त्यांचा टाइप असा आहे की, त्याला नेमके काम द्यावे लागते. तरच तो काम करतो. कामाचे असे नियोजन झाले नाही तर 'मॅनपॉवर' रिकामी रहाते. काँग्रेसकडे प्रचंड आर्थिक पाठबळ आहे तर भाजपाकडे कार्यकर्त्यांचे पाठबळ आहे. या लढ्यात कार्यकर्त्यांना कामाला लावण्यात यश मिळविले तर यश मिळणे अवघड नाही. ही श्रम विरूद्ध पैसा अशी लढाई आहे. भाजपाचे तीनही उमेदवार हे प्रत्यक्ष कार्यकर्ता उमेदवार आहेत. अण्णा जोशी आणि अरविंद लेले या दोघांचा परफॉर्मन्स उत्तम आहे. पुण्याचे प्रतिनिधीत्व ज्यांनी करावे असेच हे उमेदवार आहेत. पुण्यातील पुलोदचे भाई वैद्य हे असेच आहेत. त्यामुळे त्यांचाही उल्लेख करावा लागला.

–गिरीश प्रभुणे

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

ह्या ना त्या निमित्ताने...

# आता पानिपतचे चवथे...

फिरोझ रानडे

'ह्या जुन्या कॉंग्रेस पुढाऱ्यांचं चांगलंच पानिपत केलं की, आमच्या राजीवजींनी !' मोठ्या उत्साहात व आनंदात म्हणत तरुण कामत श्यामच्या घरात प्रवेश करता झाला.

राधा आज संध्याकाळी बाहेर कोठे तरी काही तरी खरेदी-बिरेदीला गेली होती. त्यामुळे श्याम घरी एकटाच होता. सकाळपासून त्याचेही मन ह्या विषयावर बोलण्याकरता खवखवत होते आणि राधा तर घरात नव्हती.

बायको ही पत्नी, प्रिय शिष्या, सचिव वगैरे असते वा असायला पाहिजे असे कालिदासाने म्हटले आहे. पण ते पूर्वीच्या काळात. आजकालच्या त्या कालिदासी यादीत बायको श्रोता असते हेही जोडायला पाहिजे. नवऱ्याचे सगळ्या विषयावरचे विचार, टीका-टिपणी वगैरे त्या बिचारीला कधी शांतपणे व कधी अशांतपणे पण ऐकून घ्यायलाच लागते.

राधा हे श्रोत्याचे कर्तव्य मोठ्या तत्परतेने पार पाडत असे. अर्थात ती नेहमीच काही शांत श्रोत्याची भूमिका पार पाडत नसे. बहुतेक वेळा ती अशांत श्रोताच असे. पण बंगालीतल्या 'अगदीच मामा नसण्यापेक्षा चकणा मामा परवडला' ह्या म्हणीप्रमाणे अगदीच श्रोता नसण्यापेक्षा राधा सारखा अशांत तर अशांत पण श्रोता आहे ना, अशी राधाबद्दल श्यामची भावना होती.

पण ती सखी, प्रियशिष्या, श्रोती वगैरे बहुगणी बायकोच मुळी आज घरात नव्हती. आणि आपले विचार सांगण्याकरता श्याम तर अतिशय हपापलेला होता. त्यामुळे कामत आल्याचा श्यामला खूप आनंद झाला. त्याने येता येताच त्याच्या मनातल्या विषयाला व पानिपतच्या युद्धाला हात घातल्यावर तर श्यामचा आनंद अगदी गगनात म्हणजे मुंबईत जे काही आजकाल गगन शिल्लक राहिले आहे त्या गगनात मावेनासा झाला.

कॉंग्रेसच्या जुन्या पुढाऱ्यांचं राजीवजींनी अगदी पानिपत करून टाकलं ह्या वाक्याचा जो काही अर्थ सर्वसामान्य मराठी माणसाच्या मनात एका झटक्यात आला असता तसाच. व त्या झटक्यातच श्यामच्या मनात पण आला.

इतिहासाची हीच तर मोठी गंमत आहे. मुळात इतिहासच पुष्कळ लिहिला गेला आहे. आणि इतिहास हा विषय वा त्या विषयाला धरून जितके लिखाण केले गेले आहे तितके दुसऱ्या कोणत्याही विषयावर लिहिले गेले नसेल. ज्याला राजकारण वा समाजकारण करायचे असेल त्याचा इतिहास हा विषय फार पक्का असायला पाहिजे असे नेहमी बोलले जाते.

आता श्यामसारख्या सर्वसामान्य माणसाला राजकारण वा समाजकारण करायचे नसले तरी त्याचा इतिहास पास होण्याइतपत पक्का असतो. त्यातून मराठी माणसाचा तर काही इतिहासी घटनांचा अभ्यास फारच पक्का असतो. ध चा मा म्हणजे काय, तो कोणी केला, कसा केला, केव्हा केला, त्या बद्दल काय प्रायश्चित घ्यायला सांगितले गेले हे कोणीही मराठी माणूस कधीही विसरू शकत नाही.

'गड आला पण सिंह गेला' ह्यातला कोणता गड आला व कोणता सिंह गेला हे मराठी माणसाला सांगावे लागत नाही. त्याचप्रमाणे कोणाचे पानिपत झाले म्हणजे काय झाले हे ही मराठी माणसाला वेगळे सांगावे लागत नाही.

'थांब, थांब' श्याम कामतच्या पानिपती उत्साहाला लगाम घालत म्हणाला. 'आपण आपल्या स्वातंत्र्य-सैनिकांना बोलाऊ या. ह्या विषयाला त्यांचेशिवाय रंग भरणार नाही वा रूप पण येणार नाही.'

स्वातंत्र्यसैनिक म्हणजे शेजारचे बर्वे हे सगळ्या लोकांप्रमाणे कामतलाही माहीत होते. त्याने संमतीदाखल आपली मुंडी हालवली.

श्याम आपल्या बाल्कनीत आला. बर्व्यांच्या बाल्कनीत त्यांची सून आपल्या नवऱ्याची म्हणजे बर्व्यांच्या मुलाची कचेरीतून येण्याची वाट पहात होती.

'वहिनी, जरा बर्वे-गुरुजींना पाठवता का ? म्हणावं खालचा कामत आला आहे.' श्याम त्या सुनेला म्हणाला.

आपला नवरा घरी येईल त्यावेळी. आपले सासरेबुवा- म्हणजे बर्वे-गुरुजी घरी नसण्याचे त्या सुनेचे फार फायद्याचे होते. ती लगबगीने म्हणाली, 'हो, हो, पाठवते तर. लगेच पाठवून देते.' असे म्हणून ती आपल्या घरात गेली व श्याम आपल्या घरात आला.

मिनिटा दोन मिनिटात बर्वे-गुरुजी श्यामच्या घरात येऊन दाखल झाले.

'या गुरुजी !' श्यामने व कामतने एकदमच व एकाच आनंदात त्यांचे स्वागत केले. खरं म्हणजे ते दोघेच काय पण सोसायटीतले सगळे लोक बर्व्यांना नेहमी 'बर्वे' असेच म्हणत, पण त्यांना खुलवायचे असले म्हणजे त्यांना 'गुरुजी' म्हणावे लागते हे श्यामला व कामतला चांगले माहीत होते.

त्यांच्या कल्पनेप्रमाणे बर्वे खूप खुष झाले व सोफ्यावर बसता बसता म्हणाले, 'हाँ, काय म्हणता आहात कामत ?'

'मी काय वेगळे म्हणणार ? बाकी सगळे जग म्हणते आहे तेच म्हणतो आहे.' कामतने उत्तर दिले. कामतला बर्व्यांबद्दल फारसा आदर नव्हता.

'अहो जग शेकडो गोष्टींबाबत बोलत आहे- अगदी भाईंदरहून खास गाड्या सोडण्यापासून ते हेरगिरी प्रकरणापर्यंत. तुम्हाला त्यातल्या कोणत्या गोष्टींबद्दल काय बोलायचे आहे ?'

आता चर्चा रंगणार व राधा उणे असूनही आपली आजची संध्याकाळ अधिक करमणुकीची होणार ह्याची श्यामला खात्री वाटली. त्या खात्रीचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागला. आता आपण थोडा पुढाकार घेतला म्हणजे झाले, ह्या विचाराने तो बर्व्यांना म्हणाला,

'कामत म्हणतो आहे की जुन्या काँग्रेसवाल्यांचं राजीव गांधींनी चांगलेच पानिपत केले म्हणून.'

आता बर्वे पण कामत व श्यामसारखे मराठी असल्यामुळे जुन्या पुढाऱ्यांचे पानिपत झाले म्हणजे काय झाले हे त्यांना वेगळे सांगायची गरज नव्हती.

खरं म्हणजे पानिपतची तीन युद्धे झाली, पण त्यातले मराठ्यांना जाणवेल असे फक्त तिसरेच होते. तेव्हा कोणाचे पानिपत झाले म्हणजे तिसरे पानिपत झाले हेच सगळ्यांच्या लक्षात येते.

ह्या युद्धात मराठ्यांचा चांगलाच पराभव झाला. त्या पराभवाचे व नुकसानीचे वर्णन करताना कोणा बखरकाराने असे म्हटले होते की, दोन मोती गळाले, रुपया, पैश्याचा खुर्दा किती गेला त्याचा हिशोबच नाही' वगैरे वगैरे.

'नाही,महाराष्ट्रातल्या १००, १२५ जुन्या आमदारांना व भारतातल्या शेकडो आमदारांना व कित्येक मंत्र्यांना राजीवजींनी तिकिट दिले नाही, त्यांचा अगदी सफाया केला त्याबद्दल मी म्हणत होतो की, त्यांचे अगदी पानिपत केले म्हणून.' कामतने आपले म्हणणे मांडले.

जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांना, आमदारांना, मंत्र्यांना निवडणुकीची तिकिटे न देण्याबाबत राजीव गांधींनी जो निर्णय घेतला होता. त्याचे वर्णन कामत म्हणत होता त्याप्रमाणे खरोखरच पानिपत झाले असेच करायला लागले असते.

तिसऱ्या पानिपतच्या युद्धात जसे दोन मोती गळाले होते व पैशाचा अगणित खुर्दा गहाळ झाला होता त्याचप्रमाणे ह्या पानिपतातही एक–दोन 'हिरे' गमावले गेले होते 'रत्न' तर काय डझनानी गेली होती व रुपया नयापैशाचा खुर्दा तर अगणितच होता.

आता स्वातंत्र्यसैनिक पेचात पडले. नाही म्हटले तरी त्यांचे मन थोडेसे जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांकडे व आमदारांकडे होते व थोडेसे राजीव गांधींकडे होते. बर्वे काहीच बोलत नाहीत हे बघून श्याम त्यांना म्हणाला,

'आता ह्या पानिपतात आणि त्या पानिपतात थोडा फरक आहे, नाही असे नाही. पहिला फरक म्हणजे पानिपतचे युद्ध फक्त पानिपताच्या रणांगणावर लढले गेले. तर आजचे साऱ्या हिंदुस्थानभर लढले गेले. दुसरे म्हणजे पानिपतात फक्त मराठ्यांचेच मोती–रुपये–पैसे गेले, ह्यावेळी सगळ्या भारतातला हिरे–मोती, खुर्दा गेला.

'आणि मुख्य म्हणजे हे पानिपत गांधींच्या कोणाका गांधींनी केलेले असेना– अगदी अहिंसक पद्धतीने झाले. म्हणजे इतका संहार होऊन सुद्धा रक्ताचा एक थेंबही सांडला गेला नाही.'

श्यामच्या बोलण्यातला खडूसपणा बर्व्यांच्या लक्षात आला नाही असे नाही; पण त्यांचेच हिरे–मोती व इतर नाणी खोटी होती. त्यांना कोणाची बाजू घ्यावी ते कळेना. जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांची की, राजीवजींची ?

तेव्हा पूर्वीची गुरूजी व आचार्य मंडळी जशी कठीण समयो महाभारताकडे वा भगवतगीतेकडे धाव घेऊन त्यातली उदाहरणे देऊन, काहीतरी मोघम बोलून उगाचच उत्तर दिल्यासारखे करत त्याप्रमाणे करत बर्वे गुरूजी म्हणाले,

'अगदी पानिपत झाले असे म्हणता यावयाचे नाही. आपल्याकडे असले प्रसंग महाभारतात, रामायणात पुष्कळ वेळा आले आहेत. भगवंतांनी गीतेत म्हटल्याप्रमाणे...

एवढे बोलून बर्वे–गुरूजी थांबले. भगवंतांनी गीता सांगून अर्जुनाचा फक्त एकदाच काय तो फायदा झाला असेल पण हिंदुस्थानातल्या शेकडो पुढाऱ्यांचा, आचार्यांचा, गुरूजींचा, प्राध्यापकांचा वेळोवेळी होणाऱ्या शेकडो वाग्युद्धात असंख्य वेळा फायदा झाला आहे.

पण आताच्या प्रसंगाला योग्य अशा वेळकाढू उत्तराकरता लागणारा महाभारतातला दाखला त्यांना आठवेना. गीताही त्यांचे कामी आली नाही. कारण गीता ही युद्धाकरता सांगितली गेली होती, निवडणुकीकरता नाही.

बर्वे–गुरूजी बोलायचे थांबले तरी त्यांच्या महाभारताच्या उल्लेखाने श्यामची ट्यूब लागली. तो मोठ्या आनंदात म्हणाला,


'खरे आहे तुमचे म्हणणे. महाभारतात आजच्या परिस्थितीला योग्य असा दाखला आहे. ह्याला अगदी पानिपतच म्हणायची गरज नाही. ह्याला महाभारतकालीन यादवी युद्ध म्हणणे जास्त योग्य होईल.

'आता यादवी युद्धात जसा यादवांचा समूळ नाश झाला तसा ह्या काँग्रेसच्या लोकांचा झाला म्हणजे यादवी युद्धाची उपमा अगदी १०० टक्के फिट्ट बसेल.' श्याम मराठी बोलण्यात इंग्रजी 'फिट्ट' शब्द वापरण्याची पर्वा न करता म्हणाला.

त्यांच्या यादवी युद्धाच्या उपमेने कामत व त्याच उपमेमुळे व मराठी बोलण्यात इंग्रजी शब्द वापरल्यामुळे बर्वे दोघेही फार दुःखी झाले. □




# -मी,एक सामान्य वाचक



● सौ. सुधा सोमण ●

मी एक सामान्य वाचक आहे.

शक्य असतील तेवढी रोजची वर्तमानपत्रं मी वाचते. लायब्ररीतून मिळतील तेवढी मासिकं आणते. पुस्तकं धुंडते. त्याशिवाय प्रसिद्ध होणारं आणखी किती तरी.

आजकाल वाचायलाही उदंड मिळतं आहे.

पण हल्ली मात्र, अगदी मनातलं सांगायचं, तर या उदंडाचं काही खरं नाही असं फार वाटायला लागलं आहे. गेल्या ५–७ वर्षांपर्यंत नव्हतं इतकं वाटत, पण अलिकडे, आणि विशेषतः सध्या मात्र हे खरं नसणं फारच तीव्रतेनं जाणवायला लागलंय !

असं पहा. दिवस सुरू होतो तोच वर्तमानपत्रानी. ते जरा जरी नेहमीपेक्षा उशिरा हाती आलं, किंवा एखाद्या दिवशी आलंच नाही, तर दिवस नीट सुरू झाला आहे असं वाटतच नाही. थोडं स्पष्टच बोलते. पूर्वी काय व्हायचं, एकदा सकाळी भराभरा पेपर पाहून घेतला की, कामं आटोपल्यानंतर शांतपणानं पेपर वाचून झाल्याशिवाय तो हातावेगळा होत नसे. कधी कधी तर रात्रसुद्धा उजाडायची पुन्हा पेपर हातात घ्यायला. पण तो पूर्ण न वाचता एखादा जरी दिवस गेला, तरी चुटपुटल्यासारखं व्हायचं, आपलं काय चांगलं वाचायचं निसटून गेलं म्हणून. पण हल्ली मात्र सकाळीच १० मिनिटात चुटकीसरशी पेपर वाचून होतो ! काही अपवाद सोडले, तर आवर्जून वाचण्यासारखं त्यात काही नसतंच.


कारण अग्रलेख म्हणाल तर ते फार थोड्या जणांचे असे असतात की, ते मुद्दाम मनन करून वाचावेसे वाटतात. अभ्यासपूर्ण, संतुलित, परिणामकारक भाषा आणि महत्वाचं म्हणजे निर्भिडपणा फारच थोड्यांच्या लेखनात आढळतो. मधले खास लेख, विशेष लेख, सर्वांचंच कमी अधिक असंच असतं. स्वतंत्र विचार, सखोल अभ्यास आणि समतोल दृष्टिकोन कमीच. बहुतेक लेखन बरचसं एकतर्फी आणि कशाची तरी भलावणच करणारं असतं. एखाद्या व्यक्तीची, पक्षाची, विचारप्रणालीची. दिवसेंदिवस मला वाटतं, समाजाची पण एक अशी प्रवृत्तीच बनायला लागली आहे. कशाचं तरी स्तोम माजवायचं. राजकारण, साहित्य, क्रिकेट, कुठलंही क्षेत्र असो. जरा काही झालं की, इतकं डोक्यावर घेऊन नाचायचं की, भटजी बोलवून प्राणप्रतिष्ठाच करायची तेवढी शिल्लक असते त्या गोष्टीची; पण नंतर जरा काही बिनसलं की, लगेच धुळधाण. विजय डोक्यावर घेऊन नाचायलाही वेळ नाही आणि बॅट जाळून टाकायलाही वेळ नाही. तारतम्य ठेवायचं नाही कशाचं. आणि या अशा वृत्तीला योग्य आळा, वळण लावायचं सोडून आमचं वृत्तपत्रलेखन त्याला उलट खतपाणीच घालायचं काम करत असतं. त्या मुलाखती काय, ते लेख काय, सगळ्यात हाच पोचटपणा आणि पोरकटपणा.

कोणत्याही घटनेची व्यक्तीची बरी वाईट माहिती जरी द्यायची असली, तरीही त्याच्या मुळाशी काही किमान पूर्वविचार, अभ्यास, जाणकारी हवी असते, पण इथे पहावं तर नुसती प्रचारकी थाटाची वरवरची रंगरंगोटी. तेवढ्यापुरतं चमकलं की बस. हलकी फुलकी भाषा, तसेच विचार आणि विधानं. सरकारी, बिनसरकारी कुणाच्याही नेमणुका असोत, कोणत्याही क्षेत्रात कुणाचाही गौरव झालेला असो, आधी मुलाखतींचा सुकाळ. बरं, धडाधड घेतल्या मुलाखती, 'अ अधिकाऱ्याबरोबर एक दिवस' वगैरे वगैरे काही लिहीलं, तरी त्यात काही तथ्य सापडतं का ? एकाच व्यक्तीच्या जरी १० मुलाखती वाचल्या, तरी विचारणाऱ्याला काय विचारायचंय आणि सांगणाऱ्याला काय सांगायचंय याचा पत्ताच लागत नाही. अमक्याबद्दल तुम्हाला काय वाटतं ? तमक्यानी हे केलं खरं का ? नाही तर भव्य भावी योजनांच्याबद्दल लगेच शब्दबंबाळ काहीतरी ! या सर्वांत मग, खरीखुरी जी काही माहिती हाती लागावी अशी अपेक्षा असते वाचकाची, ती माहिती मुळी शेवटपर्यंत मिळतच नाही. नुसता शब्दांचा नाच. वर एक फोटो, काही तरी शीर्षक बस. चमकदार, लक्ष वेधून घेणारं. कित्येक वेळा तर या शब्दांबरोबर वहावताना सांगणाऱ्यांनी न सांगितलेलं किंवा सांगितलेलं पण ते मुलाखत घेणाऱ्याला न समजलेलं असं काही खरं खोटं विपर्यस्त स्वरूपातही छापलं जातं. किती तरी भाषणांचे, समारंभांचे, परिसंवादांचे वृत्तांतही असेच अर्धवट आणि चुकीचे असतात. कारण योग्य माहिती चोखपणे वाचकांच्यापर्यंत पोचवायचंसुद्धा एक कसब असतं. ते बहुतेक ठिकाणी नसल्यामुळे परिणामी, सामान्य वाचकाची दिशाभूल होते.

या सर्वामागे माझ्या दृष्टीनी एक कारण असं असावं की, वृत्तविवेचन करताना मुळात जी काही एक अभ्यासाची, परिश्रमाची आणि जबाबदारीची बैठक लागते, तो पायाच मुळी इथे घसरलो असतो ! मग योग्य तो दृष्टिकोन येणार कुठून ? या चमकदार लेखनाची चलती आजकाल आणखीही अशासाठी की, आपली प्रतिमा तयार व्हावी, एक प्रकारचं वलय आपल्याभोवती निर्माण व्हावं, म्हणूनही निरनिराळ्या क्षेत्रातली मंडळी अशा लेखनाला उत्तेजन देत असतात. लिहिणाऱ्यालाही ते कमी कष्टाचं असतं. वारेमाप फुसक्या शब्दांनी रकानेच्या रकाने भरत रहायचं की, झाला पेपर तयार !

या चमकदार लेखनाच्या हव्यासात मग लिहिणाऱ्याला सनसनाटी बातम्या छापायचा लोभ कधी सुटायला लागतो ते कळतही नाही. अशा सनसनाटी बातम्यांनी वर्तमानपत्रात जान येते असं या मंडळीना वाटतं की काय कोण जाणे ! 'अ नी सेवानिवृत्तीच्या वेळी वर्ल्ड बँकेच्या फाइल्स घरी नेल्या!' फलाण्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप आहेत असं विश्वसनीय (!) रीत्या समजते. (आता खरं सांगायचं, म्हणजे हा विश्वास पारखायला या बातमीदारानी फारसा काही प्रयत्न केलेला नसतो हे निराळं !) पण तरीही द्यायचे ठोकून ! सरकारनी अमक्या गैरव्यवहाराकडे, दुर्लक्ष केलं, काय वाटेल ते. नीट शहानिशा करायची नाही, पुरेशी माहिती मिळवायची नाही, कधी कधी तर एकाला एक जोडलेल्या छायाचित्रांचीही मदत घ्यायची हे सारं लिहिताना, आणि द्यायचं प्रसिद्ध करून ! आलंच कुणी पुढं हुज्जत घालायला, तर बघता येतं. कारण दोष नसला तरीही सगळीच जणं उत्तराला उत्तर द्यायला येतातच असं नाही. प्रथम मोठ्या अक्षरात चुकीची का असेना पण अशी चवदार बातमी छापायची हे मुख्य. केलीच चुकीची दुरुस्ती, तर ती मग कुठे तरी कोपऱ्यात, लक्ष न जाईल अशा ठिकाणी आणि काही वेळा तर ही दुरुस्ती करतानासुद्धा, त्यात आणखी चूक करायची !

खास पुरवण्यांचीही यापेक्षा काही वेगळी गत नसते. 'येत्या अंकात' ची जाहिरात वाचून मोठ्या उत्सुकतेनं पान उघडावं, ते तीच फोलफटं ! मग ती पुरवणी कोणतीही असो. अल्पच अपवाद. नाही तर मामला तोच. मागे मुंबईच्या एका दैनिकाच्या मनोरंजन पुरवणीत अर्धं पान दूरदर्शनवर लेख असायचा. या लेखात कौतुकाचं काय ? तर दूरदर्शनच्या एखाद्या अधिकाऱ्याचा फोटो, त्याच्याबद्दल फुसक्या चार-दोन ओळी आणि मग उरलेली सारी जागा, 'मी कँटीनमध्ये गेलो तिथे अमुक ऐकलं, दरवाज्याशी अमुक भेटले' म्हणजे, 'एक चिमणी आली, भुर्रऽऽकन उडून गेली,' 'मग ना दुसरी चिमणी आली, ती नाऽ तीही भुर्रऽऽऽऽकन उडून गेली' अशा थाटाचं काहीतरी. अरे कशाचे हे लेख, इतक्या महत्त्वाच्या माध्यमाबद्दल आणि इतक्या महत्त्वाच्या माध्यमांतून?



शुद्ध फसवणूक वाचकांची !

चित्रपटांबद्दल लिहितानासुद्धा कलाकारांची गुणवत्ता राह्यली बाजूला. त्यांच्या प्रकरणांचीच खरी-खोटी चर्चा अधिक ! जोडीला, कोणती नटी रोज आंघोळ करत नाही आणि कोणत्या नटाच्या तोंडाला कांद्याचा वास येतो हेही हवं तर !

परवा तर आणखीनच विशेष. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर मोठ्या माहितीपूर्ण लेखाचा आव आणून पंतप्रधानांच्या सुरक्षाव्यवस्थेवर कॉलमवर कॉलम आले होते. वास्तविक अशा विषयावरचा लेख, चोख, काटेकोर माहिती मिळवून, त्याची सर्वतोपरी शहानिशा करून, अभ्यासपूर्ण आणि कितीतरी जबाबदारीनी लिहिलेला असा पाहिजे; पण इथे जी विधानं केली होती ती मोठी नमुनेदार होती. काय तर म्हणे दिल्लीच्या पोलीस आयुक्तांचा I B मधल्या एका सुरक्षा अधिकाऱ्याच्या जागेवर डोळा होता. म्हणून त्यांनी या सर्व सेक्युरिटीवाल्यांचं सामान विमानतळावर तपासायला कस्टमला सांगितलं आणि त्यामुळे या लोकांनी परदेशाहून आणलेला हजारो रुपयांचा माल उघडकीला आला ! वास्तविक वस्तुस्थिती अशी होती की, हे पोलीस अधिकारी आयुक्त होण्यापूर्वी काही काळ या सुरक्षाअधिकाऱ्याच्या कमीतकमी २ जागा तरी वर, I B मध्ये होते ! तेव्हा त्यांचा ज्यूनियर माणसाच्या जागेवर डोळा म्हणजे थोडंसं-सबंध लेख अशाच खऱ्याखोट्या किश्शांनी भरलेला. काही मूलभूत विचार, माहिती, दृष्टिकोन अर्थातच नाही. अशी अर्धवट माहिती देताना, आपण वाचकांची तर दिशाभूल करतोच; पण न्यायाची मागणी करणाऱ्या माध्यमातूनच आपण सर्वांच्यावरच अन्याय करतोच ही गोष्ट कशी लक्षात येत नाही या मंडळींच्या ? कोणताही गंभीर विषय असो. गैरकारभार, अन्यायाला वाचा फोडणं, बहुतांशी हाच खाक्या. इकडचं थोडं, तिकडचं थोडं केलं एकत्र, चार-दोन जोरकस शब्द वापरले की, झाला लेख तयार ! लिहिणारे लिहिताहेत, छापणारे छापताहेत. मग वाचणाऱ्यांपुढे काही दुसरा पर्याय थोडाच आहे ?

साप्ताहिकं, मासिकं, काही अपवाद वगळले तर बहुतेक सर्वांची तऱ्हा कमी अधिक प्रमाणात तीच ! गोंडस शब्दांतली अर्धवट माहिती आणि सनसनाटीपणा, यांचं तोंडी लावणं इथेही असतंच. शिवाय वरील भुतंखेतं, खून, बलात्कार, प्रचंड भाकितं यावरच्या विशेषांकांचाही सुकाळ ! अतिशयच थोडी नियतकालिकं अशी, की जिथे खरोखरीची निष्ठा, व्यवसायाबद्दलची, आणि विचाराबद्दलची, अभ्यास, निर्भयता आणि नि:पक्षपातीपणा बघायला मिळतो व त्याचबरोबर भाषेचं सौंदर्यही. नाहीतर मशरुमसारख्या उगवणाऱ्या या नियतकालिकांच्यात विचार तर सोडाच, पण भाषाही अशुद्ध असते

पुस्तकांचा विषय स्वतंत्र आहे, पण पुस्तकंमात्र बरीचशी समाधानच देऊन जातात हे निश्चित. फक्त त्यातलं एकच खटकतं आणि ते म्हणजे instant journalism ! हिंसाचारासारख्या अनिष्ट प्रवृत्तींचं गौरवीकरण करणारी ही पुस्तकं पाहूली की चीड येते. जोशी अभ्यंकर खून झाले, काढली पुस्तिका. इंदिराजींची हत्या झाली, जोडली लगेच चार पानं. अरे पण कशाला ? बलात्कार करणाऱ्याच्या म्हणे मुलाखती ! का? नुकतीच लिहायला, वाचायला शिकलेली तरुण, प्रौढ साक्षर मंडळी आसुसून वाचतात, त्यांच्यापुढे या पुस्तिका टाकायच्या ?

प्रत्येक वेळी आणि प्रत्येक पान उलटताना हे सारं मनात डाचत असतं. वॉल्टेर आणि रूसोनी म्हणे आपल्या लेखनाच्या प्रभावानी फ्रान्समध्ये राज्यक्रांती घडवून आणली. स्वातंत्र्यपूर्वकाळात, इतकी सारी बंधनं असतांनाही, टिळक, आगरकर शिवराम महादेव परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर जळजळीत अग्रलेख लिहून सरकारला हादरा देत असत. परकीयांचं जोखड झुगारून देण्यासाठी, सामाजिक सुधारणा करण्यासाठी प्रत्यक्ष कृती इतकीच लेखणीनीही मोलाची कामगिरी केली होती आणि तिथेच, लेखनस्वातंत्र्याच्या या निर्जीव टिकल्या ?

## निवडणुकांवर लक्ष

लेखन स्वातंत्र्य जरूर हवं; पण त्याचबरोबर या स्वातंत्र्याच्या अंतर्भूत सामर्थ्याचं, जबाबदारीचंही अवधान नको का ? आम्हाला मोठं व्हायचंय, प्रगत, त्याचबरोबर जागरूक आणि प्रगल्भही व्हायचंय, स्वातंत्र्य मिळून ३७ वर्षं झाली, तेव्हा भारत हा एक गरीब आणि मागासलेला देश आहे असं म्हणणं आम्हाला आता मुळीच शोभादायक नाही. यासाठी प्रामाणिकपणानी, निष्ठेनी आम्हीही काही करायची अतिशय निकड आहे, या जाणीवांचा परिणामकारी प्रत्यय या लेखनस्वातंत्र्यात कुठेतरी यायला नको का ?

माझ्यासारख्या सामान्य वाचकाला तर, मी पुन्हा पुन्हा सांगते, काही सन्माननीय अपवाद सोडून, सर्वसाधारण कुठेही या जाणीवांचा मागमूसही दिसत नाही आहे. लोकजागृती, लोकशिक्षण, प्रबोधन या गोष्टी आसपाससुद्धा दिसत नाहीत या लेखनाच्या.

रोज मला वाचायला मिळतात, त्या फक्त घोषणा. जोरदार आरोळ्या. हवं, झालंच पाहिजे; पण त्यासाठी आम्हीही काही केलंच पाहिजे आणि मिळालेलं सांभाळलंच पाहिजे, ही जाणीव मात्र कुठेच दिसत नाही. शासन आणि देश निकोप पाहिजे हे जोरात म्हणायचं; पण त्यासाठी समाजातल्या प्रत्येक व्यक्तीनीही काही जबाबदारीची, शिस्तीची पथ्य पाळलीच पाहिजेत हे या उदंड लेखनातून कुणीच कधीच सांगत नाही. टॅक्सीवाल्याला जरा कुणी दटावलं, की लगेच बेमुदत संप आणि सामान्य जनता धारेवर; पण हाच टॅक्सीवाला ज्यावेळी एखाद्या निरपराध प्रवाशाला लुटतो, त्यावेळी त्याचा निषेध करून त्याच्यावर कडक कारवाई युनियन तर करत नाहीच; पण दटावणं आणि संप यांची चवदार बातमी छापणारे वर्तमानपत्रेवालेसुद्धा ही कारवाई व्हावी असा आग्रह धरताना कधी दिसत नाहीत. पालीकेनं शहर स्वच्छ ठेवावं ही तारस्वरात मागणी; पण या स्वच्छतेत जनतेचा सुद्धा कसा सहभाग हवा या महत्त्वाच्या गोष्टी बद्दल मात्र मौन ! त्यामुळे स्वच्छतेची मागणी करणाऱ्या जनतेचा, कचरा पेटीत न टाकता तो बाल्कनीतून खाली रस्त्यावर ओतण्याचा हक्क अर्थातच अबाधित ! रेल्वे, बस, सगळीकडे सुविधा हव्यातच; पण त्या सुविधा जपण्याची जबाबदारी कोणी समजावून सांगणार नाही. भावना व्यक्त करतानासुद्धा सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू नये, उत्सव प्रसंगीसुद्धा समाजाचं भान राखणं जरूर आहे असे लोकशिक्षणाचे विचार सहसा कधी दिसणार नाहीत तुम्हाला लेखनात, शासनाला दटावण्याइतकेच, समाजाला त्याच्या सहभागाचीही खडसावून जाणीव करून देणारा विचारच कुठे असत नाही आणि तो कसा असणार? कारण मग ती बातमी होत नाही ना, चमकदार, चवदार ? कुणाची चूक दाखवली मोठ्या अक्षरात, कुणावर काही आरोप केले जोरदार, म्हणजे ती आकर्षक बातमी होते. लोकांना त्यांच्या चुका काय दाखवायच्या ? ती काय लोकांनी चवीनी, घोळून वाचायची रसभरीत बातमी असते ?

माझी खरी निराशा झाली निवडणुकांच्या आधी. ८० सालच्या आणि आताच्याही. ७९ साली जनता सरकार पडल्यावर चरणसिंग, जगजीवनराम यांच्या रस्सीखेचीत पाठिंब्यासाठी मतांचा जो देहविक्रय चालला होता, तो तर केवळ घृणास्पद होता. आता आंध्रमध्येही रामाराव सरकारला बडतर्फ केल्यावर थोडाफार तसाच प्रकार झाला होता. त्यावेळी आणि आताही निवडणुकांच्या आधी दिवाळी आली होती. सालाबादप्रमाणे दिवाळी अंकही प्रसिद्ध झाले होते. या दिवाळी अंकांच्या निमित्तानी, सुबुद्ध मतदार तयार करण्याच्या दृष्टीनी फार मोठी संधी आमच्या या प्रसार माधमाच्या हाती आली होती. पक्षबदल करून आम्ही निवडणुकीत निष्ठेनी दिलेल्या मतांचा असा लिलाव करण्याचा कोणत्याही उमेदवाराला काय हक्क पोचतो आणि त्यांनी तो तसा केला तर मतदार म्हणून आम्ही त्यासंबंधानी काय करू शकू, करायला हवं, कायदा आम्हाला काही आधार देऊ शकेल का ? या आणि त्याच्या अनुषंगानी कितीतरी प्रश्नांची प्रखर जाण देण्याचा प्रयत्न, लेख, परिसंवाद यांच्याद्वारे आम्हाला करता आला असता. तसंच निवडणुकांवर लक्ष ठेवून झोपडपट्ट्यांना जाणूनबुजून संरक्षण दिलं जातं असं सगळे म्हणतात. मग या झोपडपट्टी वासियांच्या मताधिकाराचा काही वेगळा विचार व्हायला हवा का ? त्यांच्या झोपड्यांचं रजिस्ट्रेशन, त्यांची मतदार म्हणून नोंदणी, याचा विचार यात काटेकोरपणे होतो का ? अनधिकृत जागेवर वास्तव्य हा शासनाचा गुन्हा मानला, तर अशा मतांचा पाठिंबा लोकशाहीच्या दृष्टीनं उपकारक आहे का? अशा कितीतरी शंकांचा उहापोह या अंकातनं करता आला असता.

जनतेच्या मनात सत्ताधारी पक्षाबद्दल फारसं कौतुक नाही हे जरी खरं असलं, तरीही विरोधी पक्षीयांची प्रतिमाही फारशी उजळ नाही हेही तितकंच खरं आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कुणीही देशातल्या लोकशाहीचं नुकसान केलं नसेल एवढं मोरारजी देसाईंच्या ७९ सालच्या अडमुठेपणानं केलं. विरोधी पक्ष आणि लोकशाहीची मूल्य उध्वस्त करून टाकली त्यांनी. सत्ताधारी पक्षाची सत्ता नकारात्मक आहे लोकांना ती पटते आहे म्हणून नव्हे. कारण त्यांनाही काही कमी लोकशाही विध्वंसक चाळे केले नाहीत; पण मग आम्ही सगळ्यांचंच सगळं हे असं वागणं का मान्य करतो? का चालू देतो? आमच्यातल्या विचारवंतांना याबद्दल काय वाटतं ? आणि देशात निरोगी लोकशाही नांदण्यासाठी विद्वानांनी, विचारवंतांनी अगदीच अलिप्त राहून चालेल का ? कृतीशीलता कशी प्रेरित करता येईल आणि मग त्यातून जागरूक नागरिक, सुबुद्ध मतदार आणि यशस्वी शासन कसं निर्माण करता येईल यासंबंधी काही खरोखरच अभ्यासपूर्ण, मूलभूत विचार


मार्गदर्शन आम्हाला या अंकातून हवं होतं.

पण प्रत्यक्षात, दिसला कुठे गंभीर विचार लोकशाहीच्या जीवितावद्दल या दिवाळी अंकांच्यात? दिवाळी अंकांचं मी मुद्दाम अशासाठी म्हणते, की मराठी माणूस जसं नाटक आवर्जून बघायला जातो, तसाच तो दिवाळी अंकही प्रेमानी वाचतो. म्हणूनच, अशा वेळी सुबुद्ध मतदारत्वाच्या, नागरिकत्वाच्या जाणिवा रूजवायला ही उत्कृष्ट वेळ होती; पण प्रत्यक्षात किती जणांनी यासंधीचा फायदा घेतला? तेव्हा आणि आताही. दिसले कुठे पडसाद या लोकशिक्षणाचे या अंकांतून?

आतासुद्धा पक्षांच्या जाहिरनाम्यांची छाननी करताना, कुणाला किती संधी आहे जिंकायची, यानीच जास्त जागा व्यापून गेली होती. या जाहिरनाम्यातनंसुद्धा कुठे होती डोळस लोकशिक्षणाची ग्वाही? कुणीतरी साधं असं तरी म्हटलं का की, लोकसंख्येच्या प्रश्नाला आम्ही अग्रक्रम देऊ? आम्ही यंव करू आणि त्यंव करू अशी शब्दबंबाळ आश्वासनं देणाऱ्या या लोकांनी एवढं एकच लोकशिक्षणाचं आश्वासन दिलं असतं तरी पुरे होतं. कारण त्यात गरीबी हटाव, बेकारी नष्ट करा, स्वच्छता वगैरे सगळी आश्वासनं आपोआपच आली असती; पण मत मागायच्यावेळी आमिषं दाखवायचं सोडून कर्तव्याची जाणीव कोण हो करून देणार? म्हणूनच आम्हा मतदारांचे हे जबाबदार प्रतिनिधी, प्रचारप्रसंगी, किमान साइनबोर्डस् आणि रस्त्यांच्या पाट्या यावर तरी पत्रक चिकटवून जनतेची दिशाभूल करू नका एवढीही शिस्त आपल्या प्रचारकांना लावू शकले नाहीत!

काही किरकोळ उल्लेख सोडले, तरी घेतली कुणी या वृत्तीची गंभीर दखल आपल्या लेखनातून?

साधा करमणुकीच्या माध्यमांबद्दलही आमच्याकडे चार शब्द चांगले वाचायला मिळत नाहीत! आकाशवाणी आता लौकरच साठी गाठेल. दूरदर्शनलाही २५ वर्ष उलटून गेली आहेतच; पण या कार्यक्रमांचं जाणकारानं केलेलं नियमित समालोचन कुठेतरी वाचायला मिळतं का? काही इंग्रजी पत्रकातले अपवाद आहेत; पण बाकी? मग या मंडळींनी का अजूनही कुणालाही आणून, 'केले गेले' सारखे पुस्तकी शब्दप्रयोग वारून, काहीही बोलणं आमच्या कानी का आदळू नये? आणि शाळेच्या गॅदरिंगच्या वेळी केल्यासारखी, नाहीतर अनिष्ट प्रवृत्तींना उत्तेजन देणारी नाटकं, आणि चित्रपट,



फुसक्या मुलाखती दाखवून आमचा वेळ खाऊ नये? उद्याचे कार्यक्रममध्ये ९ वाजून ५० मिनिटांनी News होतील असे प्रयोग उगीच का ऐकायला मिळतात? नाटकाचा जसा आम्ही प्रेक्षकवर्ग तयार केला समीक्षेतून, प्रयोगातून, तसाच जाणकार श्रोता आकाशवाणी आणि दूरदर्शनसाठीही नको का? तरच ही मंडळी कार्यक्रम सादर करताना काही विचार करतील. मागे मला आठवतंय मुंबई केंद्रावर मराठी कार्यक्रमांच्या घोषणा मराठीतूनच द्यायला, विविध वृत्तांतल्या आकाशवाणीबद्दलच्या नियमित सदरांनी भाग पाडलं होतं. मग आताच ही उदासीनता का? आज एवढा पैसा खर्च होतोय या माध्यमांवर त्याची कुणीतरी शिस्तशीर, जाणकार दखल घ्यायला हवी ही जाणीव लेखनासारख्या जबाबदार माध्यमाला अजूनही नसावी? का याही बाबतीत, 'मुकी बिचारी कुणी हाकावी' हेच आम्ही पाळायचं?

पत्रकारितेसारख्या प्रभावी माध्यमातला हा निःसत्वपणा पाहून रोज मनात येतं की, शेवटी अंकुश कोण कुणावर आणि कसा ठेवणार? पत्रकार, लोकप्रतिनिधी, न्यायसंस्था आणि शासन या सर्वांनी मिळून लोकशाही जपायची; पण इथे तर सारेच निष्प्रभ. साऱ्यांचंच वागणं सारखं असं जर असलं, तर मग त्या लेखन स्वातंत्र्याचा उपयोग काय? खऱ्या सूर्याचं गान न करता, नुसत्या झगमगत्या दिव्यापुढेच आरती ओवाळायला?

दूरदर्शन आणि आकाशवाणी सरकारी माध्यमं म्हणून आम्ही त्यांची विश्वासार्हता गौण मानतो. सत्ताधिकाऱ्यांचा सारखा उदोउदो करतात, लोक जागृतीकडे लक्ष देत नाहीत म्हणून त्यांना नावं ठेवतो; पण लेखन स्वातंत्र्याचा गजर करणाऱ्या या प्रसारमाध्यमातून तरी आम्हाला वेगळं काय मिळतंय? अभ्यासपूर्वक, संशोधकवृत्तीचं, खात्रीलायक वृत्तविवेचन किती प्रमाणात आमच्य हातात येतं? परवाच एकजण म्हणाले, 'वर्तमानपत्रात बातमी आलीय. पण खरी का खोटी ते नाही सांगता येत.' सामान्य माणसाच्या मनातली वृत्तपत्रांच्या विश्वासार्हतेची प्रतिमा आहे!

लेखनस्वातंत्र्याच्या उद्गात्यांनी आणखी ही एक गोष्ट नजरेआड होऊ देऊ नये असं मला वाटतं. आज साक्षरतेचं प्रमाण वाढतंय तेव्हा नवसाक्षरांच्या हाती आम्ही जबाबदार कसदार लेखन दिलं पाहिजे. लिफ्टमध्ये वाचणारा लिफ्टमन, गाडी थांबली असताना वाचणारा ड्रायव्हर, साऱ्या नव्यांनी वाचायला शिकलेल्यांच्या मनाची मशागत आम्ही सकस, जागरूक विचारांच्या बीजांनी करायला हवी. नाहीतर तिथे हा पोचट, पोकळ कारभार अनर्थ घडवेल!

पेपर खाली ठेवताना रोज हे असं असमाधान मनात बोचू लागतं. म्हणूनच मला म्हणायचंच की, मी एक सामान्य वाचक आहे; पण मला जे वाचायला मिळतंय, ते त्याहीपेक्षा सामान्य आहे!!

□

*लक्ष्मण कृष्ण चिपळुणकरांच्या शब्दात...*

# विष्णुशास्त्री चिपळुणकर

● रघुपती भट्ट ●

नुकतेच एक पुस्तक वाचायला मिळाले. 'विष्णुशास्त्री चिपळुणकर' यांचे चरित्र असे शीर्षक असलेले हे पुस्तक पुणे येथे 'सत्यप्रकाश' छापखान्यात छापले आहे. उपसंहारावरून पुस्तक एक जून १८९४ साली प्रसिद्ध झाले असावे असा अंदाज करता येतो. लेखकाने आपले नाव घातलेले नाही. फक्त

० ० ० ० बी. ए.
हेडमास्तर हायस्कूल
यांनी लिहिले.

असा उल्लेख आहे. प्रस्तावनेत लेखकाने सांगितले आहे, 'विष्णुशास्त्री यांची प्रसिद्ध झालेली चरित्रे अपूर्ण व कित्येक ठिकाणी चुकलेली पाहून आम्हास बरे वाटत नव्हते; परंतु यापूर्वी आपण मराठीत कधी काही लिहिले नसल्यामुळे व एवढे काम आपल्या हातून झेपणार नाही असे वाटत असल्यामुळे कित्येक दिवस आम्ही तसेच स्वस्थ राहिलो.'

त्यानंतर लेखकाचे एक शिष्य, शास्त्रीबोवांचे–विष्णुशास्त्रींचे चरित्राबद्दल स्मारक फंड समितीची जाहिरात वाचून, त्यांच्याकडे आले. यापूर्वी ज्यांनी जाहिरातीला उत्तर दिले होते आणि चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली होती त्यांना ते लिहिता येणार नाही असे लेखकाने कळवले होते, पण या शिष्याचे मन मोडवेना म्हणून लेखक स्वत: लिहायला बसले. आणि आठवले तसे लिहीत जाताना सदरचे पुस्तक तयार झाले. तेव्हा शिष्याऐवजी स्वत:च्या नावे ते प्रसिद्ध करण्याचा निर्णय लेखकाने घेतला. सदर चरित्राम जे २०० रुपयाचे बक्षीस होते त्यातील थोडी रक्कम शिष्यास देऊन राहिलेले पुस्तकात घालून पुस्तक स्वस्त करण्याचा निर्णय लेखकाने घेतला.

त्यामुळे कापडी बायंडिंगचे हे पुस्तक १॥ रु. किमतीचे आहे.

लेखकावर 'बासवेल' चा मोठा प्रभाव आहे हे त्याने चरित्र सुरू करताना सांगितले आहे. चरित्र नायकाच्या सर्व लहान मोठ्या गुणावगुणांचे उत्कृष्ट व खरे वर्णन हा बासवेलच्या जॉनसनच्या चरित्रातील गुण आपल्या या पुस्तकात यावा यासाठी त्याने प्रामाणिक धडपड केली आहे. लेखकाची भाषा विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणेच आहे. पूर्वीच्या भाषेतील सर्व गुण आणि दोष त्यामध्ये आहेत. 'म्हणून' हा शब्द 'ह्मणून' 'म्हण' हा शब्द 'ह्मण' असा लिहिला आहे. 'त्यांची खूप चहा होत असे', 'बोलेत ना' अशा प्रकारचे शब्दप्रयोग त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात.

या पुस्तकाचे एकूण ९ भाग आहेत. विष्णुशास्त्रींचे जीवन, जे केवळ ३२ वर्षांचे होते त्याची विभागणी लेखकाने अगदी कौशल्यपूर्वक केलेली आहे लेखक विष्णुशास्त्रींना अगदी जवळचा असला पाहिजे हे लेखकाच्या सूक्ष्म निवेदनावरून ध्यानात येते. विष्णुशास्त्रींचे स्वरूप जसेच्या तसे म्हणजे लेखकाच्या भाषेत 'फोटोग्राफचे तजबिरीप्रमाणे खरी' वाचकांसमोर आणण्याचा लेखकाचा यत्न आहे.

पहिल्या भागात 'बालपण' या सदराखाली लेखकाने विष्णुशास्त्रींचे वडील कृष्णशास्त्री यांची माहिती दिली आहे. या कृष्णशास्त्र्यांनी संस्कृतचा गाढा अभ्यास केला होता, पण त्यांच्या गुरूंनी बदलत्या जमान्यातील इंग्रजीचा महिमा ओळखला आणि स्वत: उतारवयात त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली आणि कृष्णशास्त्रींनाही त्यांनी तीच दिक्षा दिली. कृष्णशास्त्रींनी २५ वे वर्षी सुरुवात करून इंग्रजीत प्राविण्य संपादन केले आणि १८५२ साली 'चान्सलेनर एक्झिबिशनर' ची जागा मिळवली. त्यानंतर ते 'पूना कॉलेज' मध्ये असिस्टंट प्रोफेसर झाले. त्या काळात त्यांची विद्यार्थ्यांमध्ये चांगली चहा असे.

लेखकाच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रत्यय लेखक कृष्णशास्त्रींच्या हातून बाहेर चालीची काही आगळिक घडल्याचे सांगून आणून देतो. शास्त्रींच्या चांगल्याबरोबर वाईटही द्यायचे तो टाळत नाही.

विष्णुशास्त्रींच्या गुणांचे मूळ लक्षात यावे म्हणून लेखकाने कृष्णशास्त्रींवर विस्ताराने लिहिले आहे. कृष्णशास्त्र्यांनी बरेच ग्रंथ लिहिले. अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी-अनेक विद्यामूलतत्त्व संग्रह, अर्थशास्त्र परिभाषा, साक्रेटिस यांचे चरित्र, रासेलस याचे भाषांतर इ. त्यांचे प्रमुख ग्रंथ. पण कृष्णशास्त्रींनी बहुतेक भाषांतरे लिहिलेली आहेत. याशिवाय घरात असणाऱ्या इतर नातेवाईकांबद्दल थोडे फार सांगून लेखकाने विष्णुशास्त्रींच्या बालपणावर लिहिले आहे.

विष्णुशास्त्री ज्या काळात 'पूना हायस्कूल' मध्ये शिकत होते त्या काळात म्हणजे १८६५ च्या सुमारासमुद्धा 'कॉपी' करण्याची पद्धत विद्यार्थ्यांत होती. परीक्षेचे पहिल्या दिवशी असिस्टंट हेडमास्तर कोणाकडे डिक्शनरी वगैरे लपवून ठेवलेली आहे का हे पाहात असत.

'विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्र' असं शीर्षक असलेलं फक्त दीड रुपया किमतीचं एक जुनं दुर्मिळ पुस्तक लेखकाला बघायला मिळालं. विष्णुशास्त्री चिपळुणकरांबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल मराठीत साहित्य उपलब्ध नाही, त्यामुळे या पुस्तकाचं विशेष महत्त्व आहे. पुस्तकाच्या लेखकानं आपलं नाव उघड केलं नसलं तरी लेखकाच्या माहितीवरून व काही संदर्भांवरून हे पुस्तक विष्णुशास्त्री यांच्याच कनिष्ठ बंधूंनी लिहिलं असावं असा अंदाज आहे.

या दुर्मिळ पुस्तकाची आणि पुस्तकातून दिसणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळुणकरांची ही ओळख.

विष्णुशास्त्रींच्या वेळी एकाच वर्षात दोन इयत्ता करता येत असत. त्यावेळचे विषय आणि शिक्षणपद्धतीत लेखकाने बरीच पाने घालवली आहेत आणि पुन्हा नव्या शिक्षणपद्धतीवर शेवटी 'हा पुष्कळ गैरफायद्याचा व काही अंशी अपायकारकही आहे' असे 'आमचे मत' ही दिलेले आहे. या सदरामध्ये 'विष्णुशास्त्री' च्या लग्नापर्यंतची हकिकत दिलेली आहे. त्यातच त्याचे हायस्कूल शिक्षण, त्यांचे घरातील भाऊ वगैरे यांची माहिती आणि लेखकाची मते वगैरे आहेत.

भाग दुसऱ्यात डेक्कन कॉलेजातील विद्याभ्यास दिलेला आहे. त्यावेळी डेक्कनचे प्रिन्सिपॉल 'प्रो. वर्डस्वर्थ', विल्यम वर्डस्वर्थचे नातू यांच्याबद्दल लेखकाने अगदी बहारदार दिलेले आहे हे वर्डस्वर्थसाहेब मुलांचे अवांतर ज्ञान वाढावे यासाठी फारच प्रयत्नशील असत. या साहेबांना नेटिव्ह मुलांबद्दल प्रेम असे पण त्यांचा स्वभाव तापट असे. त्यांच्या व्याख्यानाचा लाभ बी. ए. पास झालेल्या मंडळींना अधिक चांगला झाला असता असे विष्णुशास्त्रींचे मत होते. दुसरे डॉ. किलहार्न हे गृहस्थ टीका आणि भाषांतर सामुग्री आणल्याशिवाय न शिकवणारे संस्कृत प्राध्यापक. केरोपंत नाना छत्रे नावाचे गणिताचे प्राध्यापक, पेंडारकर नावाचे शास्त्री यांच्या आख्यायिका लेखकाने खुलवून सांगितल्या आहेत.

विष्णुशास्त्री हे या काळातच मराठी कवितेकडे वळले. आपल्या डेक्कन कॉलेजातील वर उल्लेख केलेल्या गुरुशिवाय त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांच्या सान्निध्यातही त्यांना बरेच शिक्षण मिळे. विष्णुशास्त्रींना मराठी कवितेचा नाद लागला आणि वडिलांच्या ट्रेनिंग कॉलेजमधील लायब्ररीमधील सर्वसंग्रह मासिकाचे अंक त्यांनी वाचले. याशिवाय विष्णुशास्त्र्यांनी पन्हाळकरबोवा यांची कीर्तने ऐकली. त्यांच्या कीर्तनात मराठीतील उत्तमोत्तम पद्यरत्ने विखुरलेली असत. त्यावर्षी गणिताकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि पुढच्या वर्षी अवांतर वाचनात वेळ घालवल्यामुळे विष्णुशास्त्री नापास झाले. प्रो. वर्डस्वर्थने कृष्णशास्त्र्यांना त्यांचा गणित, लॉजिक याचा अभ्यास करून घेण्याबद्दल पत्र लिहिले.

या काळात विष्णुशास्त्री जेवण्यासाठी क्लबात जात असत. या क्लबातील मंडळींचे बारकाईने वर्णन लेखकाने केले आहे. याशिवाय कॉलेजमधील काही ठळक विद्यार्थी ज्यांचा विष्णुशास्त्रींशी स्नेह होता अशांबद्दलही तो लिहितो. त्यांचे गुणदोष वगैरे सर्व आणि पुन्हा तळटीपेमध्ये त्या गृहस्थाबद्दल वाईट लिहिणे हा आपला उद्देश नसून त्यांची त्या काळातील चित्रे आणि स्वभाव जसाच्या तसा यावा, हा उद्देश असल्याचे स्पष्ट करतो. त्यामध्ये त्या काळात गाजलेले विज्ञान प्रो. जिनसीवाले यांच्या धार्मिक वृत्तीबद्दलही तो लिहितो. प्रो. जिनसीवाले हे विष्णुशास्त्रींच्या वेळी कॉलेजमध्ये ज्युनियर विद्यार्थी होते.

विशेष म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या वेळेच्या कॉलेजचे जे वर्णन लेखकाने दिले आहे त्यावरून १८६५ सालापासून 'रॅगिंग' अस्तित्वात आहे असे दिसते. लेखक लिहितो—

'काही विद्यार्थी विशेष हूड आणि दांडगे, कित्येक अर्वाच्य व चावट व कित्येकास स्वतः अभ्यास नकोसा असून ते दुसऱ्यासही करू न देणारे असत. जे विद्यार्थी बुद्धिमान असून त्यास वरील द्वाड विद्यार्थीशी बेताने राहता येईल त्यांचा निभाव लागे; परंतु कधी कधी वरील वृकमंडळात एखादी बिचारी भोळी गाय सापडली म्हणजे तिची दशा पुसूंच नये.'

(पृष्ठ ७४ भाग २ रा)

अर्थात या त्या काळच्या पागोटेधारी मंडळीचे रॅगिंग हे आजच्या मानाने अत्यंत मवाळ होते. विष्णुशास्त्रींनी दिलेल्या एका उदाहरणाने ते पटते; पण त्या काळाच्या मानाने ती न पुसता येणारी दशा होती.

विष्णुशास्त्री अभ्यास करीत; पण अवांतर वाचनाची गोडी जास्त, त्यामुळे ते बी. ए. च्या परीक्षेत नापास झाले. त्यामुळे त्यांना घरी अभ्यास करणे भाग पडले. त्या वेळी बाबा गोखले यानी आपल्या शाळेत शिक्षक म्हणून नेमून घेतले. त्याची हकिकत तिसऱ्या भागात 'अध्यापन' या शीर्षकाखाली आली आहे.

या शाळेत 'पहिले बुकापासून मॅट्रीक्युलेशनपर्यंत' शिकवले जात असे. स्वतः बाबा गोखले हे शाळेकडे म्हणावे तसे लक्ष देत नसत. त्यामुळे इतर असिस्टंटही तसेच वागत. शिक्षक म्हणून विष्णुशास्त्री कसे होते? लेखकाच्या शब्दात.

'विष्णुशास्त्री हे स्वतः सुशिक्षित. त्यांस शिकवण्याची हौस मोठी, त्यांचे शिकवणे पद्धतवार, असे चांगले शिक्षकाचे कित्येक मोठे मोठे

गुण त्यांच्या अंगी होते; परंतु वर्गातील ठाकठीक व व्यवस्था, छडीचा किंवा कठोर शब्दांचा तरतरीत अंमल वगैरे शिक्षणकलेची अप्रधान अंगे ही विष्णुशास्त्री यांचे शिक्षणात बरीच कमी असत. त्यातून बाबांचे शाळेतील वर सांगितल्याप्रमाणे व्यवस्था असल्यामुळे विष्णुशास्त्री यांचे शिक्षणापासून त्यांचे विद्वत्तेचे मानाने विद्यार्थ्यास जितका फायदा व्हावा तितका होत नसेल असे वाटते. विष्णुशास्त्री यांचा दुसरा दुर्गुण म्हटला म्हणजे वेळेवर वर्गावर न येणे. ते काही वाचीत बसले असले म्हणजे तासाची घंटा वाजली असता चटकन उठून वर्गावर जातील असे बहुधा व्हायचे नाही. पंधरा–वीस मिनिटे निघून जायचीच.'

(पृष्ठ ८४ भाग ३ रा)

पण त्यावर्षी अभ्यास करून ते बी. ए. पास झाले. त्यावर्षी सुरू झालेल्या तीन नव्या उपक्रमांना ते हजेरी लावू लागले. डेक्कन कॉलेजचे गॅदरिंग, संस्कृत नाटकप्रयोग वगैरे. वेणीसंहार नाटकात विष्णुशास्त्र्यांनी धर्मराजाची भूमिका केली होती आणि ती पाहण्यास कृष्णशास्त्री हजर होते.

कृष्णशास्त्र्यांकडे शाळापत्रकाचे काम होते ते त्यांनी चिरंजीवांकडे सोपवले होते. 'देशभाषा' आणि तिचा विकास हे ध्येय विष्णुशास्त्रांनी स्वीकारले होते. त्यासाठी त्यानी 'शाळापत्रक' हे माध्यम बनवले. प्रथम त्यानी 'संस्कृत कवि' नामक टीकाग्रंथ सुरू केला. कालिदास, भवभूति, बाण इ. कवींची माहिती आणि त्यांच्या काव्याचे परिक्षण त्यांनी प्रत्येक महिन्यात थोडे थोडे असे छापले. इंग्लिश टीकाकाराची मते देऊन त्यांना खोडून काढून संस्कृत कवींची महत्ता पटवण्याचा उद्योग शास्त्रीबुवानी या पुस्तकात केला.

त्यानंतर 'पूना हायस्कूल'चे हेडमास्तर आणि त्या वेळचे एक विद्वान 'महादेव मोरेश्वर कुंटे' यांच्यावर आपली लेखणी उचलली. पूर्वी कुंटेनी राजा शिवाजीवर दोन सर्ग लिहिले होते व त्यानंतर ते सोडून 'मन' या विषयाकडे ते वळले होते. या कवितेवर विष्णुशास्त्रांनी 'a poet turned philosopher' या शीर्षकाखाली 'ज्ञानप्रकाशा'त लिहिले.

आणि त्याच्या पुढच्याच वर्षी विष्णुशास्त्र्यांना पूना हायस्कूलमध्ये असिस्टंट मास्तर म्हणून नोकरी मिळाली. ही नोकरी त्या वेळचा डायरेक्टर चाटफिल्ड यानी कृष्णशास्त्री यांचेवरील लोभाने दिली होती. कृष्णशास्त्रींचा मुलगा पदवीधर असून घरी बसून आहे असे समजल्याने चाटफिल्ड साहेब याने स्वत: होऊन नोकरी देववली. यामध्ये कृष्णशास्त्रांचे विदेशी मंडळीतील वजन दिसून येते.

त्यानंतर लेखकाने पूना हायस्कूलच्या स्थितीची माहिती दिली आहे. त्यावरून त्या शिस्तबद्धतेच्या काळी देखील पुण्यातील विद्यार्थी बाके मोडणे, अंगरख्यास म्हाताऱ्या चिकटवणे, खुर्च्यांचे वेत कापणे वगैरे उद्योग करीत असत. १८७० साली माट्रिक्लेशन वर्गातील सत्तर मुले हेडमास्तरांशी बेबनाव झाल्याने शाळा सोडून निघून गेली होती असे मजेदार वर्णन या पुस्तकात आहे. या शाळेत विष्णुशास्त्रींना त्यांचे आवडीचे विषय शिकवायची संधी मिळाली नाही, तरी एकंदरीत सहकारी मंडळीत त्यांचा वेळ मजेत जाई. त्या शाळेतील द्वारकानाथ राघोबा यांची बदली झाल्यामुळे विष्णुशास्त्रींना चाटफिल्डच्या कृपेने बढती मिळाली.

यानंतरच्या म्हणजे चौथ्या भागात निबंधमालेचा आरंभ या सदराखाली निबंधमालेची सुरुवात कशी झाली ते लेखकाने दिले आहे.

१८७४ मध्ये विष्णुशास्त्रींनी निबंधमाला सुरू केली. याबद्दल त्यानी १८७३ मध्ये ज्ञानप्रकाशात जाहिरात दिली होती. पहिल्या अंकावर तेवढे त्यांनी

विष्णु कृष्ण चिपळूणकर बी. ए.

असे नाव घातले होते. पुन्हा कधी घातले नाही.

विष्णुशास्त्री मालेसंदर्भात कोणाचा सल्ला घेत नसत. किंवा प्रती विकत घ्या म्हणून कोणापुढे हात पसरणेही त्यांना मान्य नसे. आपणहून ते कोणाला मालेचे अंक पाठवत नसत. याशिवाय या मालेतील सर्वच्या सर्व मजकूर लिहिणे, प्रुफे तपासणे वगैरे सर्व काम विष्णुशास्त्री स्वत: करीत दुसरे कोणी मजकूर घेऊन येत पण शास्त्रीबुवा ते स्वीकारित नसत. यामुळे एवढे व्हायचे की निबंधमाला कधीही वक्तशीर निघाली नाही. ती बहुतेक दोन–तीन महिन्यानी मागासलेली असायची.

पहिल्या दोन चार अंकातच निबंधमाला प्रसिद्ध झाली. त्यांच्यातील निबंधांच्या स्वरूपावर मुंबईहून निघणाऱ्या दंभसंहारक नावाच्या एका मासिकाने टीका केली तेव्हा शास्त्रीबुवांनी त्याला पाचव्या अंकात सणसणीत उत्तर दिले

मालेच्या त्यानंतरच्या अंकात 'इतिहास' विषय घेतला. आणि आठव्या अंकात त्याचा समारोप करताना शास्त्रीबुवांनी इंग्रज इतिहासकार आणि त्यांच्या मागून धावणारे भारतीय विद्वान यांचा परामर्ष घेतला. विशेष म्हणजे सरकारी शाळेत असणाऱ्या विष्णुशास्त्रींनी 'त्यांनी खंडेच्या खंडे उध्वस्त केली.' वगैरे मजकूर इंग्रजांविषयी लिहावा हे आहे. या अंकाने पुण्यातील मिशनरी मंडळी खवळली. त्यांनी तो अंक मेजर कँडी याना दाखवला. कँडीनी कृष्णशास्त्रींना त्याबद्दल विचारले आणि कृष्णशास्त्रींनी विष्णुशास्त्रींना पुन्हा असे लिहू नये अशी समज दिली.

त्यानंतर विष्णुशास्त्रींनी भाषादूषण लेखनशुद्धी, वाचन आणि भाषांतर हे विषय घेतले आणि त्यातून होतकरू लेखकास बरेच मार्गदर्शन केले आहे.

विष्णुशास्त्री हे पराकाष्ठेचे देशाभिमानी होते. भारताचा प्राचीन इतिहास राजघराणी आणि राजनितीधुरंधर याबद्दल त्यांना अतिशय प्रेम होते. लेखकाने एक उदाहरण दिले आहे. कोजागिरीच्या दिवशी दूध वगैरे आणून मित्रमंडळींसमवेत मजेत घालवण्याचा शास्त्रीबोवांचा विचार होता तेवढ्यात बातमी आली की गोसाव्याच्या वेशातील नानासाहेब पेशवे ग्वाल्हेरच्या शिपायांना सापडले आणि त्यांनी नानासाहेबांना गिरफ्तार करून इंग्रजांच्या हवाली केले. ही बातमी ऐकताच विष्णुशास्त्री इतके नाराज झाले की, त्यांनी ते सगळे कार्यक्रम रद्द करून टाकले.

त्यानंतर लेखकाने विष्णुशास्त्र्यांच्या घरची परिस्थिती, कृष्णशास्त्रांचे आजारपण, आणि विष्णुशास्त्री आणि पूना हायस्कूलचे हेडमास्तर मि. कुंटे यांच्यात जो बेबनाव झाला त्याची हकिकत दिली आहे. मि. कुंटे हे कृष्णशास्त्रींबद्दल अनादराने बोलत आणि पुन्हा विष्णुशास्त्री कॅटलॉग वगैरे ठेवण्यात कमी पडत असत. पुन्हा

जादा तास घेणे वगैरे उपद्व्याप शास्त्रीबोवा कधी करत नसत पुन्हा उशीरा जात. त्यामुळे कुंटे यांचे फार चुकत होते असेही नाही. पण लेखकाला वाटते की शास्त्रीबोवाची विद्वत्ता आणि इतर गुण यांचा फायदा करून घेता आला असता. शास्त्रीबोवा अप्रधान बाबीत कमी पडले तरी प्रधान बाबी, विद्वत्ता, शिक्षणपद्धती आणि शिकवण्याची हौस या बाबीत थोर होते याबद्दल कोणालाही शंका नव्हती.


यानंतर शास्त्रीबोवांनी निबंधमालेत लोकभ्रम हे विषय घेतले आणि त्यात पिशाच, शकून आणि ग्रहफळे यावर झोड उठवली. शास्त्रीबोवा अत्यंत सनातनी होते. त्यांना फक्त जुनेच पसंत असा ज्या मंडळींचा समज आहे त्यांनी मालेचे हे अंक वाचावेत म्हणजे शास्त्रीबोवा अंधःश्रद्धांवर केवढा कडाडून हल्ला चढवत याची कल्पना येईल असे लेखक म्हणतो. आणि आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ लेखकाने त्या निबंधातील एक प्रदीर्घ उतारा ज्यामध्ये शास्त्रीबोवांनी शकूनावर झोड उठवलीय, तो दिलाय.

वक्तृत्व या विषयावर लिहिताना विष्णूशास्त्रींनी दयानंद सरस्वती आणि पुण्यातील सुधारक मंडळीनी त्यांच्या वतीने काढलेली दयानंदांची हत्तीवरून मिरवणूक वगैरे गोष्टींचा उपहास केला आहे. त्यावरून लेखक शास्त्रीबोवांच्या धर्मविषयक कल्पनांकडे वळतो लेखकाच्या मते विष्णूशास्त्री सुधारणेच्या विरुद्ध होते असे नाही पण सुधारणा, त्याचा बभ्रा, वितंडवाद यांच्या विरुद्ध होते.

यानंतरच्या भागाला लेखकाने 'विचारस्वातंत्र्य' असे शीर्षक दिले आहे ते अगदी उचितच आहे. प्रथम लेखकाने कृष्णशास्त्रींच्या घरात जो वैचारिक बेबनाव चालला होता त्याची माहिती दिली आहे आणि पुन्हा तो विष्णूशास्त्रींच्या विचारस्वातंत्र्याकडे वळतो. विष्णुशास्त्री शाळापत्रक चालवत होते ते १८७५ सालापासून शाळाखात्याकडून बंद करण्यात आले. याला कारण होते श्री. विष्णूशास्त्री. प्रथम विष्णुशास्त्रींनी शाळापत्रकात संस्कृत कवी नावाची एक मालिका छापली होती त्यानंतर शाळापत्रकाचे वाचक म्हणजे शिक्षकांचे आग्रहावरून त्यांनी मराठी कविता हा विषय हाती घेतला. त्याच्या प्रस्तावनेतच त्यांनी लिहिले की शाळाखात्याचे मुख्य अधिकाऱ्यानी 'सर्वसंग्रह' नावाच्या काव्य मासिकाचा आश्रय काढून घेतल्यामुळे मराठी कवितेच्या पुनरुज्जीवनाच्या आशा मंदावल्या.

लेखकाने दोन्ही बाजूंचा विचार केला आहे. त्या प्रस्तावनेने सरकारी अधिकारी संतापले आणि चाटफिल्ड साहेबांनी ते बंद करण्याचा निर्णय घेतला. विष्णुशास्त्रींकडे त्यात बराच दोष होता हे लेखक स्पष्ट करतो. एक तर शाळापत्रक सरकारी होते हे शास्त्रीबोवांच्या ध्यानातच नव्हते. त्यातूनच सरळ सरळ सरकारवर आरोप कसे चालतील. दुसरे म्हणजे शाळापत्रक सरकारी आदेश शाळांना कळावेत हा होता शास्त्रीबोवांच्या उपद्व्यापामुळे या शाळापत्रकाचे अंक महिना दोन महिना उशिरा निघत. त्यामुळे एकंदरीत पाहता चाटफिल्डने विष्णूशास्त्र्यांबाबतीत थोडे औदार्यच दाखवले म्हणायला हरकत नाही.

त्यानंतर विष्णुशास्त्रींचा बराच वेळ निबंधमालेसाठी खर्च होऊ लागला. 'वेदार्थयत्नरत्न' नावाखाली वेदांचे भाषांतर क्रमशः येत असे त्यावर टीका ते लिहू लागले. सदरहू भाषांतरकर्ते अश्रद्धपणे भाषांतर करतात, भारदस्त भाषा वापरीत नाहीत आणि सायनाचार्य, मॅक्समुल्लर इत्यादींचे वेदावरील अविश्रांत परिश्रम लक्षात घेत नाहीत याबद्दल विष्णुशास्त्रींनी त्यांच्यावर प्रखर टीका केली.




पुस्तकाचं मुखपृष्ठ

□

आणि त्यानंतर इंग्रजी भाषा हा विषय घेऊन तिची उत्पत्ती, वृद्धी, हल्लीची दशा, इंग्रजीतील अमोल ग्रंथसंग्रह इत्यादींचे विष्णुशास्त्रींनी वर्णन केले. त्यामध्ये काही ठिकाणी इंग्रज ग्रंथ, ग्रंथकार यांच्या दोषांचेही वर्णन होते. ते मेजर जेकब नावाच्या माणसाने भाषांतरीत करून गव्हर्नरला सादर केले. 'एलिफयास' या नावाने त्याने हा राजद्रोह आहे हा पुण्यातील एका ब्राह्मणाने केलेला आहे, याची योग्य दखल घ्यावी असे त्याने सुचवले. विष्णुशास्त्रींनी ज्ञानप्रकाशात त्यास उत्तर दिले. या प्रकरणाचा अत्यंत गाजावाजा होऊन चाल्टफिल्डसह सर्व अधिकारी विष्णुशास्त्र्यांवर नाराज झाले.

त्यानंतर विष्णुशास्त्रींनी साने, मोडक, शाळीग्राम यांचेबरोबर 'काव्येतिहाससंग्रह' नावाचे मासिक काढायचे ठरवले जुने महाराष्ट्र कवींचे व संस्कृत कवींचे अप्रसिद्ध ग्रंथ, बखरी, पोवाडे वगैरे यामध्ये छापायचे ठरले.

त्यानंतर 'चित्रशाळा' या उद्योगाची सुरुवातही अशीच करायचे ठरले.

श्री. बाळकृष्ण वासुदेव जोशी नावाचे चित्रकार शाळीग्रामांमुळे शास्त्रीबोवांना परिचित झाले. त्यांना चित्रे छापण्याच्या पद्धतीची माहिती होती; पण पैशाचे पाठबळ नव्हते. शास्त्रीबोवांनी ही मदत करण्याचे कबूल केले.

१८७७ च्या अंकात शास्त्रीबोवांनी विस्ताराने डा. जानसन याचे चरित्र लिहिले. आपल्या मंडळींनी डा. जानसनप्रमाणे आपली जो

देशभाषा तिला प्रगल्भ दशा आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. यासाठी शास्त्रीबोवांनी हा उपद्व्याप केला होता आणि त्या प्रकारचा अत्यंत कळकळीचा उपदेश त्यांनी या निबंधात केला आहे. लेखकाने त्यातील उतारा दिला आहे.

'तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनी व विशेषत: आमच्या नवीन विद्वानांनी सतत उद्योग करण्याविषयी उपदेश घ्यावा. हे नवीन मंडळींना विशेषकरून सांगण्याचे प्रयोजन असे आहे की, जानसनने आपल्या देशबंधूंची जी सेवा केली, ती करण्याचे सामर्थ्य व तिचा सारा बोजा त्यांच्याच डोक्यावर आहे आणि सामान्यत: पाहता ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याकडे आहे व ती वहिवाटण्यास वरील गुणांची तर अत्यंत आवश्यकता आहे, यास्तव त्यांनीच त्याच्या संपादनार्थ विशेषत: झटले पाहिजे.'

या सुमारासच शाळाखात्याने विष्णुशास्त्रींची रत्नागिरीला बदली करून टाकली. लेखकाच्या मते श्री. चाटफील्ड यांचा स्वभाव गरीब त्यामुळे त्यांनी विष्णुशास्त्रींची फक्त बदली करून टाकली. वास्तविक पाहता विष्णुशास्त्रींचे अपराध एवढे महान होते की, दुसरा एखादा डायरेक्टर असता तर विष्णुशास्त्रींच्या बदलीवर थांबताना.'

पण विष्णुशास्त्रींनी कुरकुर केली नाही. त्यांना त्या वर्षी पुण्यात दोन नवे उद्योग सुरू करायाचे होते. त्यावेळीच झालेली ही बदली स्विकारून ते रत्नागिरीला निघून गेले.

'रत्नागिरीस बदली' या भागात लेखकाने विष्णुशास्त्रींच्या रत्नागिरीतील वास्तव्याची हकिकत दिली आहे. यातच या साली १८७८ मध्ये कृष्णशास्त्रींचे २० मेला देहावसान झाले. त्यावरून कृष्णशास्त्रींची योग्यता, त्यांचा इंग्रजामधील मान वगैरे गोष्टी लेखकाने तपशिलवार दिल्या आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर इस्टेटीच्या वाटण्यावरून विष्णुशास्त्रींच्या घरी कलह चालू झाला.

## राजिनामा, नवी शाळा

त्या वर्षीच्या निबंधमालेत शास्त्रीबोवांनी मोरोपंतांची कविता हा विषय घेतला. या विषयावर १३।१४ वर्षे त्यांचे अध्ययन चालले होते. पंतांच्या कवितेवर चुकीची मते मांडणाऱ्या रा. माधवराव रानडे, डा. विल्सन आणि श्री. कृष्णशास्त्री यांची मते शास्त्रीबोवांनी खोडून काढली आणि मोरोपंतांच्या कवितेचे उत्तम गुण सांगून या निबंधांचा समारोप केला आहे. लेखकाच्या मते सोलापूरकर जोशीबोवांनंतर पंतांच्या कवितेचे निरूपण करणारा आणि पंतांच्या कवितेचे निर्दोषीपण सिद्ध करणारा शास्त्रीबोवांइतका कोणी झाला नाही पण याबरोबरच लेखक स्पष्ट करतो की, शास्त्रीबोवांच्या निबंधात अंमळ अव्यवस्था असल्यामुळे वाचकाचे टिकाणी एकदम प्रकाश पडत नाही. तर त्याला एक दोनदा अंक वाचून विवेचनसंगती लावावी लागते.

या वेळेस विष्णुशास्त्र्यांनी नोकरी सोडण्याचे ठरवले. प्रथम त्याचा बभ्रा होऊ नये म्हणून त्यांनी सहा महिन्याची रजा घेतली आणि ते पुण्यात आले आणि त्यानी चित्रशाळेच्या कामात रस घेतला. याशिवाय बुधवारात 'किताबखाना' म्हणून शाळीग्राम यांच्याबरोबरीने एक पुस्तकाचे दुकान काढले. रजा संपायच्या सुमारास त्यांनी राजीनामा पाठवला. त्यांनी राजीनामा देऊ नये म्हणून त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न झाला; पण शास्त्रीबोवांचा निर्धार झाला असल्याने त्यांनी माघार घेतली नाही.

राजिनामा दिल्यानंतर गावात बातमी पसरली की शास्त्रीबोवा एक इंग्रजी शाळा काढण्याचा बेत करीत आहेत. सरकारी शाळेपेक्षा कमी खर्चाने वेगळ्या तऱ्हेचे शिक्षण द्यावे अशी त्यांची योजना होती. या योजनेसद्दल ऐकून रा. टिळक, रा. आगरकर, करंदीकर, भागवत ही डेक्कनमधून नुकतीच बाहेर पडलेली मंडळी या उद्योगात भाग घेण्यास प्रवृत्त झाली. लेखकाने लोकमान्य टिळकांचा उल्लेख रा. टिळक असा केलाय. पुन्हा पुढे तो मि. टिळक असा उल्लेख करतो. लेखक म्हणतो.

'याप्रमाणे नवीन शाळा काढण्याचा विष्णुशास्त्रींनी निश्चय केला. परंतु मि. आगरकर व भागवत व करंदीकर हे तूर्त काही कारणास्तव या बेतात येईनात. मि. टिळक हे मात्र येण्यास कबूल झाले; परंतु त्यांचे म्हणणे पडले की, नवीन शाळा न काढता कालेज काढावे. ते म्हणाले, 'मी महिना पंधरा दिवस तूर्त येतो; परंतु मी एल. एल. बी. चा डिप्लोमा घेऊन आल्यावर मग काय तो कायमचा निश्चय करीन.' (पृष्ठ २२७, भाग ६ वा.)

परंतु विष्णुशास्त्रींनी ही नवीन मंडळी हळूहळू येतील अशी उमेद धरून शाळेबद्दल जाहिरात दिली.

## निर्भय वृत्ती

१ जानेवारी १८८० रोजी मोरोबादादा फडनवीस यांच्या वाड्यात १५० मुलांची नावे पटावर नोंदवून घेऊन विष्णुशास्त्री यांनी पाच मिनिटे इंग्रजीत भाषण करून न्यू इंग्लिश स्कूल स्थापना केली. यावेळी शाळेत ३ शिक्षक होते. विष्णुशास्त्री, रा. टिळक व रा. माधवराव नामजोशी. लेखक टिळकांबद्दल लिहितो,

'रा. टिळक यांचा प्रथम निश्चय जरी पक्का नव्हता व शाळेऐवजी कालेज स्थापन करावे असा जरी त्यांचा मतभेद होता तरी ते शाळेला जे एकदा चिकटले ते तीस दृढ धरून राहिले. विष्णुशास्त्री यांचे अंगी धैर्य, विद्वता व देशहिताकरता स्वत:स पैशाची व अंगमेहनतीची झीज लावून घेणे वगैरे जे गुण होते त्यामध्ये त्यांचे खालोखाल यांचीच पायरी लागेल यात संशय नाही. रा. टिळक यांचे कित्येक मतवैचित्र्याबद्दल व त्यांचे काही अंशी तापट व अग्रही प्रकृतीवरून त्यास कित्येक लोक नावे ठेवतात. तरी ज्या गृहस्थानी एल. एल. बी. चा डिप्लोमा मिळाल्याबरोबर इतर होतकरू विद्वान मंडळींप्रमाणे हायकोर्टाची वाट न धरिता किंवा मुनसफ़ची जागा पटकावण्याची हाव न बांधता विष्णुशास्त्र्याप्रमाणे देशसेवेकडे आपले आयुष्य खर्चण्याचा निश्चय केला, त्यांची योग्यता कमी मानणे आणि ज्या रावसाहेबांचा आणि रावबहादुरांचा सरकारी नोकरीत स्वत:ची व स्वत:चे कुटुंबाची चैन चालण्याकरता जन्माचा जन्म जायाचा त्यांचा मोठा वडिजाव करणे, यापेक्षा आपले लोकांमध्ये खरे थोरपणाची यथार्थ परीक्षा करण्याची अद्याप समजूत आली नाही याबद्दल दुसरे कोणते प्रमाण पाहिजे बरे?' (पृष्ठ २३३ / ३४ भाग ७ वा.)

मे पर्यंत शाळेतील मुलांची संख्या पाचशेवर येऊन ठेपली, सुटी सुरू होण्यापूर्वी शास्त्रीबोवांनी जे भाषण केले त्यामध्ये शास्त्रीबोवांची निर्भय वृत्ती दिसून येते. लेखकाने ते सगळे भाषण दिले आहे. आपल्या शिक्षकांना सर्व स्वातंत्र्य आहे. आपला शिक्षक कसा आहे हे सांगताना शास्त्रीबोवा म्हणाले.

'He is here something better than a living automation ruled by the time-table on one hand and the clock on the other; something better than a wretched slave condemned for his allowance of bread to watch the looks of that Superiors Intelligence whose word is law and whose Olympian thunders – he may never venture to tempt ! (पृष्ठ २३७ भाग ७ वा.)

हे पुस्तक १८९४ साली लिहिलेय. त्यामुळे लेखकानेच तोच बाणा पुढे चालवलाय हे स्पष्ट होते.

न्यू इंग्लीश स्कूलची भरभराट सहन न होऊन त्यावेळचे पूना हायस्कूलचे प्रभारी हेडमास्तर यांनी त्याविषयी काय वाटेल ते लिहिले. त्याची पुण्यात बरीच चर्चा झाली.

वा. शि. आपटे हे शाळेला येऊन मिळाल्यावर शाळेत विशेष टापटीप व व्यवस्था आली असे लेखक नमूद करतो.

'चित्रशाळा' आणि 'किताबखाना' हे दोन्ही उत्तम प्रकारे चालले होते, फक्त शाळीग्राम हे गृहस्थ आळशीपणाने व अव्यवस्थितपणे काम करत त्यामुळे त्यांच्याशी भागी मोडून टाकावी असे शास्त्रीबोवांना वाटू लागले होते. याविषयी लिहून लेखक पुन्हा निबंधमालेकडे वळतो.

त्या वर्षी शास्त्रीबोवांनी आपली लेखणी 'लोकहितवादी' गोपाळ राव हरि देशमुख यांच्यावर उचलली. लोकहितवादींची विद्वत्ता मान्य करून लेखक म्हणतो इंग्लिश लोकांचे शहाणपण, त्यांचा पराक्रम, त्यांची विद्या यापुढे आपले सर्व काही तुच्छ मानणाऱ्यांमध्ये ते होते. लोकहितवादी आणि विष्णुशास्त्री यांच्यात ३० वर्षांचे अंतर. या काळात विष्णुशास्त्री आदि विद्वानांना संस्कृत विद्यांचा इंग्रजी तऱ्हेने अभ्यास करण्याची संधी मिळाली. मॅक्समुल्लर, विल्सनसारखे विद्वान आपल्या विद्यांविषयी आदराने लिहितात हे पाहून त्यांची आपल्या प्राचीन विद्यांविषयी भावना तीव्र झाली होती. लोकहितवादींच्या वेळची इंग्रजांविषयी कौतुक आणि आदराची भावना नाहीशी होऊन त्याजागी तीव्र देशाभिमान आला होता हे लक्षात घ्यावे. केवळ सनातनी आणि सुधारणावादी असा रंग त्याला देऊ नये म्हणून लेखकाने या विषयावर लिहिण्यापूर्वी सविस्तर निरुपण दिले आहे आणि मग तो त्या १२ निबंधाचा विषय सांगतो.

नाना फडणवीसांवर लोकहितवादींनी जे आरोप केले त्यांना शास्त्रीबोवांनी यात उत्तर दिलेले आहे. नानांनी केवळ अकलेच्या जोरावर इंग्रजांना पंचवीस वर्षे झुलवत ठेवले याचा पुरावा शास्त्रीबोवांनी ग्रांटडफ आणि एशियाटिक आन्यूएल रेजिष्टरमधील उताऱ्यांनी दिला. लोकहितवादींनी 'सांप्रतचे पंडितांचे ज्ञान' मध्ये जुनी शास्त्रे आणि काव्ये याबद्दल जे मत व्यक्त केले त्यालाही शास्त्रीबोवांनी उत्तर दिले. ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनाने युरोपात सुधारणा आली तेव्हा आपली जी जुनी संस्कृत, जिचे शास्त्रीबोवांच्या काळात ख्यातनाम युरोपियन विव्दानांकडून रसग्रहण होत होते त्याचेही आवश्यक अध्ययन हवे हे शास्त्रीबोवांनी मांडले. लोकहितवाद्यांनी 'आर्यविद्या उपयोगी पडत नाही' हे विधान केले, त्याला शास्त्रीबोवांचा आक्षेप होता. केवळ मेकॉले, मिल्ल आदी भारतद्वेष्ट्या लोकांचे ऐकून मते बनवणे योग्य नाही असे त्यांना सुचवायचे होते. लोकहितवादी भारतीय विद्यांना नावे ठेवतात हे त्यांना रुचले नाही. 'उपयोग' ही कसोटी लावल्यास तर एक नांगरणे व रोटी बनवणे सोडून जगातील हजारो विद्या, कला, व्याकरणे मातीमोल ठरवाव्या लागतील असा शास्त्रीबोवांनी युक्तिवाद केला. भिक्षुक हे वेदग्रंथाचा अर्थ समजून न घेता ते केवळ तोंडपाठ करतात तेव्हा ते महामूर्ख होत या गोष्टीचे खंडन करताना शास्त्रीबोवांनी युक्तिवाद केला की एखाद्या सरकारी तिजोरीमध्ये पैसा किती आहे, त्याची व्यवस्था काय आहे याची चौकशी न करता प्राण पणाला लावून खांद्यावर बंदूक अडकवलेला एखादा जवान पहारेकरी जसा मूर्ख म्हणता येणार नाही तसाच वेद, पुराणादि संपत्ती हजारो वर्षे रक्षण करणारा ब्राह्मणही मूर्ख म्हणता येणार नाही. शास्त्रीबोवांचा आपल्या जुन्या परंपरा, जुन्या विद्या आणि संस्कृती यांचा अभिमानच यामध्ये दिसून येतो.

लेखक म्हणतो विष्णुशास्त्रींच्या या प्रतिपादनास उत्तर देण्यास लोकहितवादी जिवंत असते तर अधिक यथार्थ ज्ञान झाले असते यात शंका नाही.

## व्यक्तिमत्त्व व मनोवृत्ती

त्या साली आगरकर, ज्यांचा निश्चय होत नव्हता, ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. आगरकरांचे व शास्त्रीबोवांचे राजकीय विचार एकच होते. आता या सगळ्या मंडळींनी आपल्या मताचा प्रसार करण्यासाठी एक प्रेस काढण्याचे ठरवले. शास्त्रीबोवांनी एका छापखान्याचे साहित्य विकत घेतले होते. त्या साहित्यानेच 'आर्यभूषण' छापखाना सुरू झाला. आणि पुढच्या वर्षापासून मराठीत 'केसरी' व इंग्रजीत 'मराठा' ही वृत्तपत्रे काढण्याचे ठरले. त्याच्या नोटिशीवर पहिली सही विष्णुशास्त्रींची, नंतर रा. टिळक, आपटे, आगरकर, डी. गर्दे इ. आठ दहा गृहस्थांच्या सह्या होत्या.

त्या वर्षी मि. तेलंग हे एके दिवशी मि. टिळक यांचे बरोबर शाळा पाहण्याकरता आले. ते मि. तेलंग म्हणजे न्या. तेलंग होत. 'बोलता बोलता आम्ही हळूहळू या शाळेला जोडून एक कॉलेजही काढणार आहोत असे मि. टिळक यांनी सुचवले.' त्यावर तेलंग म्हणाले की दोन लाख जमले ते येतील. तूर्त काही हजार कमी आहेत. त्यावर विष्णूशास्त्री टिंगल करीत असत. उत्तर वय विद्यादानात घालवण्याचे आश्वासन देणारे तेलंग नंतर सरकारी नोकरीचा भपका- आणि बडेजाव या करिता पराङ्मुख होऊन न्यायमूर्ती बनले. याचा लेखकाने खेद केला आहे.

विष्णुशास्त्री हे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घोकंपट्टी, परीक्षेची तयारी इ. गोष्टींपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान, स्वजात्याभिमान, स्वदेशाभिमान, स्वावलंबन इत्यादी गुण यावेत यासाठी प्रयत्न करीत. त्यामुळे अल्प मतीच्या, सरकारी नोकरीचा हव्यास धरणाऱ्या विद्यार्थ्यांना विष्णुशास्त्रींचे शिक्षण नकोसे वाटू लागले.

पण विष्णुशास्त्रींच्या उद्योगानी प्रथम प्रथम नाराज झालेल्या अनेकांना आता शास्त्रीबोवांच्या योग्यतेबद्दल आदर वाटू लागला. यामध्ये मि. चाटफिल्ड हे एक होते.

'केसरी' च्या प्रकाशनाचे काम रा. आगरकर यांच्याकडे आणि 'मराठा' चे रा. टिळक यांच्याकडे होते. केसरीतील पहिले आर्टिकल शास्त्रीबोवांचे असे लेखकाने स्पष्ट लिहिले आहे की शास्त्रीबोवा वर्तमानपत्राचे धर्तीवर कधी लिहीत नसत. त्यांना वर्तमानपत्रे वाच-

ण्याचा कंटाळा असे. त्यामुळे राजकीय किंवा इतर प्रचलीत प्रश्नावर लिहिण्याचे त्यांच्या मनात कधी घाटत नसे. समाजव्यवस्था, जातीभेद किंवा तत्सम विषयावरच ते लिहीत. ' प्रार्थनासमाज ' या विषयावर त्यांनी एकदा केसरीमध्ये लिहिले. 'केसरी' चे संपादक रा. आगरकर यानी जेव्हा ते वाचले तेव्हा शास्त्रीबोवांची धर्मावरील मते त्यास पसंत न पडून त्यांनी त्यात बरीच बदलाबदल करून छापला. त्यामुळे लेखकासारखे शास्त्रीबोवांचे चाहते नाराज झाले. खुद्द बोवाही नाराज झाले; पण ' संपादका ' चे अधिकार त्यांनी पूर्णपणे मानल्यामुळे ते स्वस्थ राहिले.

त्यानंतर लेखकाने शास्त्रीबोवांचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, नित्यक्रम, मनोवृत्ती याबद्दल तपशीलाने लिहिले आहे.

### स्वभाववैशिष्टये

शास्त्रीबोवा मध्यम उंचीचे, मध्यम अंगलटीचे होते. त्यांचा चेहराही मनात भरण्यासारखा किंवा बुद्धीदर्शक होता असे नाही. ज्यांची शास्त्रीबोवांशी प्रथम गाठ पडली व ज्यांना त्यांच्याशी बोलण्याचे काम नसे अशांचे शास्त्रीबोवांबद्दल चांगले मत होत नसे. शास्त्रीबोवा स्वतःहून बोलत नसत. व्यावहारिक आणि राजकीय गोष्टी चालल्या तर शास्त्रीबोवा हूं हूं यापेक्षा जास्त बोलत नसत. संस्कृत किंवा इंग्रजी ग्रंथावर ते बहारदार बोलत; पण ते सुद्धा ज्यांचा विशेष परिचय आहे अशाशीच. कामाशिवाय शास्त्रीबोवा गप्पा मारत बसलेत असे दृश्य विरळाच. लेखकास स्वतःला मात्र विष्णुशास्त्रींच्या बहुश्रुततेचा लाभ झाला असे तो सांगतो. अनेक चांदण्यारात्री ते त्यास संस्कृत काव्यातील खुबीदार जागा, सुभाषित पद्ये, मोरोपंतांच्या आर्या वगैरे सांगत असत. त्यातील काही लेखकाने उदाहरण म्हणून दिलेली आहेत.

धार्मिक बाबींत शास्त्रीबोवांचा आग्रह नसे पण त्या काळी साधारण मान्य असलेले धर्माचरण मात्र सांप्रदाय म्हणून ते करीत असत.

त्यांचे कपडे साधे असत. चहा कॉफीचा त्यांना कंटाळा असे. बारा एक वाजेपर्यंत ते वाचत बसत. बहुतेक दिवस निबंधमाला लिहिण्यात ते घालवत. गावात नवीन काही असो, नाटक, सरकस, जादूचा खेळ, शास्त्रीबोवा हजर राहतच. तमाशा, गोंधळ, लावणी वगैरेना ते अगदी आग्रहाने जात. ( शाळीग्राम यानी ऐतिहासिक पोवाडे, रामजोशी, अनंतफंदी इत्यादी लावण्यांचे संग्रह शास्त्रीबोवांच्या उत्तेजनानेच केले.)

लेखक म्हणतो त्यांचे ठिकाणी स्वतःविषयी बराच अहंपणा असे व तो त्यांच्या लेखात बराच दिसून येतो. एकदा लेखकाला ते म्हणाले.

' I am the Sivaji of the Marathi language, who had not his equal either to precede or succeed him ! ' (पृष्ठ २८२ भाग ७ वा.)

त्यावेळेच्या अनेक विद्वान आणि पुढारी मंडळीना ते First bones of time असे उपहासाने संबोधत. त्या सगळ्यांचे बोलणे फार आणि करणे थोडे–व्याख्यानांची मात्र झोड उठवतील असे शास्त्रीबोवांना वाटे.

पैशाच्या बाबतीत ते अत्यंत ढिले होते. दुसऱ्यास उसने दिलेल्या पैशाचा हिशेब न ठेवल्यामुळे त्यांचे बरेच पैसे बुडले.

विष्णुशास्त्री स्वतःहून कोणाला उपद्रव देत नसले तरी त्यांचा स्वभाव खुनशी आणि आग्रही असल्यामुळे एकदा मनुष्य त्यांच्या मनातून उतरला की पुन्हा त्याच्याशी ते कधीही बोलत नसत. त्यांचे प्रेम आणि कळकळ नेमस्त असे.

विष्णुशास्त्रींच्या स्वभाव वैशिष्ट्यांना सांगून लेखक त्या सालातील निबंधमालेकडे वळतो. ' आमचे देशाची स्थिती ' यावर शास्त्रीबोवांनी ८१ सालात ७ निबंध लिहिले. यामध्ये इंग्रज कसे आले त्यांनी सत्ता कशी संपादिली, राज्यकर्ते इंग्रज आणि प्रजा यामध्ये एकमेकांबद्दल काय भावना आहेत, याविषयीचे निरुपण करून इंग्रजांनी या देशात कोणत्या सुधारणा आणल्या याविषयी देखील शास्त्रीबोवांनी लिहिले. त्यानंतर आम्हाला आमचे राज्य करता येणार नाही या मुद्द्याचे खंडन करून शास्त्रीबोवा इंग्रजांच्या अन्यायाकडे वळतात. ' येशू 'ची महत्ता वर्णून ते म्हणतात–

' तुम्ही आपल्या देशातून उठा आणि परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यानी कधी तुम्हास काडीचा उपद्रव दिला नाही त्यांचे मुलूख काबीज करा, ज्यांनी सालसपणे तुम्हाला आश्रय दिला त्यांच्यावरच उठून अरेरावी करा, रणवाद्ये वाजवा, जयस्तंभ उभारा, खोट्या सह्या करा, दुसऱ्यांच्या बायका उपटा, दिवसा ढवळ्या दरवडे घाला वाटेल त्यास उचलून फाशी द्या, यापैकी एकही प्रकार ' शुभ वर्तमानात ' नाही.'

आणि हे प्रकार करणाऱ्या इंग्रजांबद्दल–

' आमची तर पक्की खात्री आहे की, हेस्टिंग्स, डालहौसी, लिटन, टेंपल, फ्रीयर अशासारख्यास ख्रिस्ताच्या शिष्यात सामील करणे म्हणजे वेषधारी लांडग्यांस मेंढयात गणणे....

शास्त्रीबोवांच्या लेखणीला पक्की धार आलेली होती.

पुढे ते लिहितात.

' इंग्रज लोक गेल्या शतकभर आमच्याशी ज्या तऱ्हेने वागले त्याच तऱ्हेने इतरानी त्यांच्याशी वागावे असे ते इच्छितात काय ? आम्ही उठून उद्या इंग्लंडवर गेलो, सारी दौलत आणून हिंदुस्थानात भरली तर चालेल काय ? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील सारी प्रजा पिळून काढली असता ते आमच्या पाश्चात्य आर्यबंधूस कितीसे मानवेल बरे ? फूलर साहेबानी एका शिपायास मारले आणि त्याच्या बायकोस ३० रु. त्याच्या प्राणाची भरपाई म्हणून दिले. त्याप्रमाणे एखाद्या ख्रिस्त पुत्रास आकाशातील बापाकडे रवाना करून मडमसाहेबाची समजूत वरील दक्षिणा देऊन केली तर मोठी मौज होईल नाही बरे ? बिचारा क्रुसावर चढणारा येशू जर आपल्या शिष्यास असे सांगतो की, मी तुम्हास आकाशातील राज्याचे वाटेकरी करीन तर आजपर्यंत या सच्छिष्यानी साऱ्या पृथ्वीवर जो धिंगाणा घातला व घालत आहेत, व नवी नवी रणसामुग्री करून एकमेकाच्या उरावर बसण्यास ते जे नेहमी टपलेले असतात, हा सर्व प्रकार ईश्वरपुत्राच्या कानावर जेव्हा पूर्वोक्त दिवशी जाईल तेव्हा त्यास काय वाटेल बरे ?'

शास्त्रीबोवांच्या लेखणीला असा बहर आलेला असताना शास्त्रीबोवांना काळाने ओढून नेले. या निबंधात आपल्या देशाची ही तव्येत बिघडली आहे ती सुधारण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत यावर शास्त्रीबोवांनी निरुपण केले आहे. त्यामध्ये शास्त्रीबोवांचे

आत्यंतिक देशप्रेम दिसून येते. 'आमचे दैव फिरल्यामुळे हल्लीच्या अवस्थेत आम्ही येऊन पडला आहोत असं शास्त्रीबुवा लिहितात तेव्हा आपल्या देशातील प्रखर पराक्रमी तलवारबहाद्दराची आणि राजकारणधुरंधराची मालिका शास्त्रीबोवांच्या नजरेपुढे तरळली असावी आणि 'वयापटन क्लैव' वारन् हेस्टिंग्ज सारख्यांस आपण हार गेलो याचा नितांत खेद वाटत असावा, असे वाटते.

आठवा भाग 'अंत' नावाचा आहे. या भागात शास्त्रीबोवांच्या शेवटच्या दोन अडीच महिन्याची हकिकत आली आहे. शास्त्रीबोवांच्या निबंधमालेस आता आठ एक वर्षे होऊन गेली होती, तेव्हा ती संपवून ग्रंथमाला नावाचा उद्योग सुरू करण्याच्या बेतात होते. विष्णुशास्त्रींना मंडळींचा फोटो घ्यायची एके दिवशी इच्छा झाली. सगळयांचे फोटो झाल्यावर शास्त्रीबोवांचा एक उभ्याने फोटो घ्यायचा विचार ठरला; पण फोटोग्राफरने शास्त्रीबोवांना जास्त वेळ उन्हात उभे केल्याने शास्त्रीबोवा घेरी येऊन पडले. दुखापत झाली. घरगुती उपचाराने ती बरी झाली; पण बारीक ताप चालू राहिला. वरून तब्येत ठीक होती. निबंधमालेचे लिखाण चालू होते; पण अशक्तपणा आणि बारीक ताप यामुळे शास्त्रीबोवा शाळेस मात्र महिना दिड महिना गेले नाहीत. 'काव्येतिहाससंग्रह' नावाचा जो उपक्रम चालू केला होता, त्यातूनही शास्त्रीबोवांनी अंग काढून घेतले.त्यात शास्त्रीबोवा आणि व्यवस्थापक यांच्यातील गैरसमजाने एकमेकावर वृथारोप झाले आणि शास्त्रीबोवांना निष्कारण मनस्ताप झाला. त्याच सुमारास कोल्हापूर संस्थानचे माजी कारभारी माधवराव बर्वे यांनी केसरी मराठावर अब्रू नुकसानीचा खटला दाखल केला. शास्त्रीबोवांचा त्यात प्रत्यक्ष संबंध नव्हता तरी बोवांची तब्येत बरोबर नसल्यामुळे त्यांनी त्यात मनस्ताप करून घेतला.

## मरणोत्तर प्रसिद्धी

शास्त्रीबोवा टंगळमंगळ करून शाळा चुकवतात असे कोणाला वाटू नये म्हणून जरा बरे वाटताच ते शाळेत गेले; पण जरा काम करताच त्यांना इतका थकवा आला की, त्यांना परतावे लागले. त्यांनी डॉक्टरना तब्येत दाखवली नाही कारण त्यांचे वाईट मत होते. काहींच्या तऱ्हेवाईकपणाने त्यांनी यच्चयावत डॉक्टर मंडळींबद्दल वाईट मत बनवून घेतले होते आग्रहामुळे त्यांनी वैद्याचे औषध घेतले पण फरक पडला नाही. तेवढयात त्यांनी एक कलिंगड मागवून खाल्ले आणि तब्येत भयंकर बिघडली. ताप चढू लागला. इतरांनी त्यांना भात भरवण्याचा प्रयत्न केला. तेवढयात आईचा आवाज ऐकून ते धडपडत पाटावर जाऊन बसले. पुन्हा त्यांना वात सुरू झाला. त्यांचे काका सितारामपंत हे डॉ. विश्राम यांना घेऊन आले. ज्यांना कृष्णशास्त्री Vishram, you are my God असे म्हणत असत; पण विष्णुशास्त्रींचा डॉक्टरावर विश्वास नसल्यामुळे व त्यांना वात झाल्यामुळे ते ओरडले,

'I won't take your medicine. I shall'nt ( मूळ प्रतीतील ) be poisoned! Take care you will have to answer. This is Kolhapur Maharaja's case.' ( पृष्ठ ३०८ भाग ८ वा )

त्यामुळे डॉ. विश्राम यांनी औषध दिले नाही. सितारामपंतांनी आग्रह केला; पण विश्रामनी त्यांना वैद्यच बोलावण्याचा सल्ला दिला. त्यानुसार वैद्यबुवा काढा पाजून गेले. जवळची मंडळी विष्णुशास्त्रींच्या अत्यवस्थतेची कल्पना न आल्यामुळे शेजारच्या खोलीत थकून भागून झोपली तेव्हाच म्हणजे पहाटे ५॥ वाजता, गुरुवार ता. १७ मार्च १८८२ ला शास्त्रीबोवांचा प्राण निघून गेला.

शास्त्रीबोवांच्या निधनाची वार्ता पसरली. लोकांचे थवे जमू लागले. अफवा पसरली की, कोल्हापूर प्रकरणाच्या धास्तीने शास्त्रीबोवांनी आत्महत्या केली त्यामुळे पोलिसांनी प्रेत नेण्यास आडकाठी आणली; पण वजनदार माणसांनी डॉ. विश्राम यांचे सर्टिफिकेट दाखवून त्यातून मार्ग काढला. फक्त रामभाऊ साने यांनी शास्त्रीबोवांचे गुण गाणारे भाषण केले. इतरांना करायचे होते; पण प्रो. केरोपंत म्हणाले की, पुन्हा पोलिसांची कटकट नको. शास्त्रीबोवांचे बंधू लक्ष्मणराव हजर नसल्यामुळे त्यांचे चुलतबंधू विनायकराव यांनी अंत्यसंस्कार केले.

शास्त्रीबोवांच्या निधनानंतर सर्व महाराष्ट्रभर शोक झाला. मराठी भाषेचा कट्टर पुरस्कर्ता गेला. या शब्दात वर्तमानपत्रांनी आठवडाभर शास्त्रीबोवांवर लिहिले. याशिवाय लंडनमधील 'ग्राफीक' या पत्रात शास्त्रीबोवांचा फोटो आणि जीवनवृत्तांत आला. 'ग्राफीक' मध्ये १६ मे १८८२ साली असे म्हटले आहे.

'Vishnu Krishna Chiplunkar,

This worthy Indian citizen, who died on the 17th March last, at the early age of thirty-two, displayed an enterprise and energy in the persuit of benevolent aims which is nowhere to common, and is especially valuable in India where the people are rather want to lean upon the Government for any improvement. ( पृष्ठ २१३ भाग ८ वा )

यानंतर शास्त्रीबोवांचे संक्षिप्त जीवनचित्र देऊन शेवटी म्हटले आहे,

'He did not live to reap the fruits of his labours, but he nevertheless deserves a hearty recognition as one of those pioneers of progress, who if they become numarous enough, will some day make India, a self governing community.' ( २१४ भाग ८ वा )

९ व्या म्हणजे शेवटच्या भागात लेखकाने शास्त्रीबोवांच्या 'भाषासेवा आणि देशसेवा' याचा परामर्श घेतला आहे. शास्त्रीबोवांची भाषा घाटावरील महाराष्ट्र भाषा आहे. त्यालाच 'पुण्याची मराठी' असे नाव आहे. शास्त्रीबोवांनी इंग्रज ग्रंथकारांची आवेशयुक्त चटकदार वर्णन करण्याची हास्य, विनोद, पुण्यभाव, तिरस्कार इ. गुणांनी वाचकाला भारून टाकणारी शैली संपादन केली होती. असे भाषेचे लेखकाने शास्त्रीबोवांच्या वर्णनात्मक, त्वेषयुक्त, टर उडवणारे, बुद्धीवाद करणारे वगैरे गोष्टींचे नमुने दिले आहेत. शास्त्रीबोवांनी सादर केलेले काही विनोदही दिलेले आहेत.

मराठी भाषा अपक्व दशेत असून तीत गद्यग्रंथ म्हणण्यासारखा नाही या मुद्द्यावरून १८७० सालापासून युनिव्हर्सिटीच्या वरच्या परीक्षातून काढून टाकण्यात आले. नव्या पदवीधरांना मराठीचा विटाळ सोसत नसे. व्याख्यानात किंवा पत्रात लिहिण्यास इंग्रजीशिवाय ते चालवत नसत. प्रत्येकाने असा मराठीचा द्वेष चालवला असताना शास्त्रीबोवांनी आवाज उठवला आणि धारदार लेखणीच्या सहाय्याने 'मराठी माऊली' वरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आणि निबंधांच्या सहाय्याने मराठी भाषेत सुशिक्षितात रस निर्माण केला. ( याची पावती अहिताग्नी राजवाडे यांनी श्रीविद्याने प्रकाशित केलेल्या आपल्या आत्मवृत्तात दिली आहे. आपली मराठी शास्त्रीबोवांच्या निबंधानी चांगली झाल्याचे त्यांनी लिहिले आहे. निबंधमालेचे सर्व अंक त्यांच्या घरी होते. ते शास्त्रीबोवांचे इतके निस्सीम

भवत होते की, शास्त्रीबोवांची मते हीच त्यांना ग्राह्य वाटत आणि त्यांच्या वेळच्या पिढीची ती अवस्था होती. )

तर विष्णुशास्त्री स्वतःला मराठी भाषेचा शिवाजी म्हणवून घेत याचे कारण हेच होय. एक जमाना या निबंधमालेने वेडा केला आणि या युगाचे वर्णन लेखकाने अतिशय ओघवत्या भाषेत आपल्या वाचकांसाठी केलेले आहे.

उपसंहारात लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर लिहितात की, या चरित्राची सामग्री आणि योग्यता त्यांच्याकडे असल्याने हे ऋण राहिले होते आणि त्यावरून स्पष्ट होते की, हे त्यांनीच लिहिलेले आहे. अर्थात त्यांच्याशिवाय विष्णुशास्त्रींचे एवढे जवळून दर्शन कोणालाच शक्य नव्हते. पुस्तकाचा उपसंहार १ जून, १८९४ साली लिहिला आहे. त्यावरून पुस्तकाचा प्रकाशन दिनांकही तोच असावा असे मानायला हरकत नाही.

असे हे शास्त्रीबोवांचे चरित्र प्रत्येक मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्याने वाचले पाहिजे इतके सुंदर बनले आहे. लेखकाने प्रत्येक भागाला सुरुवात करताना एखादे इंग्रजी कवन किंवा संस्कृत सुभाषित दिले आहे. लक्ष्मण कृष्ण यांचा उल्लेख तृतीय पुरुषात असला तरी त्यांनीच हे पुस्तक लिहिले असावे असे स्पष्ट करणारी अनेक विधाने त्यात आहेत. उदा.

यामुळेच विष्णुशास्त्री यांचे लक्ष्मणरावाशी विशेष जमे...विष्णुशास्त्री यानी संस्कृत ग्रंथातील मर्मस्थाने त्यास सांगावी त्याचप्रमाणे इंग्रजी ग्रंथातीलही त्यानी श्रमाने मिळवलेली माहिती आपले भाविक कनिष्ठ बंधूस देत असावी...परंतु लक्ष्मणरावांची वृत्ती पूर्ण भाविक असल्याने त्यास विष्णुशास्त्री यांनी आपल्या एखाद्या स्नेह्याप्रमाणे हरएक प्रकारच्या गंमती, सोबत्यांच्या व प्रोफेसर लोकांच्या नकला त्याप्रमाणे धर्म, राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था वगैरे विषयावरील त्यांचे विचारही मोकळे मनाने सांगावी; व लक्ष्मणराव हे सर्व नीट लक्ष लावून ऐकत म्हणून विष्णुशास्त्री यांस अधिकाधिक सांगण्याची हौस वाटे.' ( पृष्ठ १०१ भाग ३ रा )

लेखकाने स्वतःविषयी जे सांगितले आहे. त्याला लक्ष्मणरावांचे वर्णन चपखल बसते. शिवाय उपसंहाराचाही त्याला पाठिंबा आहेच.

असे हे शास्त्रीबोवांचे म्हणजे मराठी भाषेच्या शिवाजीचे चरित्र. □

# मार्क्सवाद ते वारकरी संप्रदाय

**—अनंतराव भालेराव** मुलाखत — भालचंद्र जोशी

अलीकडे औरंगाबादेत येथील ज्येष्ठ पत्रकार श्री. अनंतराव भालेराव यांच्या 'पेटलेले दिवस' आणि 'आलो याचि कारणासी' या दोन पुस्तकांचं प्रकाशन झालं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते हा पुस्तक प्रकाशनाचा (शास्त्रीबुवांच्या शब्दांत सांगायचं तर पुस्तक–विमोचनाचा) कार्यक्रम झाला. त्यांच्या हस्ते अनंतरावांचा गौरव करण्यात आला. याच वेळी तर्कतीर्थांना ८४ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. पुस्तक–प्रकाशनाला जोडूनच अनंतरावांची प्रकट मुलाखतही घेण्यात आली. तर्कतीर्थांचं गंभीर परंतु विचारसौंदर्यानं नटलेलं असं भाषण झालं. अनंतरावांची मुलाखत आणि भाषण हे त्यांच्या स्वाभाविक विनयानं आणि मार्मिक विनोदानं खुललं होतं. या कार्यक्रमाच्या निमित्तानं अनंतरावांच्या, हैद्राबाद मुक्ती संग्रामातील अनेक सहकाऱ्यांचं आणि त्यांच्या चाहत्यांचं एक स्नेहसंमेलनच झालं. अनंतरावांनी मुलाखतीत आणि भाषणात, स्वातंत्र्य–संग्रामातील त्या 'पेटलेल्या' दिवसांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यावेळी अनेकांची मनं गलबलून आली आणि डोळे पाणावले. श्री. गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, भुजंगराव कुलकर्णी, आशाताई वाघमारे, विनायकराव चारठाणकर असे मराठवाड्यातील बुजुर्ग या स्नेहसंमेलनात रंगून गेले होते. मनाला आणि बुद्धीला प्रसन्न करून टाकणारा असा हा सोहळा.

या सोहळ्याच्या निमित्तानं या माणसानं किती मनं संस्कारित केली आहेत आणि किती सद्भावना समाजात निर्माण केली आहे त्याचा सुखद प्रत्यय आला. केवळ त्यागानं हे शक्य होत असेल असं वाटत नाही. केवळ विद्वत्तेच्या बळावर तर एवढी अपुलकी, एवढा जिव्हाळा निर्माण करणं अशक्यच आहे. अनंतरावांच्या त्यागाला, अभ्यासाला, विनयाचं, मार्दवाचं, अकृत्रिम स्नेहाचं एक आश्वासक अस्तर आहे. माझ्यासारख्या अलीकडेच त्यांच्याशी दुरून परिचित झालेल्या पोरसवदा तरुणापासून त्यांच्या निकटच्या सहवासात झालेल्या अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांपर्यंत सर्वांना त्यांच्या या गोड स्वभावाचं मोहक प्रत्यंतर आलं आहे. त्याचंच प्रतिबिंब या कार्यक्रमात ठसठशीतपणे पडलेलं दिसलं. सर्वजण एका आपुलकीच्या, कौटुंबिक भावनेतून एकत्र आले होते. त्यामुळे सर्वांची हृदयं हेलावून टाकणारा हा कार्यक्रम ठरला. अनंतरावांनासुद्धा या स्नेहवर्षावानं आनंदचकित आणि भावविवश करून टाकलं यातच काय ते सर्व आलं ! हा क्षण साधूनच त्यांच्याशी थोडी बातचीत केली त्याचा हा गोषवारा.

**प्रश्न :** लोकेच्छेविरुद्ध उभं राहण्याचं धाडस लोकप्रतिनिधी तर दाखवत नाहीतच; परंतु पत्रकारही त्याबाबत कमी पडतात असं वाटतं. तुम्हाला यासंबंधी काय वाटतं? तुमच्यावर तसे प्रसंग कधी आले का ?

**भालेराव :** माझ्यावर पुष्कळ प्रसंग आले. सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांवर तसे प्रसंग येतातच, पत्रकारांवर तर बऱ्याच वेळा अशी भूमिका घेण्याची पाळी येते. एखादा भावनात्मक प्रसंग आला किंवा तत्त्वाचा प्रश्न आला की, लोकांना काय वाटतं यापेक्षा आपल्या अंतरात्म्याला जे पटेल ते मांडणं आवश्यक असतं. उदाहरणार्थ धर्मभावना ही मोठी प्रबळ भावना असते; परंतु ती काही वेळा लोकशाहीला मारक ठरू शकते. अशा वेळी आपल्याला धर्मभावनेच्या विरोधी, लोकेच्छेच्या विरोधी उभं राहावं लागतं. मराठवाडा विकास आंदोलनाच्या वेळी मला असा अनुभव आला. त्या वेळी पश्चिम महाराष्ट्रातील, विदर्भातील आमच्या अनेक सहकाऱ्यांनीच माझ्यावर टीका केली, 'तुम्ही प्रादेशिकतावाद जोपासता आहात' असा आरोप केला. माझं असं म्हणणं होतं की, ती प्रादेशिक भूमिका नव्हती, ती मागासलेल्या विभागाच्या आर्थिक विकासाची भूमिका होती. ही भूमिका मी कठोरपणे निभावली. त्या वेळी इतर ठिकाणच्या वर्तमानपत्रांनी आम्हाला खूप झोडपलं! पुष्कळदा आम्हाला स्थानिक लोकांविरुद्धही मतप्रदर्शन करावं लागलं. गोदावरी धरणाचा प्रश्न आहे त्या वेळी नगर जिल्ह्याच्या विरोधी भूमिका घ्यावी लागली. पहिला साखर कारखाना

नांदेडला निघालो त्या वेळी औरंगाबादकरांच्या मनाविरुद्ध भूमिका घ्यावी लागली. अर्थात हे छोटे छोटे प्रसंग आहेत; परंतु काही भावनात्मक प्रसंगी मोठा लोकक्षोभ पत्करावा लागतो. तुमची जर ध्येयधोरणं स्पष्ट असतील, वैचारिक गोंधळ नसेल आणि तुमची ध्येयनिष्ठा कणखर असेल तरच तुम्ही खंबीरपणे उभे राहू शकता. नामांतराच्या वेळी असाच अनुभव आला—

**प्रश्न :** नामांतराचा प्रश्न निघालाच आहे तर विचारतो. तो काळ तुमच्या पत्रकारितेच्या जीवनातील मोठा कसोटीचा काळ म्हणावा लागेल. आता त्याबाबत तुम्हाला काय वाटतं ?

**भालेराव :** दलितांच्या सर्व विकासाच्या आणि समतेच्या प्रश्नांबाबत मी नेहमीच त्यांच्या बाजूनं उभा राहत आलो आहे. अजूनही दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्यांचा प्रश्न असो, आर्थिक उन्नतीचे इतर प्रश्न असोत, त्याबाबत मी कधीही तडजोड केली नाही आणि करणारही नाही. पण हा प्रश्न भावनात्मक आहे. अजूनही बहुसंख्य लोक नामांतराला तयार होतील असं वाटत नाही, आपण हा खेळ करता कामा नये. त्यावेळी नामांतराबाबत मी जी भूमिका घेतली होती ती बरोबर होती असं अजूनही वाटतं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक म्हणून जर आपण नामांतर करणार असू तर ती गोष्ट लादता कामा नये. समाज सुधारणेसाठी एखादा कायदा सक्तीनं लागू करतो तशी ही बाब नाही. एकच काय, दहा विद्यापीठांना जरी बाबासाहेबांचं नाव दिलं तरी त्यामुळे ते मोठे होत नाहीत किंवा दलितांचे प्रश्नही त्यानं सुटत नाहीत. परंतु समाजात दुफळी पाडून, लोकांना दुखवून नामांतर करू नये. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन याबाबत निर्णय घ्यावा असं मी सुचवलं होतं. तंत्रज्ञानाचं एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करून त्याला डॉ. आंबेडकरांचं नाव द्यायचा प्रस्ताव मध्यंतरी राज्यशासनानं मांडला होता. हे विद्यापीठ मराठवाड्यात स्थापन करावं, त्याचं स्वागतच केलं जाईल.

अर्थात नामांतराबाबत काही भूमिका असणं ही एक बाब आहे आणि दलितांवर अत्याचार करणं, त्यांची घरंदारं जाळणं ही दुसरी गोष्ट आहे. अशा अत्याचारांचा मी नेहमीच निषेध केला आहे. दै. मराठवाड्यातील लिखाणामुळे अत्याचारांना फूस मिळाली असा आरोप माझ्यावर करण्यात आला होता. माझं असं म्हणणं होतं आणि आहे की, तुम्ही काही पत्रकारांची समिती नेमा किंवा प्रेस कौन्सिलकडे ही बाब न्या. त्यात जर मी दोषी आढळलो तर मी आपण होऊन शिक्षा भोगीन. जाणुनबुजून दलितांवरील अत्याचारांना मी चिथावणी देणं तर शक्यच नाही परंतु आपण प्रवाहात असतो, त्यामुळे तटस्थपणे मूल्यमापन करू शकत नाही, म्हणून एखादा लवाद नेमायची सूचना मी केली होती.

या प्रकरणी बराच मनस्ताप सहन करावा लागला परंतु मी काही ते मनात ठेवलं नाही. सर्व आपलीच माणसं आहेत.

**प्रश्न :** आपली एखाद्या प्रश्नासंबंधीची पूर्वीची भूमिका आता बदलावीशी वाटली का ?

**भालेराव :** असं होऊ शकतं, राष्ट्रीयीकरणाचंच उदाहरण घ्या. मी समाजवादी असल्यामुळे पूर्वी राष्ट्रीयीकरणाबाबत फार आग्रही आणि उत्साही होतो; पण आता मी सरसकट राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कर्ता राहिलेलो नाही. भारतीय इतिहासाबाबतही हेच म्हणता येईल. पूर्वी मी भारतीय इतिहासाकडे आत्मनिषेधक दृष्टीतून पहात होतो. मार्क्सवादी भूमिकेतून पाहात होतो. पण आता मला ती भूमिका अजिबात पटत नाही. आपल्या इतिहासातही अभिमान वाटावा अशी बरीच स्थळं आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी भूमिकेतून इतिहासाची पुनर्मांडणी करणं ही आवश्यक गोष्ट आहे असं माझं मत झालं आहे. साधी गोष्ट अशी आहे की, बाकीच्या साऱ्या संस्कृती नष्ट झाल्या पण भारतीय संस्कृती टिकून राहिली. ती काही विनाकारण टिकलेली नाही. तिच्यात काही ताकद आहे. ती ताकद शोधली पाहिजे. कोसांबींनी म्हटले आहे की, शस्त्र हाती न घेता किंवा जुलुम जबरदस्ती न करता भारतीय संस्कृती बाहेरील राष्ट्रांमध्ये वाढली, तिचा मोठा प्रभाव होता. वाङमय, कला, आयुर्वेद, व्यापार इत्यादी अनेक गोष्टींमध्ये आपल्या संस्कृतीचा प्रभाव होता. पण हे आम्ही कधी पाहिलंच नाही. मानवी संस्कृतीच्या सर्वोच्च स्थितीच्या सर्व खुणा आपल्या संस्कृतीत आढळतात.

पण याचा अर्थ आपल्या संस्कृतीत सर्वच काही होतं अशी दुसरी टोकाची भूमिकाही घेणं बरोबर नाही. सगळंच काही वेदात होतं असं म्हणणं ठीक नाही. तसं असेल तर मग आपण गुलाम कसे झालो ? तेव्हा समतोल दृष्टिकोन असावा. आपल्यालाही गुलामीची अवस्था आली हे लक्षात घेतलं पाहिजे. परंतु तरीही आपल्या इतिहासातही खूप काही चांगलं आहे ते लोकांपुढे ठेवले पाहिजे. त्यामुळे समाजाला प्रेरणा मिळते आणि समाज पुढे जातो. उगीच आपले आपण सर्व जण अगदी कर्दमात जन्माला आलो असं म्हणण्यात काय अर्थ आहे ? तेव्हा त्या अर्थानं आज मी पूर्ण बदललोय. तसा मी आता मार्क्सवादी नाही असं कोणी म्हणाले तर मी ते मान्य करीन.

**प्रश्न :** सध्याचे पत्रकार प्रत्यक्ष चळवळींमध्ये उतरताना दिसत नाहीत.

**भालेराव :** जे चळवळीमधून पत्रकारितेत आले आहेत ते नंतरही चळवळीत भाग घेताना दिसतात. मी स्वतः संयुक्त महाराष्ट्र, गोवामुक्ती, महागाई विरोधी आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलन, आणीबाणी अशा प्रत्येक महत्त्वाच्या चळवळीत प्रत्यक्ष भाग घेत आलो आहे. मला वाटतं पत्रकारांनी त्यापासून दूर राहू नये. तुम्ही पगारवाढीसाठी आंदोलन करता की नाही, मग नागरी स्वातंत्र्य आणि इतर प्रश्नांच्या वेळीही तुम्ही आंदोलन केलं पाहिजे. तुमची उक्ती आणि कृती यात एक वाक्यता नसेल तर लोकांनी तुमचं का ऐकावं ? अर्थात प्रत्यक्ष राजकारणात भाग नाही घेतला तरी व्यापक जनआंदोलनांपासून आपण उदासीन, बाजूला राहून चालणार नाही. आणि केवळ आंदोलनाचीच गोष्ट नाही, सर्व प्रकारच्या विधायक चळवळी उदाहरणार्थ वृक्षारोपण आहे किंवा तत्सम इतर उपक्रमांमध्येही पत्रकारांनी प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे या मताचा मी आहे.

**प्रश्न :** सध्या लहान वर्तमानपत्रांपुढील सर्वात मोठी समस्या कोणती ?

**भालेराव :** आधुनिक तंत्रज्ञानाची सक्ती लहान वर्तमानपत्रांवर, स्पर्धेमुळे होत आहे. वास्तविक दै. मराठवाड्यासारखं वृत्तपत्र घेतलं तर आमचा खप किती, आमचा जीव किती;

पण इतर वृत्तपत्रांच्या स्पर्धेमुळे आम्हाला फोटो–कॉम्पोझिंग आणि इतर अद्ययावत पण अतिशय महागडं तंत्रज्ञान सवतीनं वापरावंच लागतं. छोटया वर्तमानपत्रांना परवडेल असं तंत्रज्ञान उपलब्ध झाले पाहिजे किंवा संस्थात्मक, विश्वस्त–मंडळांच्या मालकीच्या वर्तमानपत्रांना शासनानं विशेष सहाय्य दिलं पाहिजे. वृत्तपत्रीय कागदाबाबत तीच अवस्था आहे. टाइम्स ऑफ इंडियासारखं मोठं वृत्तपत्र ज्याप्रकारे, ज्या भावानं वृत्तपत्रीय कागद घेतं तीच पद्धत, तेच निकष, तीच किंमत एखाद्या छोटया वर्तमानपत्रालाही लागू करण्यात येते. याबाबतीतही शासनानं लक्ष दिलं पाहिजे.

वृत्तपत्रसृष्टीला सध्या जाणवणारा आणखी एक मोठा धोका म्हणजे इतर व्यवसायांमध्ये मिळवलेला काळा पैसा वापरून वृत्तपत्रं उभी केली जात आहेत. अशा वर्तमानपत्रांकडे प्रचंड पैसा, साधनसामुग्री दिसते. त्यांच्या स्पर्धेत केवळ वर्तमानपत्र चालवणाऱ्या संस्था टिकू शकत नाही. वृत्तपत्रांच्या धंद्यात फारसा नफा मिळतच नाही, पण ही मंडळी इतरत्र काळा पैसा मिळवतात आणि तो वृत्तपत्रांच्या धंद्यात खपवतात.

**प्रश्न** : तुमचे वडील वारकरी संप्रदायाचे होते, त्याचा तुमच्या मनावर कोणता परिणाम झाला ?

**भालेराव** : मी अध्यात्मिक वगैरे नाही– पण वारकरी संप्रदायाचा माझ्यावर वेगळ्या अर्थानं मोठा सखोल संस्कार आहे. तो म्हणजे इतरांच्या सुखदुःखाशी आपण समरस झालं पाहिजे, आपलं जीवन व्यापक करणं, आपली सुखदुःखं इतरांच्या सुखदुःखांशी जोडणं हा तो संस्कार आहे. नाही तर मला या सगळ्या चळवळीत वगैरे पडायचं कारणच नव्हतं. कुठे तरी नोकरी करत बसलो असतो; पण वारकरी संप्रदायाच्या या संस्काराची मोठी प्रेरणा होती.

वारकरी संप्रदायाचं आणखी एक मोठेपण आहे. या संप्रदायानं जुनं कर्मकांड सर्व टाकून दिलं आणि अध्यात्माचं क्षेत्र अधिक निर्दोष, व्यापक केलं. त्यांनी खऱ्या अर्थानं धर्म सर्वसामान्यांपर्यंत नेला, एक प्रकारचं पुरोगामित्व उपासनेत आणलं. ही फार मोठी गोष्ट आहे. वारकरी संप्रदायानं विष्णुसहस्त्रनाम, शिवलिलामृत इत्यादी सामान्य दर्जाच्या वाङ्मयाऐवजी ज्ञानेश्वरी, गाथा इत्यादी आशयसंपन्न आणि महान वाङमयीन गुण असलेल्या ग्रंथांची प्रतिष्ठापना केली ही गोष्टही महत्त्वाची आहे. त्यामुळे अतिशय उत्तम भाषेचे संस्कार माणसावर होत आले आहेत.

**प्रश्न** : पत्रकारितेच्या क्षेत्रात तुमच्यावर कोणाचा प्रभाव पडला ?

**भालेराव** : अनेक व्यक्तींचा प्रभाव पडला. आचार्य अत्र्यांची भाषा किती सोपी सुबोध होती ! प्रभाकर पाध्यांच्या भाषेत किती लालित्य होतं. महाजनी तत्त्वज्ञानात्मक लिखाण फार सुरेख करायचे, त्यांचा उपरोधही उत्तम दर्जाचा होता. अप्पासाहेब खाडिलकरांचाही उपरोध असाच दर्जेदार होता. पां.वा.गाडगीळांच्या लिखाणाला शैली नसेल, पण त्यांचं आर्थिक विषयावरील लिखाण फार सुगम होतं. पत्रकारानं आपलं मन नेहमी स्वागतशील ठेवलं पाहिजे तरच आपला विकास होत जातो.

□

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# दातांची परी

मागे एक फ्रेंच जोडपं आमच्याकडे रहायला आलं होतं. तेव्हा आमच्या मुलीचा दात पडला. दात पडल्यावर तिनी तो जरा सर्वांना दाखवला आणि मग निरीक्षण वगैरे करून झाल्यावर कौलावर–घरावर टाकून दिला. त्या फ्रेंच जोडप्याला नवल वाटलं. त्या रात्री त्यांनी मुलीच्या उशीखाली स्केचपेन्सचा एक सेट ठेवला आणि दुसऱ्या दिवशी उठल्यावर तिला सांगितलं, काल तुझा दात पडला म्हणून आज तुला काय बक्षीस मिळालंय बघ.

ही दात पडल्यावर बक्षीस मिळतं ही कल्पना नंतर सविस्तर कळली. अमेरिकेत असणारा भाऊ सहकुटुंब, सहपरिवार इथे आला तेव्हा. तेव्हा त्याच्या मुलीचा दात पडला आणि ती सर्वांना दाखवत असताना आमच्या मुलींनी तो घेतला आणि घरावर टाकून दिला. त्याबरोबर भावाच्या मुलीनी जी हमसून हमसून रडायला सुरुवात केली ती थांबेचना. ती काय म्हणत होती तेही कळेना. मग भावानी वहिनीनी सांगितलं की, तिकडे दात पडला की, मुलांना सांगतात की, तो रात्री झोपताना उशीखाली ठेवायचा. मग रात्री दातांची परी येते. ती तो दात घेऊन जाते आणि त्याच्या जागी एक बक्षीस ठेवून जाते. मुलं रात्री झोपताना दात उशीखाली ठेवतात आणि मग सकाळी उत्सुकतेनी बघतात.

तिचं रडता रडता म्हणणं असं होतं की, आता रात्री दातांची परी इथे येईल तेव्हा तिला दात सापडणार नाही मग ती बक्षीसपण देणार नाही आणि मग नवा दातपण येणार नाही. शेवटी तिचं रडणं थांबावं म्हणून दात शोधला. योगायोगानं तो सापडलाही आणि मग पुढे सगळं ठीक झालं. तरी ती एकदा म्हणालीच की, इथे लोक दात फेकून देतात, मी इथे पुन्हा कधी येणार नाही.

दातांच्या परीची ही किमया ऐकून इथली सगळी त्या वयाची भावंडं खूषच झाली. मग एक दोघांनी आपले हलू लागलेले दात प्रयत्नपूर्वक हलवून पाडले आणि लगेच वहिनीला तत्परतेनी दाखवले तिनी ते उशीखाली ठेवायला सांगितले. बक्षिसं मिळाली.

लहानपणी मुलांच्या अशा ज्या काही गोड समजुती करून दिल्या जातात, त्यात गंमत नक्कीच असते. याबद्दलच एक घटना भाऊ सांगत होता. नाताळमध्ये तिकडे दुकानांमध्ये नाताळबाबा उभा करतात. एखादा माणूसच नाताळबाबाचे कपडे घालून उभा असतो. तो मुलांना खाऊ देतो. एका दुकानात एक छोटी मुलगी आली. नाताळबाबानी तिला खाऊ दिला. तिचा हात हातात घेतला. तो काही बोललापण; पण ते पाहून ती मुलगी रडू लागली. ती आईला म्हणाली, 'हा नाताळबाबा नाही. ही कोणीतरी बाई आहे. तिचा आवाज बघ.' ह्या आईनी ह्या घटनेमुळे त्या दुकानदारावर खटला भरला. तिचं

म्हणणं असं की, मी माझ्या मुलीला नाताळ-बाबाबद्दल सांगितलं. तिच्या मनात काही कल्पना निर्माण केल्या आणि ह्या दुकान-दारानी त्या कल्पनांना तडा पाडला. मुलीची फसवणूक झाली.

मुलीच्या भावनांबद्दल आईचा जागरूक-पणा पाहून बरं वाटत नाही का ?

एकीकडे एवढ्या हळवेपणानी मुलांच्या भावना जपण्याचा प्रयत्न आणि दुसरीकडे याचं दुष्ट टोकही अमेरिकेतल्या अनुभवात ऐकायला मिळालं.

ही मंडळी सांगत होती. त्यांच्या आठ वर्षाच्या मुलीच्या मैत्रिणी घरी येतात; पण आत या म्हटलं तर नको म्हणतात. त्या सांगतात, आमच्या मम्मींनी सांगितलं कोणीही घरात बोलावलं तरी जायचं नाही. त्या दारात उभ्या राहतात.

आणि याचं कारण लहान मुलांना त्रास देणं, त्यांचा छळ करणं, त्यांचा फायदा घेणं, त्यांच्यावर अत्याचार करणं ही विकृती वाढते आहे. अनेक मुलं याला बळी जातायत. जणू काही हा विकृत समाज असल्यासारखं लहान मुलांना भय निर्माण झालं आहे. त्यामुळे पालक ह्या सूचना देत आहेत.

हॅलोवीन नावाचा एक क्षण अमेरिकेत साजरा करतात. दाराशी लाल भोपळा ठेवा-यचा. त्याच्यात डोळे, नाक, तोंड कोरलेलं असतं आणि आतल्या पोकळीत दिवा लावलेला असतो. लहान लहान मुलं कसली कसली सोंगं घेऊन दाराशी येतात. त्यांना काहीतरी गंमत करून दाखवायची असते, नाहीतर खाऊ द्यायचा असतो. बहुतेक घरातून गोळ्या, चॉकलेटं आणून ठेवतात आणि मुलं आली की त्यांना देतात. मुलं सगळा खाऊ गोळा करून येतात.

अलिकडे ह्या प्रकारात असं आढळून आलं की, ही जी गोळ्या, चॉकलेटं मुलांना देतात त्यामध्ये टाचण्या, पिना, ब्लेडस्‌चे तुकडे घातलेले होते. त्यामुळे मुलांचा खाऊ स्क्रिनिंग करून मिळू लागला आहे. तपासून त्यात टाचण्या, ब्लेडस् नाहीत हे पाहूनच तो मुलांना दिला जातो.

मुलांचा छळ करणाऱ्यांचा अभ्यास करता असं आढळून आलं की, आई वडलांचे जव-ळचे मित्र, नातेवाईक, नेहमीचे परिचित यांच्यापासूनही धोका असतो. तेव्हा टेलि-व्हिजनवरून ह्या माणसांपासूनही सावध रहायला सांगितलं जात आहे. मुलांना स्पर्शाचा अर्थ समजावून सांगितला जातो आहे. कुणा मोठ्या माणसानी जवळ घेतलं तर जाऊ नका हेही सांगितलं जात आहे.

भाऊ सांगत होता लहान मूल दिसलं की, किती सहजपणे आपण त्याला हात लावतो, कुरवाळतो; पण ह्या सगळ्या प्रकारांमुळे कुणा मुलाच्या डोक्यावर हात ठेवायलाही धजावत नाही मन.

हे सगळं ऐकताना लहान मुलांना काय वाटत असेल ? कुणावरही विश्वास ठेवू नका. धोका आहे. हेच या मुलांना सांगायची वेळ यावी ना ? खाऊचं स्क्रिनिंग करून घ्यायचं, स्पर्शाचं स्क्रिनिंग करायला शिका-यचं, माणसांचं स्क्रिनिंग केल्याशिवाय विश्वास टाकायचा नाही. ह्या वातावरणात 'सांता-क्लॉज' आणि 'टूथ फेअरी' हीच शेवटी विश्रांतीस्थानं रहायची. त्यांचं स्क्रिनिंग तरी करायची वेळ येऊ नये असं पालकांना वाटलं तर चुकीचं नाही म्हणता येणार.

पाहुणेमंडळी परत गेल्यावर आमच्या मुलीचा दात पडला. यावेळी तो कौलावर फेकून न देता तिनं माझ्याकडे आणून दिला आणि म्हणाली 'तू बक्षिस ठेवशील ना रात्री ?'

परीकथांचं स्क्रिनिंग करूनही त्यातल्या सुखावह गोष्टींना निसटू न देणं ही कला मुलांकडे असते की काय ? ती कला आप-ल्यालाही शिकायला हवी. ह्या नव्या अमे-रिकन अनुभवांच्या ठेचेतून शहाणपण शिकून जागरूकपणे आपल्यातलं चांगुलपण जपायला हवं म्हणजे मग आज नाहीतरी कळू लागेल तेव्हा अमेरिकेतल्या भाचीला वाटू शकेल—इथली माणसं दात फेकून देत असली तरी मूल्यं फेकून देत नाहीत. तिला हे समजायला अजून दहा पंधरा वर्ष आहेत. आपल्याला मात्र आतापासूनच हे समजून घ्यायला लागलं पाहिजे.

## राजधानी दिल्ली

पृष्ठ ५ वरून

ताबडतोब ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिटयूट मध्ये नेण्यात आले ... उतारूंनी ती बस पोलिस स्टेशनमध्ये नेण्यास ड्रायव्हरला भाग पाडले ... कंडक्टरला निलंबित करण्यात आले...

नंतर मला समजले की ती बस स्टॉप-पेक्षा बरीच पुढे नेऊन का उभी केली, अशी विचारणा केल्यावरून त्या कंडक्टरने चिडून त्याच्या डोक्यावर प्रहार केला. त्या बिचा-ऱ्याला कल्पनाही नसेल की एखाद्या अन्याय्य गोष्टीबद्दल आपण विचारणा केली असता त्याचा एवढा जबरदस्त परिणाम आपल्याला भोगावा लागेल. सकाळपासून दुपारपर्यंत कॉलेजात अध्यापनाचे काम करून नंतर दुपारी 'मराठी' शिकण्यासाठी हा बंगाली विद्यार्थी आमच्या युनिव्हर्सिटीत येत असतो. त्यानंतर दमून भागून घरी जाण्यासाठी बस-स्टॉपवर बराच वेळ ताटकळत उभे राहिल्या-वर, जर ती बस स्टॉपवर व्यवस्थित उभी न करता बरीच पुढे नेऊन उभी केली, तर त्या आमच्या विद्यार्थ्याला चीड येणे अगदी स्वाभाविक होते. कुणाही सामान्य माणसाला या अशा प्रकाराची खचितच चीड येईल. तथापि बस ही स्टॉपच्या आधीच किंवा बरीच पुढे नेऊन उभी करण्यात बसचालकांना काय गंमत वाटते कुणास ठाऊक ?

महाराष्ट्रात हा प्रकार बराच कमी आढ-ळतो. तिथे मर्यादेपेक्षा जास्त लोकांना बसमध्ये घेण्याची परवानगी नसल्यामुळे कधी कधी कंडक्टर बस बरीच पुढे नेऊन फक्त उतारूंना उतरू देतो. क्वचित एखादा कंडक्टर बस-मध्ये जागा असूनही तसे करतो. त्यात त्याला कसला तरी पोरकट आनंद मिळत असतो. असे प्रकार महाराष्ट्रातही मी पाहिले आहेत; परंतु दिल्लीची बससेवा मात्र दिल्लीतील आबालवृद्धांना दररोज पळण्याचा सराव देत असते.

### डीटीसीचा धसका

महाराष्ट्रात बस स्टॉपवर उभी राहिली की लोक त्यात चढतात. पुरेसे लोक चढले आणि आतील लोकसंख्येची मर्यादा संपली की मग कंडक्टर बेल वाजवतो आणि बस

सुरू होते. दिल्लीत मात्र बस आली की ती पळतच गाठावी लागते. रांगेने जाण्याची पद्धत इथे जवळजवळ नाहीच. त्यामुळे दिल्लीचे बसप्रवासी ऑलिंपिकच्या मॅरेथॉन-मध्ये नक्कीच नाव कमावतील असे मला वाटते. बसमध्ये चढत असतानाही इथे फार सावध असावे लागते, कारण इथे कंडक्टर बेल वाजवून बस सुरू करण्याची सूचना बसचालकाला कधीच देत नाही. चालकाच्या मनात आले की आता बस सुरू करावी, की ती तो करतो. साधारणपणे पुढच्या दाराने उतरणारे उतारू उतरले की तो बस सुरू करतो. चढणाऱ्यांनी कंडक्टर किंवा चालक कुणालाही दोष न देता संपूर्ण स्वतःच्या जबाबदारीवर चढायचे असते. क्वचित कुणी बसमध्ये चढताना अडखळले किंवा 'रोको भाई, रोकोऽऽ' अशी आर्त विनवणी केली तरच कंडक्टर शिटी वाजवून बस थांबवण्याची चालकाला सूचना करतो. नाहीतर बसमध्ये किती लोक चढतात, कसे चढतात याकडे कंडक्टरचे अजिबात लक्ष नसते. इथे बसमध्ये कितीही लोक चढू शकतात. म्हणजे बसमधील लोकसंख्येला इथे मर्यादा नसते. आत शिरायला अजिबात जागा नाही अशी परिस्थिती असली तरी लोक फुटबोर्डावर लोंबकळत प्रवास करतात. हळूहळू आपला आत शिरकाव होईलच अशी उदंड उमेद त्यांच्या मनात असते. बसमध्ये उभे असलेल्या लोकांच्या दोन रांगांमधून वाट काढीत काढीत पुढे जाणे हे तर गिर्यारोहणापेक्षाही कठीण असते. त्यासाठी बसमधील गर्दी आणि आपला स्टॉप येण्याची वेळ यांचा भागाकार मनाशी करून त्याप्रमाणे पुढे जायला सुरुवात करणे, याचे जागृत भान मनाला सतत ठेवावे लागते. कारण दोन रांगांतून उभे असलेल्या लोकांच्यामधील न उरलेल्या पोकळीतून आपला देह (त्याच्या स्थूल–सूक्ष्म आकारमानाप्रमाणे) ढकलीत ती पोकळी निर्माण करणे, 'एक्स्क्यूज मी, भाईसाब जरा रास्ता छोडिये, आपने (आपको) उतरना है ?' किंवा तोवर स्टॉप आलाच तर जोरात 'हटियेऽऽ' अशी आरोळी ठोकत, ढकलत वाट काढणे आणि आपण बसची शेवटची पायरी उतरत असतानाच (उतरणाऱ्यांपैकी आपण बऱ्याचदा शेवटी असलो की,) बस सुरू होण्याची दाट शक्यता असल्याने, एखाद्या संन्याशाने संसाराचा एकदम त्याग करावा तसे चपळाईने आपले बसशी असलेले नाते तोडून 'हुश्श' करणे, याला फार मोठ्या सरावाची आवश्यकता असते. असले 'दिव्य ट्रेनिंग' फक्त दिल्लीच्या बसमधून रोज प्रवास करूनच मिळत असते.

डी. टी. सी. च्या बसेसमधून प्रवास करून करून मीही आताशा फार धाडसी बनले आहे. चक्क कॉलेजातल्या पोरापोरींप्रमाणे एकदा मीही, हळूहळू आत शिरायला जागा होईलच अशी उदंड उमेद मनात बाळगून, फुटबोर्डावर उभी राहून पुढचा स्टॉप येईपर्यंत प्रवास केला. फारच 'थ्रिलिंग' अनुभव होता तो! उन्हाळ्यात इथल्या बसमधून प्रवास करणे म्हणजे त्याहूनही थ्रिलिंग (की 'किलिंग') अनुभव असतो. आधीच तो दिल्लीचा जीवघेणा उन्हाळा. त्यातून बसेस इतक्या ठासून भरलेल्या की हवेलाही आत शिरायची टाप उरत नाही. अशा परिस्थितीत प्रवास करताना जीव गुदमरून जातो. ऑक्सिजन हा दृश्य नसल्यामुळे तो बसमध्ये पुरेसा आहे की नाही याची चिंता वाटू लागते आणि शेवटी आपण जिवंत, सुखरूप बाहेर कसे पडलो याचेच आश्चर्य वाटत राहते. उन्हाळ्यात या बसेसमध्ये रेल्वेतल्याप्रमाणे छोटचा छोटचा पंख्यांची फारच आवश्यकता असते हे दिल्ली परिवहन निगम संस्थेला मोठ्याने ओरडून सांगावे असे मला दर उन्हाळ्यात वाटते. आता पंधरा–वीस मिनिटे आणखी थांबावे लागले तरी हरकत नाही; परंतु असल्या ओसंडत्या बसमध्ये चढायचेच नाही, असे मी ठरवून टाकले आहे. मग त्या पंधरा–वीस मिनिटांच्या कालावधीत मी 'आपलीही एखादी मारुती कार आहे आणि आपण या बसच्या भानगडीत न पडता हळुवारपणाने त्या कारमधून घरी परततो आहोत अशी दिवास्वप्नं की 'दिव्यस्वप्नं' पाहू लागते. इतक्यात एखादी कमी गर्दीची बस येते आणि मी त्या स्वप्नातून जागी होऊन त्या वास्तव बसला सामोरी जाते.

आतातरी निर्धोक प्रवास होईल अशी अपेक्षा करावी तर तो बसचालक नेमका वारा प्यायलेल्या वासरासारखा ती बस हुंदडवत, पळवत असतो. मग जीव मुठीत धरून मी माझा स्टॉप येण्याची डोळ्यात प्राण आणून वाट पाहू लागते. मनात रामरक्षा आठवायला असली बस फार मदत करते. दिल्लीतल्या चौकातील मोठमोठ्या आयलंडजवळून वळताना तर त्या बसचालकाला आपण एखाद्या सर्कशीत बस न कलंडवता वेगाने वळवण्याचा खेळच दाखवीत आहोत, असे वाटत असावे. अशावेळी बसचा गुरुत्वमध्य ढळू नये म्हणून मी त्याच्याविरुद्ध दिशेस माझे अंग अधिकाधिक कलते करण्याचा 'किरकोळ' प्रयत्न करीत राहते. अर्थात माझ्या सामान्य देहयष्टीच्या अशा प्रयत्नामुळे नसली तरी बसच्या भरपूर लांबीमुळे मात्र ती कलंडत नाही आणि मी सुटकेचा निश्वास टाकते. मग आमच्या घराजवळील आयलंड येण्यापूर्वीच मी (दैवाला अधिक संधी न देता) एक स्टॉप अलिकडेच उतरून, त्या बसमधून माझी सुटका करून घेते. नाहीतरी आपल्याला मार्केटच्या स्टॉपवर उतरल्यामुळे काहीतरी खरेदी उरकण्याची आठवण होईल असा मी मनाला दिलासा देत असले तरी माझ्या सुप्त मनाला पक्के ठाऊक असते की मी त्या बसला घाबरूनच आधी उतरलेली आहे.

खरोखर दिल्लीत डी. टी. सी. च्या बसेसना घाबरून राहण्यासारखीच परिस्थिती आहे. दिल्लीत दरवर्षी डी. टी. सी. च्या बसची धडक लागून मृत्यू पावलेल्यांची संख्या शेकडोंनी असते. किंबहुना दिल्लीतील ९० टक्के अपघात या बसेसमुळेच होतात. अत्यंत बेजबाबदारपणे बस चालवून स्कूटरवरून प्रवास करणाऱ्यांना, सायकलचालकांना किंवा पादचाऱ्यांना यमसदनाला पाठविण्यात या बसचालकांचा मोठा वाटा आहे. फक्त आत बसलेले उतारू तेवढे अशा अपघातातून वाचत असतात. त्या दृष्टीने या बसमध्ये बसून प्रवास करणारे तसे सुखरूप असतात, ही मात्र या बसेसची जमेची बाजू.

डी. टी. सी. बसचा कंडक्टर म्हणजे तर एखाद्या संस्थानिकाच्याच ऐटीत असतो. तो नेहमी बसच्या मागच्या सीटवर बसलेला असतो. गणवेश नसल्यामुळे एरवी तो बसप्रवासी आहे की कंडक्टर हे ओळखणे कठीण जाते. लोक किती, कसे आत शिरतात याकडे तो अत्यंत अलिप्ततेने पहात असतो. त्याच्या धावत, धडपडत बस पकडण्याच्या कृतीचे

त्याला कसलेही सोयर वा सुतक वाटत नसते. स्थितप्रज्ञाची सर्व लक्षणे त्याच्या चेहऱ्यावर झळकत असतात. जो तिकीट मागेल त्याला तो ते शांत-संयमपणाने देत असतो. जो मागणार नाही त्याला तो एका अक्षरानेही काही विचारणार नाही. तिकीट न काढता प्रवास करणारा जर टी. सी. च्या पकडीत सापडला तर त्याला सरळ ५ रु. दंडाची पावती फाडून मिळते, हे तो पूर्ण जाणून असतो. त्यामुळे तो अशा उतारूंकडे पहाण्याचेही कष्ट घेत नाही. या कंडक्टरच्या तिकीट देण्याच्या पद्धतीकडे पाहून तर एखाद्या मागासलेल्या गावात बससेवा नुकतीच सुरू व्हावी, तसे वाटते. याच्याकडे पंचिंग मशीन नसते. तो प्रत्येक तिकीट त्यावरील आकडे पाहून त्या त्या ठिकाणीं किंचित फाडून मग देतो. त्यानंतर शांतपणाने पिशवीतील सुटी नाणी शोधून उरलेले पैसे त्या उतारूला देतो. मग दुसरे तिकीट... ! आपल्यासमोर १०-१५ हात तिकीट मागण्यासाठी पैसे पुढे करून थांबलेले आहेत, याचा त्याच्या मनावर यत्किंचीतही ताण येत नाही. आपल्या जागेवर आरामशीरपणे बसून तो हे काम आपल्या संथगतीने करीत राहतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील कंडक्टर्सची खरोखर दया येते. ते बसमध्ये सतत उभे राहून, लोकांकडे स्वतः जाऊन तिकिटे देतात बसमध्ये उतारू नीट चढले, उतरले की नाही ते पाहून बस सुरू करतात आणि प्रवाशांची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे अशा दृष्टीने बसभर लक्ष ठेवतात.

## विविधता आणि धाडस ?

दिल्लीच्या बसमध्ये कंडक्टरच्या जवळ वरच्या बाजूला एक पाटी लिहिलेली असते– 'टिकट लिये बिना आगे जाना मना हैं' तेव्हा बसच्या दारापासून त्या पाटीजवळच्या ३'×३' चौकोनातच सर्व उतारूंनी भाऊगर्दी केलेली असते. पुढे भरपूर जागा रिकामी असली तरी त्या संस्थानी थाटात तिकिटे देणाऱ्या कंडक्टरकडून तिकीट घेतल्याशिवाय सहसा कुणीही पुढे जाऊ शकत नाही. त्यामुळे दाराजवळच ही गर्दी साठून राहते व पुढे अमाप जागा शिल्लक असूनही बाहेरचे लोक बसमध्ये चढू शकत नाहीत. ही सर्व परिस्थिती इतकी अडाणीपणाची, मागासलेली व कधी कधी अत्यंत चीड आणणारी असते की, अशा वेळी प्रत्यक्ष परमेश्वर जरी इथे अवतरला तरी या परिस्थितीत तो सुधारणा करू शकणार नाही असे वाटते. दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरातील बसव्यवस्था इतकी गचाळ असावी, याचे मोठे नवल वाटत राहते. याउलट मद्रासमधील बसेस अत्यंत शिस्तबद्ध आणि वरचेवर येणाऱ्या म्हणून त्यांची ख्याती आहे. आपल्या देशात जी अनेक गोष्टींमध्ये विविधता आहे तो याही बाबतीत असावी. सध्या या विविधतेतून एकता शोधण्याचे, त्यांचे संबंध (बादरायण असले तरी) एकमेकांशी जोडून त्यातील एकता (Integrity) दाखविण्याचे जे जोरदार प्रयत्न चालले आहेत, त्या या बसेसचा संबंध कुठे दाखवता येईल कुणास ठाऊक ! अलिकडेच इंडियन एक्स्प्रेसच्या 'मंडे डायरी'त एक गोष्ट माझ्या वाचनात आली. निरनिराळ्या देशात हिंडून तेथील रीतीरिवाज पाहण्यासाठी आलेल्या युरोपमधील एका फ्रीलान्स-रायटरने भारताबद्दल म्हटले की, 'Every step here is an adventure.' बहुधा दिल्लीतील डी. टी. सी. च्या बसमधून प्रवास केल्यानंतरच त्याचे हे मत बनले असावे.

डी. टी. सी. च्या बसेस कमी पडतात म्हणून काही खाजगी बसेससुद्धा 'Under D. T. C. operation' म्हणून या डी. टी. सी. ची सेवा करीत असतात. या बसेस खाजगी असल्यामुळे बहुतेक डी-लक्स पद्धतीच्या नि छान सजवलेल्या असतात. ड्रायव्हरजवळ ट्रान्झिस्टर वाजत असतो. मध्यावर शंकराची किंवा दुर्गेची प्रतिमा असते. तिला हार घातलेला असतो. त्या गाण्यांच्या तालात तोही बस मजेत चालवीत असतो. अशा बसमधून प्रवास करताना त्या बसचालकाचे बस चालविण्याकडे लक्ष किती आणि गाण्याकडे किती हे सांगता येत नाही. तो आपल्या धुंदीत, मस्तीत बस चालवीत असतो. गाण्यांच्या सुरांनी भरलेल्या मनःस्थितीत त्याला बस चालवताना अधिक प्रसन्न वाटत असेलही, परंतु प्रसंगी त्या सुरात हरवून अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. दुसरे म्हणजे ती बस कुठून कुठे जाणार असेल त्या ठिकाणांची नावे त्या बसच्या दर्शनी भागावरून महत्प्रयासाने शोधून काढावी लागतात. डी. टी. सी. बसच्या पाटीवर खडूने पुसट अक्षरात लिहिलेले नाव तर एखाद्याला दिव्यदृष्टी लाभल्याशिवाय वाचताच येणार नाही, परंतु या खाजगी बसेसच्या दर्शनी भागावर रंगीत चांदीच्या झिरमिळ्यांची आणि 'सत्‌गुरू तेरी ओट', 'जय सच्चिदानंद बाबा की', 'सरि (श्री) गुरू की जय', 'जय माता दी (की)' वगैरे अक्षरांची इतकी गर्दी असते की, त्या बसचा नंबर आणि ती जाण्याच्या ठिकाणाचे नाव शोधीपर्यंत ती बस आपल्यापुढून नाहिशीही झालेली असते. एखाद्या नवीन माणसाला तर ही बस 'सत् गुरू तेरी ओट' या ठिकाणीच जाणार असे वाटते. सरावाने आपण त्यातील गुरुभक्तीची वाक्ये पटापट वगळून ती जाण्याचे ठिकाण लिहिलेली अक्षरे नेमकी शोधू शकतो, परंतु यालाही ४-५ वर्षांचे ट्रेनिंग लागतेच. एवढ्या कालावधीत एखादी शिक्षणाची डिग्रीही वास्तविक मिळून जाते.

दिल्लीत डी. टी. सी. बसेसच्या अगदी विरुद्ध (अर्थात उत्कृष्ट) सेवा देणाऱ्याही काही बसेस आहेत. त्यांना चार्टर्ड बसेस म्हणतात. त्या कचेऱ्यात काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना, सेवकांना फार उपयुक्त असतात. या बसेस 'पॉइंट टू पॉइंट' सर्व्हिस करतात. म्हणजे डी. टी. सी. स्टॉपच्याच जवळपास यांचा ठरवलेला स्टॉप असतो. या बसेसच्या स्टॉपचा बोर्ड कुठेही नसतो. नेहमी त्या बसने प्रवास करणाऱ्यांना त्यांचे थांबण्याचे ठिकाण माहीत असते. या बसेस अतिशय सुंदर, लक्झरी असतात. त्यांना पल्लवी, पंकज, कारवाँ, स्नेह, ओंकार अशी सुंदर नावे दिलेली असतात. त्या नावावरून प्रवाशांना आपली बस ओळखता येते. या चार्टर्ड बसेसचे भाडे अर्थात जास्त असते; परंतु एकदा महिन्याचे भाडे भरले की, ऑफिसला अगदी आरामात बसून जाण्या-येण्याची निश्चिती असते. दिल्लीतील ठिकाणेही बऱ्याच अंतरांची असल्यामुळे ह्या बसेस फारच सोयीच्या वाटतात. शिवाय मुंबईच्या लोकल गाड्यांप्रमाणे त्या ठराविक वेळेला अगदी मिनिटांबरहुकूम सुटतात. त्यामुळे वेळेवर पोहोचण्याविषयीही चिंता नसते.

डी. टी. सी. ने ही काही लक्झरी बसेसची सोय १ रुपया भाड्यात केलेली असली तरी साध्या डी. टी. सी. बसपेक्षा यातून फारसा काही वेगळा अनुभव येत नाही. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी त्यातूनही कित्येकदा उभे राहूनच प्रवास करावा लागतो. साध्या बसचे भाडे मात्र इथे अतिशय माफक म्हणजे मैलभर अंतराच्या स्टॉपला ३० पैसे आणि सात-आठ मैल अंतराला ४० पैसे असते. दिल्लीत दोन चाकी स्कुटरवरून प्रवास करणे म्हणजे शिर तळहातावर ठेवून लढाईत उतरण्यासारखेच असते. आपण भले नियमानुसार स्कुटर चालवीत असलो तरी एखादी डी. टी. सी. ची किंवा तिच्या कार्यात वाटा उचलणारी खाजगी बस वेगात येऊन आपल्याला केव्हा धुडकावेल याचा नेम नसतो. त्यामुळे ह्या दोन चाकी किंवा चार चाकी वाहनाच्या भानगडीत न पडता मी हल्ली तीन चाकी स्कुटरवरच हवाला ठेवला आहे. 'दिल्ली परिवहन निगम' या गोंडस नावाला मी आताशा मुळीच बळी पडत नाही.

—ललिता मिरजकर

# । नवे राजहंस प्रकाशन । पूर्णत्वाचे प्रवासी ।

लेखक : प्रा. शरद कुलकर्णी

## निवडक अभिप्राय

श्री. कुलकर्णी यांसी
स. न. वि. वि.

तुम्हाला आठवत असेलच, तुमच्या श्रीकृष्णावरच्या पत्राबद्दल मी तुमच्याशी पुष्कळ वाद घातला होता. गेली काहीं वर्षे मी व्यक्तिपूजेचा आणि प्रतिमापूजनाचा प्रखर विरोधक आहे आणि ज्याला देवाचा अवतार किंवा प्रत्यक्ष देव असं अनेक लोक मानतात त्या श्रीकृष्णाबद्दल इतक्या श्रद्धेनं तुम्ही लिहिणं हेच मला वाद घालायला पुरेसं होतं. तुमच्या त्या पत्रात माझ्यासारख्या अमूर्त पूजकालाही पटणाऱ्याच नव्हे तर प्रगल्भही करणाऱ्या अनेक गोष्टी होत्या, आहेत; पण सगळ्या उगीचच अधेमध्ये लुबाडणाऱ्या श्रीकृष्णामुळे झाकोळून गेल्या आहेत, या भावनेनं मी खवळलो होतो. तुमच्याशी वाद घातला होता.
' वादे वादे जायते तत्त्वबोधः ' हे वादात मला जाणवलं. चांदण्यासारख्या शीतल व सूर्यप्रकाशासारख्या उजळून टाकणाऱ्या, सागरासारख्या अथांग व निर्झरासारख्या आरस्पानी दृढ पण सतत स्पंदन पावणाऱ्या आणि भोवतालच्या अनुभवातून सतत व्यापक होत जाणाऱ्या अशा एका वेगळ्याच जिवंत श्रद्धेचं दर्शन मला घडलं. मनोमन पटलं की, केवळ बुद्धिवादी तर्कापेक्षा अशा जिवंत वर्धिष्णू श्रद्धेची गरज मला अधिक आहे. सर्वांनाच आहे. मी अजूनही तुमच्यासारखा मूर्तिपूजक नाहीच; पण मूर्ती भंजनाचा आवेशही माझ्यात आता अजिबात उरला नाही.
' जुने जाऊ द्या मरणालागूनी जाळूनी किंवा पुरुनी टाका ' हे घोकत घोकत मी मोठा झालो. छे ! मोठा नाहीच झालो. फक्त किशोरावस्थेतून वयानं आणि शरीरानं पुढं सरकलो. आधुनिक व्हायचं तर आधी रुढींचं, परंपरांचं भूत मानगुटीवरून उतरवायला हवं हे माझं तेव्हाचं लाडकं मत आणि म्हणूनच संस्कृती, वारसा, परंपरा या साऱ्यांबद्दल माझ्या मनात अढी होती; पण वृक्षाची मुळं जमिनीत रुजलेली असणं आणि त्याच्या फांद्या आकाशात झेपावणं यामध्ये कोणताही अंतर्विरोध नाही. उलट मुळं जितकी खोलवर आत रुजलेली तितकी फांद्यांची बाहेर झेपावण्याची शक्ती जास्त, हे मला तुमच्याशी झालेल्या चर्चेनंतरच सर्वस्वी पटलं.

सिद्धार्थ राजाध्यक्ष
(मानद सचिव, प्रार्थना समाज, मुंबई)

डॉ. कुलकर्णी यांनी मानवी जीवनाला आधारभूत होऊ शकेल असे तत्त्वज्ञान या पत्रांच्या स्वरूपात आणि दैनंदिन अनुभवाच्या माध्यमातून मांडले आहे. आपण अनेक वेळा भारतीय तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृती यांचे मोठेपण सांगत असतो पण ते तत्वज्ञान काय आहे आणि भारतीय संस्कृतीचे मोठेपण कशात आहे याची आपल्याला नीटशी जाणीव नसते. संस्कृती, तत्त्वज्ञान हे शब्दच असे भारदस्त आहेत की त्यांच्याजवळ जाण्याचे धाडसही फार थोड्या लोकांना होते. डॉ. कुलकर्णी यांनी हे तत्त्वज्ञान श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीदत्त अशा देवतांच्या शिकवणुकींच्या स्वरुपात मांडले आहे.

### म. शं. आजगावकर
प्राचार्य, रहेजा कॉलेज, मुंबई

रामनवमी, दत्तजयंती किंवा जन्माष्टमी उत्साहाने साजरी करणाऱ्या लोकांपैकी फार थोड्या लोकांना त्यांच्या विचारांची आणि त्यांच्या कार्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या विचारांची कल्पना असते. अलीकडे तरुणवर्गातही या उत्सवात सहभागी होण्याची प्रवृत्ती वाढत आहे. या प्रवृत्तीचा फायदा घेऊन डॉ. कुलकर्णी यांच्या लेखांचा प्रसार तरुणवर्गात झाला तर देवतांच्या आणि प्रेषितांच्या अवतारकार्याचा खरा उपयोग होण्यास मदत होईल.

### विजय रायकर

आपले ' श्रीकृष्णदर्शन ' वाचून मनापासून समाधान वाटले. आपला लेख जाणिवेच्या वेगळ्याच पातळीवर नेणारा आहे. श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्त्व हे भगवद्गीतेप्रमाणेच नित्यनूतन. आपल्याला भावलेला श्रीकृष्ण असाच अष्टपैलू तरीही निष्काम–निर्गुण–पूर्णपुरुष. आपण चितारलेली त्याची प्रत्येक भूमिका वाचताना आपल्या चिंतनशील, तरल मनाची आणि अनुभूतीच्या ओलाव्याची खूण पटते.

## डॉ. ज. वा. जोशी

संचालक, प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर

डॉ. शरद कुलकर्णी यांनी आनंद व श्याम या नातवंडांना लिहिलेली पत्रे हा त्यांच्या स्वानुभूतीचा सहजोद्‌गार आहे. त्यांची भूमिका आजोबाची असली तरी या आजोबाचे मन वृद्ध झालेले नाही. कंटाळा, निराशा, अगतिकता यांनी ते भारलेलेनाही. आपली नातवंडे ही एक विसाव्या शतकातील तरुणांचे, 'उद्याच्या भगीरथांचे प्रतिनिधी' आहेत हे लक्षात घेऊन, आतापर्यंत चालत आलेल्या समाजगंगेच्या प्रवाहातील संस्कारमूल्यांचे विचारधन या भावी पिढीपर्यंत पोचवावे, या कर्तव्यभावनेपोटी ही पत्रे लिहिली गेली आहेत. त्यात परंपरेचा आग्रह नाही. पुनरुज्जीवनवादी भूमिका नाही, त्याचप्रमाणे भाबडे स्वप्नरंजनही नाही किंवा भविष्याची खोटी आश्वासनेही नाहीत.

काल–आज–उद्या अशा कालौघात आपल्या संस्कृतीची जी जडणघडण झाली तिची एक अनौपचारिक समीक्षा या पत्रांतून प्रकट होते. कोणतेही चिंतन, तत्त्वज्ञान हे 'संस्कृती समीक्षा' असते. या समीक्षेत तत्त्वचिंतकाची जीवनदृष्टी प्रगट होते. या पत्रांतून डॉ. कुलकर्णी यांनी मानवी समस्यांच्या संदर्भात भारतीय संस्कृतीला आकार आणि अर्थ देणाऱ्या काही संकल्पना, पुराणकथा, दैवतकल्पना, सामाजिक सिद्धांत इत्यादींचे मर्मग्रहण केले आहे. त्यात श्रीकृष्ण, श्रीराम, दत्तात्रेय, गणेश या सांस्कृतिक संकल्पनांचे भावार्थ व्यक्त झाले आहेत. वर्ण, आश्रम यामागील मूल्यव्यवस्था प्रगट झाली आहे. पिता–माता–पुत्र–मित्र या मानवी संबंधावर प्रकाशझोत टाकलेला आहे.

पण डॉ. कुलकर्णींची भूमिका प्रबंध–विवेचनाची नाही. त्यांची पत्रे हे 'संवाद' आहेत. स्वतःशी संवाद, इतरांशी संवाद, सभोवतालच्या मानवी जगाशी, निसर्गाशी संवाद, अमूर्त सांस्कृतिक प्रमेयांशी संवाद, पत्रशैली, संवादनिवेदन या सर्वांमुळे डॉ. कुलकर्णी यांच्या सर्व तत्त्वचिंतनाला विलक्षण आत्मीयता, सौहार्द प्राप्त झाले आहे. राक्षसी, जैविक, मानसिक आणि दैवी अशा चार पातळ्यांवर व्यक्तिमनाचे व्यापार सुरू असतात. कोणतीही व्यक्ती हे चतुर्विध पातळ्यांचे संमिश्रण असते. प्रत्येकात 'देवत्वाची क्षमता' असते. देवत्वाच्या पातळीवर पोहोचायचे ही मानवाची उत्क्रांती आहे. समाजगंगेचा प्रवाहही त्या दिशेने वाहतो आहे. या जीवनश्रद्धेतून डॉ. कुलकर्णी यांचे विचारचिंतन आकार घेत गेले आहे. व्यक्तींचे आणि मानवी समूहांचे 'परस्परावलंबन' ही वास्तवता ते मानवी संबंधांच्या पुनर्रचनेस पायाभूत मानतात.

या मानवी जीवनाच्या पुनर्रचनेसाठी त्यांना काही सांस्कृतिक शोध घ्यावासा वाटला. त्याकरता इतिहास आणि संस्कृती यांना आकार आणि अर्थ देणाऱ्या काही धाग्यांचा, विचार–सूत्रांचा (cultural themes) त्यांनी शोध घेतला आणि त्यांचेच अन्वयार्थ त्यांनी पत्ररूप संवादशिल्पांतून व्यक्त केले आहेत. प्रत्येकजण आपापल्या तात्विक चौकटीतून, साच्यातून (Theoretical Frameworks or models) जगाकडे पहात असतो, जगाचा अर्थ लावत असतो. त्यानुसार त्याचे रागलोभ, मैत्री, विद्वेष घडत जातात.

भावी पिढीने आपल्या भवितव्याचे स्वतः शिल्पकार बनले पाहिजे. त्याकरता स्वतंत्र आणि निर्भयपणे विचारचिंतन करायला शिकले पाहिजे. ती क्षमता विकसित झाली पाहिजे, विकसित करायला पाहिजे. त्याकरता मुलांच्यातील, तरुणांतील 'सांस्कृतिक संवेदनशीलता' विकसित करायला हवी, भावपरिपोष साधला जायला हवा, मर्मग्रहणक्षमप्रज्ञा (Critical Reason) विकसित व्हायला हवी आणि स्वतःसाठी, इतरांसाठी, सृष्टीसाठी, विश्वासाठी काही विधायक करण्याची कृतिप्रेरणा उदय पावायला हवी. परंपरा आणि संस्कृतीची दडपणे निर्माण करून हे घडणार नाही. त्यासाठी स्वयंशोध, आत्मविश्लेषण, स्वयंमूल्यमापन, स्वयंनिर्णय या क्षमतांचा विकास व्हायला हवा. तर ते माहिती संकलनात्मक शिक्षण (Knowing), कार्यकौशल्य संपादनात्मक शिक्षण (Doing) न राहता जीवनाची जडणघडण करणारे शिक्षण (Education for Becoming) होईल.

डॉ. कुलकर्णी यांनी नातवंडांना लिहिलेली पत्रे ही अशा प्रकारच्या सांस्कृतिक संस्कारशिक्षणाची प्रभावी आणि परिणामकारक अशी 'प्रयोगसाधने' म्हणून उपयुक्त ठरू शकतील.

सांस्कृतिक संस्कारशिक्षण हे 'अनौपचारिक' हवे, ते कौटुंबिक जीवनात घडायला हवे; पण आज मुलांना 'घर' उरलेले नाही आणि असलेल्या घरात 'आजोबा–आजी' उरलेले नाहीत. शिवाय असलेल्या आजोबा–आजींनी केवळ शुभं करोति, रामरक्षा अशा परिपाठशिक्षणाचा अवलंब करून उपयोग नाही. मानवी समस्यांची, भवितव्याची आव्हाने समजून देणारे आणि ती पेलणारी मने तयार करणारे संस्कारशिक्षण आणि त्याला अनुरूप अशी अभिनव संस्कारपद्धती विकसित करायला हवी. शिवाय हे संस्कार बाहेरून लादायचे नसतात तर आतून उमलायचे असतात. व्यक्तित्वाचे उमलणे ही निरंतर प्रक्रिया आहे, म्हणून असे संस्कार शिक्षण हे 'निरंतर शिक्षण' आहे. ते नागरिकत्व संस्कार शिक्षण आहे. व्यक्तित्व विकास शिक्षण आहे.

डॉ. कुलकर्णींच्या पत्रांनी या आणि अशा क्षेत्रातील प्रश्नांना सामोरे जाण्याचा एक मार्ग–रस्ता खुला केला आहे. त्यांच्या पत्रांतील घटनांचे तपशील, व्यक्तिचित्रे या 'सत्यकथा' आहेत. असे 'पूर्णत्वाचे प्रवासी' आपल्या भोवतीही आहेत. ती 'पुराणातली वांगी' नाहीत. हा वाचकांना येणारा शोध फार महत्त्वाचा आश्वासन देणारा आहे. शिवाय घरगुती उल्लेखांमुळे सर्व पत्रांना अनौपचारिक जिव्हाळ्याचे अस्तर लाभले आहे.

तर्कपांडित्य, कर्मठ धार्मिकता, निष्क्रीय निराशावाद, यांत्रिक शिक्षणपद्धती यांच्या गलबल्यात हरवलेल्या उद्याच्या भगीरथांना या पत्रांच्या रूपाने जीवनाचा साक्षेप आणि सावधपण सांगणारी, संस्कृतीचे अंतःप्रवाह समजून देणारी आणि जीवनावर प्रेम करण्यास, प्रयत्नवादी, आशावादी होण्यास प्रेरणा देणारी 'पत्रगीता' उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. कुलकर्णी यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

डॉ. कुलकर्णी हे ' जागृत प्रज्ञेचे ' प्रतीक आणि प्रतिनिधी आहेत. असे काही जागृत प्रज्ञावंत हेच आजच्या सांस्कृतिक अधःपतन कालातले ' शुभचिन्ह ' आहे. सांस्कृतिक प्रबोधन हे प्रज्ञावंताचे सामाजिक उत्तरदायित्व आहे. ' आजोबा ' च्या भूमिकेतून त्याची पूर्तता डॉ. कुलकर्णी यांनी समर्थपणे केली आहे. यापुढेही स्वतंत्र, सृजनशील प्रज्ञेचे सहजोद्गार असणारे साहित्य त्यांच्याद्वारे प्रगट होवो हीच उगवत्या पिढीच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा ! !

---

# ॥ पूर्णत्वाचे प्रवासी ॥

**प्रा. शरद कुलकर्णी**

**किंमत : रुपये पन्नास**

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे : ४११ ०३०
फोन : ४४ ३४ ५९
¤
जोशी वाडी, ४१, भवानीशंकर रोड,
चितळे पथ कॉर्नर, दादर,
मुंबई : ४०० ०२८
फोन : ४२२ ५४ ५५

